२८ एप्रिल १९७३: पन्नास पैसे

# माणूस

# विवेकानंद असे होते काय?

संपादक
श्री. ग. माजगावकर

२८ एप्रिल १९७३

# माणूस

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी पंचवीस रुपये
परदेशाची वर्गणी पासष्ट रुपये

वर्ष बारा – अंक : सत्तेचाळीस

## सप्रेम नमस्कार....

□ श्री. वि. भा. देशपांडे यांचा 'स्वातंत्र्य हवे आम्हा प्रेक्षकांना' हा लेख 'माणूस'च्या दि. ७ एप्रिल १९७३ च्या अंकात पाहिला. या लेखाच्या शेवटच्या परिच्छेदात 'सखाराम बाईंडर' या नाटकाचे दिग्दर्शक श्री. कमलाकर सारंग यांनी शिवसेना प्रमुख श्री. बाळासाहेब ठाकरे यांना नाटकाचा प्रयोग दाखवून 'एका अर्थाने सेन्सॉर मान्य केले', असे विधान करण्यात आले आहे.

११ मार्च रोजी मुंबई येथे शिवसेनेने श्री. मनोहर जोशी आणि सौ. मीना ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली निदर्शने केली आणि श्री. सारंग यांना अखेर नाईलाजाने प्रयोग बंद करण्याचा निर्णय घ्यावा लागला. श्री. सारंग यांनी प्रयोग व्हावा म्हणून अखेरपर्यंत अत्यंत निकराने प्रयत्न केले होते. या घटनेला मी स्वतः साक्षी आहे. त्यानंतर त्याचदिवशी नाटकातील कलावंत, निर्माते आणि काही प्रेक्षक यांनी श्री. सारंग यांच्या समवेत शिवसेनाप्रमुखांची भेट घेतली. त्यावेळीही मी उपस्थित होतो. त्यामुळे, शिवसेनाप्रमुख व इतर मंडळी यांच्यामध्ये जी बोलणी झालीत त्यांची मला पूर्ण माहिती आहे

श्री. ठाकरे यांनी किंवा शिवसेनेच्या इतर नेत्यांपैकी कोणीही निदर्शनांपूर्वी या नाटकाचा प्रयोग पाहिलेला नव्हता. केवळ वृत्तपत्रीय माहितीवर आणि ऐकीव गोष्टींवर विसंबून त्यांनी दि. १० मार्च रोजी रात्री एका बैठकीत हा निदर्शनांचा निर्णय घेतला होता. हे लक्षात आणून दिल्यानंतर श्री. ठाकरे यांनी प्रामाणिकपणे व खुल्या दिलाने

[ गेल्या अंकात, मलपृष्ठ दोन वर महर्षी शिंदे यांचा जन्मशताब्दीदिन १२ एप्रिल असा चुकून छापला गेलेला आहे. तो २३ एप्रिल हा हवा. –सं. ]

साप्ताहिक माणूस : १०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

आपली ही चूक मान्य केली. आणि शिवसेनेने यापुढ या प्रकरणी कोणते धोरण स्वीकारावे हे ठरविण्यासाठी नाटकाचा प्रयोग पाहावयाची इच्छा व्यक्त केली. दि. १२ मार्च रोजी नाटकाचा मालेगाव येथे प्रयोग ठरलेला होता. त्यामुळ, शिवसेना प्रमुखांनी मालेगावला येऊन हा प्रयोग पाहावा, अशी श्री. सारंग यांनी सूचना केली. तथापी, कार्यबाहुल्यामुळे श्री. ठाकरे यांना किंवा त्यांच्या सहकाऱ्यांना हे शक्य नव्हते. नाटकाचा दौरा आठ-दहा दिवस चालणार असल्यामुळे त्याकाळात मुंबईत प्रयोगही व्हायचा नव्हता. आणि दौऱ्याच्या आधी नाटकासंबंधी शिवसेनेचे धोरण निश्चित ठरायला हवे, यावर दोन्ही बाजूंचे एकमत झाले होते. तेव्हा श्री. ठाकरे यांनी स्वतः, १२ मार्चला दौऱ्यावर जायला निघण्यापूर्वी नाटकाचा प्रयोग करणे शक्य होईल काय, अशी पृच्छा केली. या प्रयोगाचा खर्च देण्याची तयारीही त्यांनी दाखविली. शिवसेनेने एकदा ही समंजसपणाची भूमिका घेतल्यानतर नाटकवाल्यांनी फार ताणून धरण्यात अर्थ नव्हता. म्हणून श्री. सारंग, नाटकाचे निर्माते श्री. धुरत आणि नाटकातील कलावंत यांनी १२ मार्चेला सकाळी प्रयोग करण्याचे ठरविले.

हा प्रयोग ठरविताना श्री. सारंग व त्यांचे सहकारी आणि शिवसेनाप्रमुख या दोघांनीही अगदी निःसंदिग्ध अशा भूमिका घेतल्या होत्या. आपण 'सेन्सॉर बोर्ड' म्हणून नाटक पाहणार नाही हे जसे शिवसेनाप्रमुखांनी सांगितले; तसेच शिवसेनेला 'सेन्सॉर बोर्ड' मानून हा प्रयोग दाखविण्यात येणार नाही, हे श्री. सारंग यांनीही स्पष्ट केले होते.

दि. १२ मार्च रोजी सकाळी 'सखाराम बाईंडर' नाटकाचा प्रयोग करण्यात आला त्यावेळी श्री. ठाकरे यांच्यासोबत शिवसेनेचे डॉ. हेमचंद्र गुप्ते प्रभृती इतर नेते, ११ मार्चला परत जावे लागलेल्या प्रेक्षकांपैकी काही प्रेक्षक, निदर्शकांपैकी काही महिला आणि श्री. माधव मनोहर हे उपस्थित होते. मीही त्यादिवशी तेथे उपस्थित होतो.

प्रयोग संपताच श्री. ठाकरे यांनी या नाटकात काहीही आक्षेपार्ह नसून इतःपर शिवसेना या नाटकाच्या प्रयोगांना कोणत्याही स्वरूपाचा आक्षेप घेणार नाही असे जाहीर केले. त्यावेळी, शिवसेनेच्या नेत्यांपैकी एका महिलेने, शिवसेनेने नाटकात निदान काही दुरुस्त्या तरी सुचवाव्यात, अशी सूचना केली. पण ही सूचना येताच श्री. ठाकरे यांनी, आपण इथे नाटक सेन्सॉर करायला आलो नाही, हे पुन्हा एकदा स्पष्ट केले. केवळ त्यांचे धोरण त्यांना ठरवावयाचे होते व त्यांनी ठरवले होते.

या वस्तुस्थितीवरून श्री. सारंग यांनी शिवसेनेचे 'सेन्सॉर बोर्ड' कोणत्याही अर्थाने मान्य केले नव्हते, हे जसे स्पष्ट होते; तसेच शिवसेनेनेही आपण 'सेन्सॉर बोर्ड' असल्याची भूमिका घेतली नव्हती, हेही उघड होते.

या वस्तुस्थितीबाबत श्री. विजय तेंडुलकर यांनाही माहिती आहे. कारण, दि. ११ व १२ मार्च रोजी काय काय घडले हे मी स्वतःच त्यांना त्या त्या दिवशी सांगितले होते. या दोन्ही दिवशी प्रत्यक्ष हजर असलेल्या इतर आणखी काही जबाबदार व्यक्तींकडून वस्तुस्थितीसंबंधी आपली खातरजमा करून घेतल्यानंतरच त्यांनी या गोष्टीला संमती दिली, हेही सांगणे मला महत्त्वाचे वाटते. कळावे

वसु भगत, मुंबई

## न्यायाधीशाची भूमिका का घ्यावी ?

संदर्भ : दि. २१ एप्रिलचे अंकातील 'नाटचसमीक्षक माधव मनोहर' हा लेख.

□ वरील लेखात पहिल्याच परिच्छेदात पुष्पा भावे यांनी त्यांच्या लेखाचे हेतु सांगितले आहेत. ते असे–१ : नाटचसमीक्षेचे कोणते स्वरूप माधवरावांनी रूढ केले त्याचा परामर्श घेणे. २: नाटचसमीक्षकाची कोणती प्रतिमा त्यांनी उभी केली त्याचा शोध घेणे. ३ : माधवरावांच्या नाटचसमीक्षेने दाखविलेल्या वाटेने मराठी नाटचसमीक्षेला पुढे जाता येईल का? या प्रश्नाचा विचार.

यापैकी क्र. ३ च्या अनुषंगाने सबंध लेखात एकसुद्धा वाक्य नाही. पहिल्या दोनबद्दल सुद्धा सूत्रबद्ध विचार लेखाच्या मांडणीत केलेला आढळत नाही.

माधव मनोहर यांच्या नाटचसमीक्षेचे स्वरूप वर्णन करताना त्यांच्या लेखनपद्धतीतील उणीवा म्हणून काही गोष्टी निदर्शल्या आहेत. त्या अशा. १ : 'पंचम'च्या आत्मनिवेदन पद्धतीची चेष्टा होते. २ : कथानकांचा सारांश देण्याची पद्धती. ३ : विश्लेषणापेक्षा वर्णन इ. माहितीचे संकलन अधिक.

वरील तिन्ही मुद्दे 'पंचम' सदरासंबंधीच आहेत. असे हे दोष असताना देखील 'पंचम' लोकप्रिय का झाले? उपनिर्दिष्ट तीन मुद्दे त्यांच्या शैलीचे व लेखनपद्धतीचे असे अंगभूत भागच होत. एखाद्याला ते दोष वाटतील. दुसऱ्याला ते समर्पक वाटतील. श्री. मनोहरांच्या नाटचसमीक्षेचे स्वरूप विषद करीत असताना लेखिकेने न्यायाधीशाची भूमिका का घ्यावी ? श्री. मनोहर ज्या अलिप्ततेने नाटचपरीक्षण लिहू शकतात, तशी अलिप्तता श्री. मनोहरांचे नाटचसमीक्षेची ओळख करून देणाऱ्याने दाखवावयास हवी.

याखेरीज पद्मा चव्हाण, सुनिला प्रधान, गुरुमहाराज गुरू आणि डॉ. लागू, मला उत्तर हवंय, Waiting for godgot इत्यादि मुद्यांवर श्री. मनोहरांशी असलेले मतभेद लेखिकेने व्यक्त केले आहेत. पण जे हेतु मनात धरून लेख लिहिला आहे त्या संदर्भात, वरील विवेचनाने किती भाग व्यापावा याचा तोल राहिलेला नाही.

पृष्ठ ५९ वर

# बोगस विवेकानंदांचा सुळसुळाट
# विश्व हिंदू परिषद संमेलन

निळू दामले

शिवाजी पार्कवर १३ एप्रिल ते १५ एप्रिल असे विश्व हिंदू परिषदेचे मुंबई संमेलन झाले.

त्या संमेलनाचा हा आँखों देखा हाल.

विश्व हिंदू परिषदेच्या चालकांना ही परिषद कशी वाटली असावी ती साधारणपणे ही अशी :

दि. १३ रोजी सायंकाळी स्वामी चिन्मयानंदजींच्या हस्ते संमेलनाचे उद्‌घाटन झाले. स्वामी सत्यमित्रानंदजी उपस्थित होते. उपस्थिती चांगली होती. हिंदू समाजाच्या आजच्या अवस्थेवर विद्वज्जनांनी प्रकाश टाकला व मार्गदर्शन केले.

दि. १४ रोजी दुपारी २॥ वाजता महिला संमेलन झाले. तळतळत्या उन्हातही दोन अडीचशे महिला उत्साहाने उपस्थित होत्या. महिलांनी आपल्या व इतरांच्या कविता गायल्या, मार्गदर्शनपर भाषणे झाली. अध्यक्षता राजमाता विजया राजे शिंदे यांनी केली. अश्लील पोस्टर्स विरोधी ठराव एकमताने मंजूर झाला. त्याच दिवशी संध्याकाळी ५–३० वाजता धर्मसंमेलन झाले. मान्यवर विद्वानांनी मार्गदर्शन केले.

१५ रोजी दुपारी २॥ वाजता छात्र संमेलन झाले. बरेच विद्यार्थी हजर होते. पूज्य दत्ताबाळ यांनी त्या संमेलनाला मार्गदर्शन केले.

संध्याकाळी ५॥ वाजता समारोपाचे सत्र पार पडले. स्वामी चिन्मयानंदांनी अत्यंत विद्वत्तापूर्ण मार्गदर्शन करून हिंदू-समाज एकसंध व प्रगत बनवण्याचा ओजस्वी संदेश दिला.

संमेलन श्रींच्या कृपेने चांगले पार पडले. हिंदूधर्माचे (सनातन) पुनरुज्जीवन करण्याचा निश्चय करून सर्व सभ्य स्त्री-पुरुष घरोघरी परतले.

हरि ओम !

संमेलनातले काही क्षण, किस्से आठवतात. त्यातून मला जे जाणवले ते असे.

संमेलनाच्या उद्‌घाटनाच्यावेळी संध्याकाळी ५ च्या सुमारास दोन अत्यंत गरीब महिला दाराशी उकिडव्या बसल्या होत्या. त्यांच्याबरोबर एक ८–१० वर्षांची मुलगी होती. एक बाई आंधळी होती.

'आत सत्यनारायणाची पूजा हाय काय ?' बहुदा हिंदूच असाव्यात.

'सत्यनारायण नाही. सभा-कीर्तन आहे.' मी.

'आमाला आतमंदी जायला देतील काय? '

'जा की, प्रवचनाला कोणाची बंदी असत नाही.' मी.

बाया आतमध्ये जाऊ लागल्या. दारावरच्या एका स्वयंसेवकाने आडवले. हिडीस फिडीस करून बाहेर घालवून दिले.

उद्घाटनाच्या सत्रात अनेक विद्वानांनी हिंदूबांधव कसे गरीब आहेत, त्यांच्यासाठी आपण ईश्वराकडे प्रार्थना केली पाहिजे, परमेश्वरासमोर सर्व समान असतात ह्या मुद्यावर जोर देणारी भाषणे केली!!

महिलांच्या संमेलनात राजमाताजींचे भाषण चालू होते. बाहेर एक परमेकर नावाचे गृहस्थ आले. गेले कित्येक वर्षे ह्या माणूस सामान्य गरिबांच्या मुलांना पाटया पेन्सिली मोफत देणे, पुस्तकांची सोय करणे अशी कामे करत आला आहे. खेतवाडी भागात लोक ह्यांना ओळखतात.

माणूस चिडला होता. 'तुम्हाला गरीब हिंदूसाठी काही करायचे आहे ना? मग शो कशाला करता? एयर कंडीशन्ड गाड्यांमधून फिरून हिंदू बांधवांचे कल्याण होणार आहे काय? माझ्याबरोबर कुंभारवाड्याच्या झोपडीतल्या हिंदूंबरोबर चला. तेथे हे लोक जात नाहीत, नुसते चौघडे वाजवायला हवेत.' तावातावाने बोलत होता.

त्याला जवळ जवळ हाकलून देण्यात आले.

स्वामी चिन्मयानंदजी.

भगवे परंतु अत्यंत तलम कपडे. पायातल्या खडावा राजेशाही. सनमायकासारख्या चकचकीत.

कोणा के. सी. राय नावाच्या अमीराच्या गाडीतून येतात जातात. आले काळ्या रंगाच्या मर्सिडीझ गाडीतून. जाताना लाल-पांढरी इंपाला. पुन्हा दुसऱ्या दिवशी आणखी दोन वेगवेगळ्या इंपाला गाड्या. के. सी. राय एक बडी असामी. चामड्याचा धंदा. कामगारांचे शोषण वगैरे ओघाने आलेच.

चिन्मयानंदांच्या चेहऱ्यावर ऐश्वर्य उपभोगल्याची चटक स्पष्ट दिसते. 'माझ्या पायावर लोटांगण घाला' 'मला हार घाला' असा दम देणारा अविर्भाव त्यांच्या डोळ्यात जाणवतो.

त्यांच्या भाषणात ह्या समाजातली बांडगुळे नष्ट करा असा आदेश त्यांनी दिला.

कोण बांडगुळे? दारावर अडकलेल्या दीन गरीब स्त्रिया?

की राम? सोमैय्या? कामदार? किंवा लाखांच्या ऐश्वर्यात लोळणारे बेफिकीर चिन्मयानंद स्वत:?

चिन्मयानंद, सत्यमित्रानंद वगैरे आत आल्यावर धडाधड त्यांच्या पायांवर डोके ठेवणाऱ्यांची झुंबड. ह्या डोके ठेवणाऱ्यात विद्यार्थ्यांना स्वातंत्र्य जपा असे सांगणारे प्राध्यापक होते, बुद्धिवादाचा डांगोरा पिटणारे वकील होते, दोन वेगळे हिशोब ठेवून लोकांना लुटणारे व्यापारी होते, अद्यावत सूट होते-काच्या मारलेले धोतर होते;

अंबाडा होता, बॉब कट होता, नऊवारी होते-मिनीमॅक्सी होते. कोण धडपड ?

एकच माणूस पाया पडला नाही. साखर कारखानदार सोमैय्या. त्याने नुसता नमस्कार केला. अर्थात त्याला पाया पडण्याची आवश्यकता नव्हती. चिन्मयानंदांचा भपका आणि तत्त्वज्ञानाची बाग कोणाच्या जिवावर फुलते हे त्यांना बरोबर माहीत. खाजगीत चिन्मयानंदच सोमैय्याच्या पाया पडत असतील.

चिन्मयानंदांची गंगा फार उदार आहे. कोणीही पाप करून यावे, एकदा बुडी मारून जावे, पापे खलास.

धर्मसंमेलनात चिन्मयानंदांच्या बाजूला बसून सत्यमित्रानंदांनी मार्गदर्शनात सांगितले की, 'मार्क्स काय गप्पा मारतो ! पोटापुरतेच माणसाने मिळवावे. जास्त मिळवणे ही चोरी. त्याला शासन झाले पाहिजे असे व्यासानेच लिहून ठेवले आहे !!'

स्वतः चिन्मयानंद पोटापेक्षा जास्त मिळवतात. (मर्सिडिझ गाड्या पोटाला आवश्यक असल्या तर गोष्ट वेगळी). स्टेजवर चमकू पहाणारे कामदार, सोमैय्या, जयकर नामक एक प्रतिष्ठित बॅरिस्टर, सर्वच पोटाला आवश्यक त्यापेक्षा जास्त मिळवतात.

कोणाकोणाला शासन करणार ? का नुसत्या गप्पाच !

स्वामींच्या पायांवर डोके ठेवणाऱ्या लोकांची धडपड पाहिल्यावर एकदम आठवण झाली.

संध्याकाळी ७॥ नंतर मुंबईच्या लोकलमधून व्यापाऱ्यांचे भजनी गट जातात. चर्चगेटपासून. बरोबर भगवान कृष्णाची तसबीर असते. झांजा-टाळ असतात. हार असतात. प्रसाद असतो. गाडी चालू असते. तारस्वरात भजने म्हटली जातात. आपली दुःखे विसरण्यासाठी, ह्या जगात आपण काहीच करू शकत नाही, हा आपला नाकर्तेपणा लपवण्यासाठी; दिवसभर व्यापारात बदमाषी केल्यावर पुण्याचे शिडकावे मारून तरतरी आणण्यासाठी. भजनींच्या ह्या डब्यातून जाताना त्यांच्या उच्च स्वरातील आर्तता, अगतिकता जाणवते. हसायला येते.

तीच अगतिकता, लीन दीन होऊन कोणा स्वामींच्या पायांवर डोके ठेवून, जीवनातल्या प्रश्नांतून सुटका करण्याची आर्त तत्परता ह्या पाया पडणी समारंभात पहायला मिळाली.

महिला समेलन म्हणजे महिला मंडळाच्या हळदीकुंकू समारंभासारखे भासले. राणी झांशीच प्रत्येकाच्या भाषणात होती.

समेलनाचा अर्धा वेळ महिलांच्या काव्यगायनानेच व्यापला होता. कवितांचा आणि हिंदूधर्माचा संबंध नव्हता. माणसाने चांगले वागावे, फुलासारखे असावे, शूर असावे अशा आशयाच्या कविता कोणत्याही संमेलनात खपून जातील. इथे त्यांचे काय प्रयोजन ? महिलांनी आपली हौस भागवली ह्यापलीकडे काही नाही.

सर्व रोख पाश्चिमात्य संस्कृतीच्या आक्रमणावर. स्टेजवर किमान तीन महिला लिपस्टिकवाल्या होत्या.

अश्लील पोस्टर्सवर सर्वांनीच झोड उठवली. ह्या झोड उठवणाऱ्यात एक बाई अश्लील नसली तरी पोस्टरवर शोभावी इतकी पुरेशी नखरेल होती !

महिलांनी टाळ्या वाजवल्या. पण प्रेक्षकांतील कित्येकजणी मनोहर आवडीने वाचत असाव्यात. एकीच्या हातात मी मनोहर पाहिला. देवयानी चौबळांची 'मांड्या फाकवणारी' दुनिया चविष्टपणे वाचणाऱ्या अनेकजणी तेथे असणारच.

छात्र संमेलन म्हणजे पोरवडाच होता. संचालन करणारे गृहस्थ काय बोलत होते ते त्यांनाच समजत असावे किंवा नाह कुणास ठाऊक.

दत्ता बाळांना त्यांनी महाराष्ट्राचे विवेकानंद म्हटले. हे जर खरे असेल तर विवेकानद बोगस माणूस होता असेच म्हणावे लागेल. भाषणे केलेल्यात विद्यार्थी कोणीच नाही. सर्वजण प्राध्यापक होते. राष्ट्राची उभारणी करा, समाज बलवान बनवा, अभ्यास करा, गुरुजनांबद्दल आदर बाळगा वगैरे उपदेशाचे डोस पाजले गेले. (जे विद्यार्थ्यांना नवीन नाहीत.)

त्यातच दत्ता बाळांचे बाळबोध मार्गदर्शन. त्यांचे एक वाक्य, 'ह्या माईकबद्दल आईनस्टाईन म्हणेल की, माईक म्हणजे न्यूक्लियसभोवती प्रकाशाच्या वेगाने फिरणाऱ्या इलेक्ट्रॉन...अशांचा समूह (वाक्य इंग्रजीत बोलले)' अशा ह्या त्यांच्या वाक्यामुळेच त्यांनी विज्ञानाची अध्यात्माशी सांगड घातली आहे असे म्हटले जाते !

विज्ञानाशी संबंधित त्यांनी उच्चारलेली सर्वच वाक्ये अशा स्वरूपाची होती.

मग दत्ता बाळ कशाला? महाराष्ट्रातले २-४ लाख सायन्सच्या वर्गातले विद्यार्थी दररोजच विज्ञानाशी अध्यात्माची सांगड घालीत आहेत.

भले जाडजूड शब्द. शब्द बंबाळ भाषण. उदा. पापपुण्याची व्याख्या: घनतम आत्म्याच्या जवळ ते पुण्य व घनतम आत्म्यापासून दूर ते पाप. (म्हणजे नेमके काय ?)

तासाभराच्या भाषणात सिनेमा, हिप्पी, ऑस्कर वाईल्ड, तुकाराम, तमाशा, सखाराम बाईंडर, विवेकानंद, तमाशातला कृष्ण, विजय तेंडुलकर, लूप, दुनियेतल्या तमाम गोष्टींवर मार्गदर्शन. मार्क्ससुद्धा.

'मी अमूक आहे, तमूक करणार आहे, मला लोक अमूक अमूक म्हणून ओळखतात. माझ्यात अशी हिम्मत आहे अशी भाषणाची तऱ्हा. कॉलेजात वक्तृत्व स्पर्धांत, करतात तसलेच भाषण.

शुद्ध पोरकटपणा. महाराष्ट्रात ह्या दत्ता बाळांना डोक्यावर घेतले जात आहे ! महाराष्ट्र हा 'दगडाधोंड्यांचा देश आहे' असे जे म्हणण्यात येते त्याचा अर्थ आता बरोबर समजला.

बाज मात्र आचार्य रजनीश वगैरे

पृष्ठ ६३ वर

# कै. अ. का. प्रियोळकर

भीमराव कुलकर्णी

प्रा. प्रियोळकरांच्या दुःखद मृत्यूची वार्ता ऐकल्यापासून मनात अनेक आठवणींची गर्दी उसळली आहे. मराठी वाङ्मयाचे पहिल्या प्रतीचे व्यासंगी संशोधक म्हणून त्यांचे महत्त्व किती अपार आहे, याचा बोध त्या आठवणींतून सारखा मनावर आघात करतो आहे. त्यातील एक आठवण तर माझ्या मनावर जणू काही कोरली गली आहे.

१९६८ चा तो मे महिना असावा. प्रा. प्रियोळकर हे महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या अतिथिगृहात उतरले होते. मी त्यांना भेटायला गेलो तेव्हा उन्हाळ्यामुळे रात्रभर त्यांना झोप लागलेली दिसत नव्हती. खोलीतून बाहेर येऊन गच्चीवर झोपण्याची अनिवार इच्छा संकोचाने त्यांनी दाबून टाकली होती. यापूर्वी दोन वेळा माझ्याकडे जेवायला येण्याचे आमंत्रण त्यांनी टाळले होते. याखेपेला मी ऐकणार नव्हतो. त्यांचा संकोची स्वभाव मला चांगला माहीत होता. आपल्या विद्यार्थ्यांकडून काही हक्काने करून घ्यावे, ही त्यांची वृत्तीच नव्हती. आपल्या जवळच्या विद्यार्थ्यांशीही ते अगदी सौजन्याने व संकोचानेच वागत.

'तुम्ही पुण्याला आलात. चांगला जम बसविलात. मला मोठा आनंद झाला. त्यामुळे मुंबईचे नुकसान झाले' ते म्हणाले.

'का सर, असे का म्हणता?' मी त्यांना विचारले.

'संग्रहालय, संशोधन मंडळ यांच्याशी तुमचा संबंध होता. तुम्ही मुंबईस राहिला असता तर तुम्हाला मी काही संशोधनाची कामे आनंदाने सांगितली असती. मुक्तेश्वरांच्या इतर अध्यायांचे संपादन, महाराष्ट्रातील हस्तलिखितांची सूची वगैरे कामे आता तुम्ही लोकांनी हाती घ्यायला हवीत. माझ्या मनात तुम्ही श्रीरामपूरच्या विल्यम कॅरेवर काम करावे असे फार आहे. माझ्याकडे सारे साहित्य आहे. कोणीतरी जिद्दीने काम करणारा मला हवा आहे.'

मी फारशी उत्सुकता दाखविली नाही. सुट्टी असल्याने प्रियोळकरांनी एका कामासाठी पुण्यातील ग्रंथालये धुंडाळण्यासाठी त्यांच्याबरोबर येण्याचे

मला आवाहन केले. मी आनंदाने तयार झालो.

'ज्ञानोदय' नावाच्या मिशनऱ्यांनी चालविलेल्या मासिक पुस्तकात गोविंद नारायण माडगावकर यांचा मृत्युलेख आहे, असे कळल्यावरून त्या अंकाच्या शोधात आम्ही दोघेही निघालो. नारायण पेठेतील मराठी ग्रंथालय, विश्रामबागवाड्यातील महाराष्ट्र ग्रंथालय येथे शोध घेऊन आम्ही कॅंपात गेलो. तेथे मिशनऱ्यांच्या शाळांची ग्रंथालये तपासली. सोलापूर रस्त्यावर असलेल्या ख्रिस्ती धर्ममंदिरात ज्ञानोदयाचे बरेच अंक होते. परंतु नेमका हवा असलेला अंक नव्हता. अशी दहा-बारा ठिकाणे झाल्यावर स्टेशनजवळच्या हॉटेलात आम्ही दोघांनी दूध घेतले आणि तेथून नगर रस्त्यावरच्या 'डी नोबिली' कॉलेजात गेलो. तेथून पुणे विद्यापीठ व फर्ग्युसन कॉलेजातील मंडलिक संग्रह पाहिला. जवळ जवळ आठ तासांनी पायपीट केल्यानंतर तो अंक पुण्यात कुठे मिळत नाही, ते निश्चित झाले. एका मृत्युलेखासाठी केलेली ही यातायात पाहून मी अस्वस्थ झालो होतो. ते ओळखून प्रियोळकर म्हणाले–

'संशोधन म्हणजे कथाकादंबरी लिहिणे नव्हे. अमके ठाऊक नाही, त्यासंबंधाने काही मिळत नाही, एवढे साधे विधान करण्यासाठी सगळीकडे शोध घेऊनच मग हे विधान केले पाहिजे. कुठे काय मिळत नाही आणि कुठे काय मिळते हे ठाऊक असणे ही संशोधनाची पहिली पायरी आहे. परंतु दुर्दैवाची गोष्ट ही की, आजकालच्या व्यक्तीत ह्या प्राथमिक परिश्रमाचाच अभाव आढळतो. मग त्यांनी घरी बसून उभा केलेला संशोधनाचा डोलारा किती तकलादू असतो याची कल्पना येऊ शकेल.'

प्रियोळकरांनी केलेला हा संस्कार मनावर खोलवर आघात करून गेला आहे.

साधनांची जमवाजमव करण्यात प्रियोळकर किती दक्ष असत आणि किती परिश्रम घेत याची असंख्य उदाहरणे सांगता येतील. रेकॉर्ड ऑफिसमधील रेकॉर्ड तपासण्यात ते तासनतास घालवीत. संबधित विषयासंबंधी त्यांचा सारखा पत्रव्यवहार चालू असे. लंडन येथील इंडिया ऑफिसमधील ग्रंथालयात व ब्रिटिश म्युझियममधील ग्रंथालयात उपलब्ध असलेली साधने मिळविण्यात ते अतिशय दक्ष असत. पोर्तुगीज ग्रंथालये, रोम येथील ग्रंथालये यांच्याकडे सतत लक्ष असे. संबंधित ग्रंथालयांचे ग्रंथपाल, संशोधक, सरकारी अधिकारी यांच्याशी ते सतत पत्रव्यवहार ठेवीत. याखेरीज जुनी कागदपत्रे, दप्तरे, हस्तलिखिते जातील तेथे शोधून त्यांच्या नोंदी करीत. हस्तलिखिते कागदपत्रे संशोधनमंडळासाठी जमविलेली निराळी, स्वतःची निराळी अशी त्यांची स्वच्छ दृष्टी होती. संग्रहालयाची वा संशोधन मंडळाची पुस्तके ते फार कसोशीने वापरीत. काम झाल्यावर ही पुस्तके तात्काळ परत करण्याची दक्षता घेत.

नेलेली पुस्तके वर्षानुवर्षे घरी ठेवणाऱ्यांचा त्यांना फार राग येई. आपल्याकडे संशोधक व अभ्यासक हेच ग्रंथसंग्रहालयातले खरे शत्रू आहेत असे ते म्हणत. दुर्मिळ पुस्तके लाटणाऱ्या संशोधकांच्या मनोवृत्तीची त्यांना विलक्षण चीड होती.

प्रियोळकरांनी आपल्या संशोधनाची काही एक विशिष्ट दिशा ठरवून ठेविली होती. ख्रिस्ती साहित्यिकांनी केलेली मराठी भाषेची सेवा, एकोणिसाव्या शतकातील दुर्मिळ ग्रंथाचे संशोधन व प्राचीन मराठीतील काही प्रमुख ग्रंथाचे साक्षेपी संपादन या तीन महत्त्वाच्या गोष्टींकडे त्यांचे विशेष लक्ष होते. त्यांनी केलेले 'दमयंती स्वयंवराचे' संपादन हे मराठीतील, प्राचीन मराठीतील ग्रंथाचे व दादोबा पांडुरंगांच्या चरित्रलेखनाच्या निमित्ताने केलेले संशोधन हे अर्वाचीन मराठीतील आदर्श संपादन होय. मुक्तेश्वराच्या आदिपर्वाचे संशोधन हा ही त्यांच्या संशोधन क्षेत्रातील एक महत्त्वाचा टप्पा होय. सुखथनकरांनी महाभारताच्या संशोधनासाठी जी दृष्टी वापरली तीच दृष्टी या ग्रंथाच्या संपादनामागे प्रियोळकरांची होती. या क्षेत्रात प्रियोळकरांना मागे टाकील असे प्रयत्न होणे मला तर फार कठीण दिसते.

'पाठशुद्ध आवृत्त्यांचे संशोधन याला फार महत्त्व आहे, अशी त्यांची दृष्टी होती. अगोदर हातात शुद्ध प्रत नाही तर भ्रष्ट झालेल्या ग्रंथांची विवेचनेही दूषीतच असणार' असे ते म्हणत. म्हणून त्यांनी आपली सारी हयात या कामी वेचली.

कोणतेही विवेचन करताना आधाराखेरीज बोलायचे नाही आणि हे आधारही अस्सल साधनातून शोधले पाहिजेत हे त्यांचे व्रत होते. त्यामुळे शोधनिबंधांच्या लेखनपद्धतीबाबतीत ते मोठे दक्ष असत. आधार देण्याची शास्त्रीय पद्धत स्वीकारली नाही, संदर्भग्रंथांच्या बाबतीतही धरसोड झाली तर त्यांना खपत नसे. प्रबंधलेखनासाठी शोधनिबंधाची लेखनपद्धती आत्मसात करणे ही पहिली पायरी आहे. तिचाच अलीकडच्या प्रबंधातून अभाव असल्याने विद्यापीठांनी पी. एच्. डी. पदव्या बंद कराव्यात असे ते उद्वेगाने म्हणत.

मराठीतील प्रसिद्ध झालेली सर्व पुस्तके पहावयास मिळतील अशी समृद्ध ग्रंथालये जागोजागी निर्माण झाली पाहिजेत, ही त्यांची फार मोठी तळमळ होती. पुस्तकांच्या साऱ्या आवृत्त्याही महत्त्वाच्या ग्रंथालयात उपलब्ध असणे किती आवश्यक आहे, हे ते तळमळीने सांगत. पुण्यातील एका महाविद्यालयाच्या ग्रंथालयातील काही जुनी पुस्तके रद्दीत काढलेली पाहून प्रियोळकर संतापाने लाल झालेले मी पाहिले आहेत. मराठीत छापलेले पहिले पुस्तक, दादोबांच्या व्याकरणांच्या व नवनिताच्या सर्व आवृत्त्या प्रियोळकरांकडे असत. दादोबांच्या लघु व्याकरणात सगळीकडे 'माझे मेळे पहा' अशी टीप आहे अशी म. म. काळे, रॅ. गुंजीकर, बाळासाहेब खेर इत्यादिकांची समजूत

होती. परंतु प्रियोळकरांनी या पुस्तकाच्या साऱ्या प्रती पुढे ठेवून ही समजूत चुकीची आहे हे सिद्ध केले. अनेक जुन्या चुकीच्या समजुती संशोधनाने दूर केल्या नाहीत तर आपणास फारसे भवितव्य नाही. 'गतानुगतिको लोको न लोकः पारमार्थिकः' या उक्तीचे प्रत्यंतर आजकालच्या लेखनातून नित्य येते, म्हणून मी या लोकांचे फारसे वाचीत नाही,' असे प्रियोळकर नेहमी म्हणत.

प्रियोळकर हे मूळचे वृत्तीने चित्रकार, कवी व ललित लेखक होते. गंभीर विषयदेखील उपहास-उपरोधाने, लालित्याने व नाट्यपूर्णतेने ते खुलवून लिहीत. डॉ. केतकरांच्या निंदाव्यंजक लेखनप्रवृत्तीवर आघात करण्यासाठी त्यांनी 'गोंडवनातील गावगुंड' ही कादंबरी लिहून खुद्द डॉ. केतकरांनाही अंतर्मुख व अस्वस्थ केले होते. संशोधकाचे व्रत स्वीकारल्यामुळे त्यांनी ललित लेखनाकडे जाणूनबुजूनच दुर्लक्ष केले होते.

मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षीय भाषणांचे खंड ज्या स्वरूपात आज परिषदेने प्रसिद्ध केले आहेत, त्यामुळे प्रियोळकरांना मोठा आनंद झाला होता. त्याबद्दलच्या काही व्यक्तींच्या प्रतिक्रिया सांगताच ते फक्त हसले होते. याच पद्धतीने पुढच्या वर्षी म्हणजे १९७४ साली चिपळूणकरांच्या निबंधमालेच्या शताब्दीच्या निमित्ताने निबंधमालेची यथामूल आवृत्ती परिषदेने संपादित करावी अशी त्यांची फार इच्छा होती. श्री. म. माटे हे परिषदेचे कार्याध्यक्ष असताना प्रियोळकर हे परिषदेचे अध्यक्ष होते. प्रियोळकरांनी परिषदेने हस्तलिखितांचा संग्रह करून संशोधन मंडळ कार्यान्वित करावे यासाठी आग्रह धरला होता; परंतु माटयांनी चिपळूणकर सभागृह उभे करण्याकडे आपली शक्ती वेचली परिषदेने ज्यावेळी यथामूल आवृत्ती प्रसिद्ध करण्याचे काम हाती घेण्यास आर्थिक कारणाने असमर्थता दाखविली त्यावेळी त्यांना फार दुःख झाले.

'माटयांनी सभागृह बांधले. त्यांच्या वंशजांनी तुम्ही निबंधमाला व हस्तलिखितसग्रहाचे काम हाती घेतले नाही तर ह्या परिषदा, संग्रहालये आणि संघ इत्यादी संस्था कोणत्या हेतूने निघाल्या याचे त्यांना भानच नाही असे खेदाने म्हणावे लागेल. प्रियोळकर म्हणाले होते.

प्रियोळकरांचा तो उद्वेगाने व्यापलेला चिंताग्रस्त चेहरा माझ्या डोळ्यासमोर सारखा येतो आहे. माझ्यासमोर त्यांचे 'Printing Press in India' व 'Goa Inquisition' 'Goa Re-discovered' यासारखे त्यांना जागतिक किर्ती मिळवून देणारे ग्रंथ आहेत. त्यांच्याकडे पाहताना प्रियोळकरांची ही अंतिम इच्छा आम्हाला पुरी करता येईल का, या कल्पनेने मी व्यथित झालो आहे.

● ● ●

आता आपल्या वेळेचा अपव्यय वाचकांना टाळता येईल. ●

# आ ले पा क

■ श्रीसत्यसाईबाबा एका प्रवचनात म्हणाले: नाव व कृती यांचा मेळ आजच्या व्यवहारात अनेक ठिकाणी दिसत नाही. नाव राम किंवा लक्ष्मण ठेवतात; पण हे पुरातन काळातले राम-लक्ष्मण नसतात. आजचा राम हा कामप्रवण राम असतो.

उदा. : 'सखाराम', 'घाशीराम.'

■ आमदार रा. अ. खैरे यांनी एका व्याख्यानात अशी तक्रार केली : महाराष्ट्रातील चर्मकार मंडळी दुष्काळी कामात खडी फोडत असताना महाराष्ट्र राज्य लघुउद्योग महामंडळाने दोन लाख रुपयांचे चप्पलजोड करण्याची ऑर्डर आग्रा येथील कर्मचाऱ्यांना दिली.

ही ऑर्डर महाराष्ट्रातील चर्मकारांना मिळाली असती तर त्यांनी आपल्या कातड्याचे चप्पलजोड बनवले असते.

■ 'मराठा मंदिर' या मुंबईच्या संस्थेने रौप्यमहोत्सवानिमित्त प्रसिद्ध केलेल्या 'अस्मिता महाराष्ट्राची' या महत्त्वाकांक्षी ग्रंथाचे बाळ सामंतांनी केलेले वर्णन : कागद, पैसा आणि परिश्रम यांचा व्यर्थ अपव्यय !

## एका मोटरवाल्याची आत्महत्त्या

रस्त्यावरून जाणाऱ्या लोकांचे दोन वर्ग असतात : एक पायी जाणारा; दुसरा चाकी जाणारा, म्हणजे बस-मोटरने जाणारा. बससारख्या सार्वजनिक वाहनाने जाणारे लोक सोडा. आपल्या खासगी मोटरने जाणाऱ्यांबद्दल पायी चालणाऱ्या लोकांच्या मनात एक अढी असते. मोटरवाल्यांचे सुख, शान आणि स्वातंत्र्य यांच्याबद्दल आमच्यासारख्या पादचाऱ्यांना हेवा वाटतो.

मात्र प्रत्येक मोटरवाल्याची एखादी घातवेळ असते. त्यावेळी त्याची अवस्था केविलवाणी होते. मोटर अचानक बंद पडते; आणि मोटरवाला रस्त्याला शरण येतो. त्याला सहज मदत मिळणे मुष्किल होऊन बसते. कधी कधी तर कोणी मागून ढकलल्यास ती चालू लागेल इतपतच इजा मोटरला झालेली असते. पण असे ढकले मिळत नाहीत. मोटरवाल्याचा नक्षा उतरलेला पाहिल्यावर पादचाऱ्यांना एक उत्कट, अनामिक सुख वाटते. पादचाऱ्यांचे एकवेळ आपण समजू शकतो. पण या दुर्दैवी मोटरवाल्याकडे इतर मोटरवाले बांधवदेखील बहुधा दुर्लक्ष करतात.

यामुळे परवा अमेरिकेत केवढी भीषण गोष्ट घडली पाहा : एका मुख्य रस्त्यावर एक मोटर बंद पडली.

थंडीचा कडाका विलक्षण होता. कोणी आपुलकीने मदत करील म्हणून मोटरवाल्याने ११ तास वाट पाहिली. त्याच्याकडे कोणी लक्ष दिले नाही. या उपेक्षेने वैतागून अखेर त्याने आत्महत्या केली. आत्महत्या करण्यापूर्वी लिहिलेल्या चिठ्ठीत त्याने वरील कारण नमूद केले होते. ●

## हिटलरचे आत्मचरित्र

'मैन काम्फ' (Mein Kampf) हे अॅडॉल्फ हिटलरचे आत्मचरित्र. मध्यंतरी दिल्लीतील कोपऱ्याकोपऱ्यावर या आत्मचरित्राच्या स्थानिक मुद्रणालयात छापलेल्या शेकडो प्रती विक्रीला आल्या. लोकसभेत त्याबद्दल तक्रार व्यक्त करण्यात आली; पण त्यावर बंदी घालण्याचा सरकारचा निर्णय निश्चित होण्याआधीच अधाशी वाचकांनी या प्रती विकत घेऊन टाकल्या.

एका ब्रिटिश प्रकाशकानेही नुकतीच या आत्मचरित्राची एक स्वस्त आवृत्ती प्रकाशित केली आहे. ती काढताना त्याला सर्व प्रकारच्या विरोधाला तोंड द्यावे लागले. पण ही आवृत्ती आपल्याला पुष्कळ पैसे मिळवून देईल असा त्याचा अंदाज आहे; त्या बदल्यात हवी ती निंदा सहन करायची त्या पठ्ठ्याची तयारी आहे.

याचा अर्थ उघड आहे : भडक आणि उत्तान काहीतरी वाचायला सामान्य वाचक चटावलेला आहे; विषयाची फारशी कदर तो करत नाही. कदाचित हिटलरच्या अत्याचारांचे, खुद्द ब्रिटनमध्येच, विस्मरण होऊ लागले असेल. वास्तविक हिटलरचा आणि हिटलरपर्वाचा अस्त होऊन अवघी सत्तावीसच वर्षे लोटली आहेत. ●

## व्यंगचित्रे

वर्तमानपत्रे आणि व्यंगचित्रे यांचा संबंध आता आपण अतूट मानला आहे. कित्येक वेळा पानभर मजकुराने जे साधत नाही ते तळहाताएवढ्या छोट्या, मर्मभेदक व्यंगचित्राने अचूक साधते. म्हणूनच खंडनमंडन करणाऱ्या वृत्तपत्रात व्यंगचित्रांना मोठे मानाचे स्थान दिलेले असते.

मध्यंतरी वॉशिंग्टनमधील एका वर्तमानपत्राची वर्गणीच माजी राष्ट्राध्यक्ष लिंडन जॉन्सननी बंद करून टाकली होती. त्यांना म्हणे त्यातील व्यंगचित्रे पसंत नव्हती. लंडनमधील चिनी वकिलातीनेही एकदा, माओची व्यंगचित्री थट्टा केल्याबद्दल एका वृत्तपत्राविरुद्ध निषेध नोंदवला होता. उत्तर आयर्लंडमधील चळवळीबाबतच्या मजूरपक्षाच्या धोरणाची चेष्टा करणारे श्री. कमिंग्ज या व्यंगचित्रकाराने रेखाटलेले व्यंगचित्र बरेच दिवसापूर्वी 'डेली एक्सप्रेस'मध्ये प्रसिद्ध झाले होते. तेव्हा एका मजूरपक्षीय खासदाराने त्याविरुद्ध ब्रिटिश प्रेस कौन्सिलकडे तक्रार केली. कौन्सिलने या तक्रारीची दखल घेतली आणि व्यंगचित्र प्रसिद्ध करण्यात 'डेली एक्सप्रेस'कडून काहीही आगळिक घडली नाही, असे मत दिले. ● ● ●

# कलकत्ता मेल

## सौ. तारा पंडित

### हलदर

हलदर. समाजवादी पक्षाचा एक तरुण कार्यकर्ता. ऑल इंडिया समाजवादी युवक सभेचा अध्यक्ष म्हणवतो तो स्वतःला. मोठा विचित्र माणूस आहे. ठेंगणा, लुकडा. पर्सनॅलिटी म्हणतात ती त्याच्याजवळ मुळीच नाही; तरीपण लटपटी करून स्वतःचं महत्त्व इतरांना जाणवून देत असतो. मनाने प्रांजळ आहे, कष्टाळू आहे. बिचारा एकटा राहतो. कुठेतरी जेवतो. दिवसभर काही ना काही कामात व्यग्र असतो. ते काम म्हणजे पोटासाठी करायचा धंदा नव्हे, पक्षाचं काम. जगाच्या उलाढाली. त्याच्या पाड्यात (विभागात) त्याला सारे ओळखतात. एवढेच नव्हे, पाड्यातल्या लोकांवर त्याच वर्चस्व आहे. विशेषतः तरुण मंडळींवर. ह्याचा प्रत्यय आला जेव्हा मानखुर्दच्या मेळाव्यासाठी प्रचारार्थ आलेल्या कार्यकर्त्यांच्या सांगण्यावरून युवकयुवतींची एक पलटण त्याने उभी केली. इकडे लोकांना तिकीटं मिळत नव्हतो. पण हलदरने एक पूर्ण बोगी रिझर्व केली. मानखुर्दच्या मेळाव्यात बंगाल 'गाजवला'. चांगल्या-वाईट दोन्ही अर्थांनी!

असा हा विक्षिप्त माणूस. आपण, आपला पक्ष यांची काय काय कामं चालतात ते रंगवून सांगत असतो. एक दिवस म्हणाला, 'दिनाजपूर जिल्ह्यात केवढा दुष्काळ पडलाय् कल्पना आहे?' मी म्हटलं – 'वर्तमानपत्रात तर कुठेच दिसली नाही बातमी.'

'अरे वर्तमानपत्रांची बात सोडा. माझ्या पार्टीचे लोक जिवाची पर्वा न करता दुष्काळग्रस्तांसाठी कामं करताहेत.' मग त्याने बरीचशी आकडेवारी तोंडी सांगितली. नंतर म्हणाला–महाराष्ट्रतल्या दुष्काळपीडीतांसाठीही माझा जीव तुटतो. मी इथे एक कमिटी स्थापन करणार आहे. एक लाख साड्या नि मुलांचे कपडे आणि धान्य गोळा करणार. धान्य नेता येणार नाही म्हणून तेवढ्या धान्याची जी काय किंमत येईल ती त्या जुन्या कपड्यांसह मुंबईला पाठवणार.'

मी त्याला हटकलं. म्हणाले–'दुष्काळग्रस्तांसाठी काम करायला तरुणांचं एक सैन्य तयार कर. त्यांनाही पाठवू आपण.'

'छे छे. तसं नाही करायच तिथल्या लोकांवर आपला भार नको. त्यापेक्षा नुसती मदत पाठवू.'

परवा तर पामेला चाटर्जीने मुंबईला प्रदर्शनात ठेवलेल्या दुष्काळविषयक फोटोचं एक मोठं पोस्टर घेऊन आला होता. म्हणाला–'दहा दहा रुपयांना हे असे अनेक पोस्टर्स विकून तेही पैसे तिकडे मदतीसाठी पाठवीन.

महाराष्ट्राबद्दल इतक्या आत्मीयतेने बोलणारा हा बंगाली माणूस आगळा वाटला. ●

## एक नवीच क्रांती

बसची वाट पहात मी उभी होते. इतर अनेक बसेस येत नि निघून जात. मला हवी असणारी बस येतच नव्हती. अशावेळी नुसतंच उभं राहण्यापलीकडे माणूस काहीच करू शकत नाही. पाय रोवून उभं राहणंही तेवढं कठीण नाही. पण मन ? ते एका जागी राहील तर ना ? नजरेच्या दरवाज्यातून केव्हाच पसार होतं ते नि इकडे तिकडे भटकू लागतं. इच्छा नसतानाही त्याच त्या सिनेमाच्या जाहीरातींकडे तरी लक्ष जातं किंवा माहीत असलेल्या त्याच त्या दुकानांच्या पाट्या वा अवांतर जाहीराती वाचल्या जातात. बस, ट्रामवरच्या जाहीरातीही जवळ जवळ पाठ झालेल्या असतात. इच्छा नसताना मीही मनातल्या मनात त्या सर्व जाहिराती वाचून टाकीत होते.

'नाम्बार टेन', 'चा' (चहा), 'इउनाइटेड बंक' (युनायटेड बँक) इत्यादी सर्व वाचून झाले. एका बसवर किंचित बारीक अक्षरात एक अनोळखी जाहीरात दिसली. कुतूहलाने मी पाहू लागले. त्या जाहीरातीत लिहीलं होतं–

'मसाल्यांच्या पावडरींमध्ये बिप्लब (म्हणजे क्रांती) घडवून आणणारी 'न्यू गुडी मोशला' नावाची आमची मसाला पावडर आहे. प्रस्तुतकर्ता–

आम्हीच काहीजण सुशिक्षित बेकार तरुण.

तरी आपण आम्हाला आमच्या कार्यात 'योगदान' करावं ही विनंती.'

घ्या आता. सुशिक्षित बेकार तरुण आपल्या ज्ञानाचा उपयोग मसाला पावडर बनविण्याकडे करीत आहेत. यावरून आठवण आली गणित घेऊन बी. एस्सी. झालेल्या चांभाराच्या मुलाची. नोकरी मिळेपर्यंत बापाचा धंदा करीन असं म्हणाला होता तो. माझ्या मनात विचार आला होता– कदाचित् नोकरीची वाट पाहता पाहता जन्मभर याला बापाचाच धंदा करावा लागायचा. काय नेम ?

आणि आता कालपरवाच ऐकलं की जाधवपूर युनिव्हर्सिटीच्या फाटकाशी बोरं विकणारा माणूस एम्. एस्सी. फर्स्टक्लासमध्ये पास झालेला आहे. त्याला नोकरीच मिळत नाही म्हणून तो बोरं विकतो. ती विकत घ्यायला गेलेल्या काही मुली त्याला म्हणाल्या, तू अर्ज कर पी एच. डी.साठी. आम्ही तुला स्कॉलरशिप मिळवून द्यायची खटपट करू. तो म्हणाला आता मला शिकण्याची मुळीच इच्छा नाही. एवढंही आपण उगाच शिकलो असं कधीकधी वाटतं.

गंभीरपणे विचार करू लागलो की ह्या विसंगतीचा अर्थच लागेनासा होतो नि ह्या उमलत्या फुलांसाठी उगाचच जीव हळहळतो. ●

## राजकुमार

'तुझा मुलगा आहे हा ?'

'होय माईजी.'

'नाव काय ह्याचं ?'

'राजकुमार.'

मला हसूच आलं. त्या राजकुमाराला—सात-आठ वर्षांच्या त्या मूर्तीला मी न्याहाळून पाहू लागले. वाजवीपेक्षा जास्त मोठी चड्डी, अन् तसलाच ढळढळीत सदरा, बारीक कटिंग आणि लोंबणारी शेंडी.. पण चेहरा भारी गोड, निष्पाप, निरागस भाव असलेला; डोळे भिरीभिरी पहाणारे, इकडून तिकडे जा-ये करणारे माणसांचे लोंढे बघायचा अद्याप सराव नसलेले.

रिक्षा ठरवला तेव्हा रिक्षावाल्याने हातातलं घुंगरू बाजूला फूटपाथवर उभ्या असलेल्या लहानग्याजवळ दिलं. म्हणाला—मी आत्ता पाणी पिऊन येतो. तो परत येताच त्या गोजिरवाण्या बाळाने आज्ञाधारकपणे घुंगरू बापाच्या हातात दिलं. दूरदूर जाणाऱ्या रिक्षाकडे एकटक बघत काही वेळ तो तसाच उभा होता.

पैसे मोजून घेताना रिक्षावाला म्हणाला—'माईजी, ह्या माझ्या राजकुमाराला तुमच्या घरी कामाला ठेवून घ्याल ?'

ते लहानसं बालक, आज मनमुराद खेळायचं वय त्याचं, घरकाम करणाऱ्या गड्याच्या रूपात त्याला कल्पनेने बघणंही मला कसंसंच वाटलं. मी म्हटलं—'अरे, त्या बाळाच्या ओठावरचं दूधही अजून सुकलं नाही तोच त्याला कामाला जुंपतोस ? छे: ! त्याला आत्तापासून कामाला लावू नकोस. त्याला शिकव. लिहावाचायला आलं पाहिजे. तुझ्यासारखा अनपढ ठेवू नकोस त्याला.'

'पण माईजी, शिकवून काय फायदा ? त्याला कुठे नोकरी मिळणार आहे ?'

ह्या त्याच्या उत्तरासरशी सुशिक्षित बेकारांचं सैन्यच्या सैन्य माझ्या डोळ्यांसमोरून तरळत गेलं. विद्यार्थ्यांचा शिक्षणावरचा विश्वास उडाला असल्याचं आपण बघतोच आहोत. पण ह्या अशिक्षित अडाणी माणसाचादेखील शिक्षणावर विश्वास नाही, हे स्पष्ट दिसलं. त्याच्या प्रश्नाला ठामपणे उत्तर देण्यास माझ्याजवळ शब्द नव्हते. मी मग म्हटलं—'ठीक आहे. निराळं काही शिकव. थोडा मोठा होऊ दे. ड्रायव्हिंग शिकव. पण आत्तापासून घरकामाला लावू नकोस.'

रिक्षावाल्याच्या चेहऱ्यावर निर्मळ हास्य फुललं होतं. त्याच्या अपत्याबद्दल काढलेले सहानुभूतीचे उद्गार ऐकूनच तो भारावला होता. आपला मुलगा आपल्यासारखा रिक्षा ओढीत जीवन कंठणार नाही, तो ट्रकड्रायव्हर तरी नक्कीच होईल. आपल्यापेक्षा त्याचं जीवन सुखी असेल...असेच काहीसे विचार त्याच्या मनात घोळत असावेत—

'ए, रिक्षा खाली है ?' दुसऱ्या एका गिऱ्हाइकाचे हे शब्द त्याच्या कानात लवकर शिरलेच नाहीत.

तेव्हापासून अनेकदा त्या छोट्या राजकुमारची मला आठवण येते. त्याच्यासाठी काहीतरी करावं असं वाटू लागतं. पण हा एकाच मुलाचा प्रश्न आहे का ? असे अनेक राजकुमार—अनेक छोटी बालकं असतील, ज्यांना कल्पनाही नसेल की आपल्या जीवनकळ्या पूर्ण विकसित होण्यापूर्वीच दारिद्र्याच्या जात्यात भरडल्या जाणार म्हणून !

● ● ●

# डोंगरदऱ्यात आणखी रेटला जाणारा वसईतील वारली

प्रभाकर म्हात्रे

माझे नाव चंदर, बापाचे नाव गोविंद, आडनाव घटाळ, वय सुमारे १४-१५ विचारलेवरून जबाब देतो की माझा बाप अगोदर मेला. त्यानंतर ३।४ वर्षांपूर्वी आई मेली (तेव्हा हा १० वर्षांचा होता). आईचे मढे जाळण्यासाठी आणि दिवस-पाणी करणेसाठी आमचे घर मी बांगीला २० रुपयाला विकले. घर विकले जागा नव्हे. पण बांगीने तिथे स्वतःचे घर बांधले. वरील अर्थाचा एका अनाथ वारली मुलाचा जबाब वसई मामलेदार कचेरीने १९७० साली नोंदला आहे. असेच आणखी ३।४ वारल्यांचे जबाब आहेत १९६८-६९ साली त्यावेळचे जिल्हा कलेक्टर श्री. महाजन यांच्या नजरेस वसई तालुक्यात वारल्यांना त्यांच्या जागांवरून हाकलून लावून तिथे स्मगलर ठाण मांडून बसत आहेत, असे झाल्यावरून त्यांनी वसई मामलेदारना या वारल्यांचे जबाब घेणेस सांगितले होते.

या जबाबानंतर शासनाच्या आदेशानुसार गटविकास अधिकारी आणि मामलेदार संबंधित गावाला येऊन पोचले. त्यांनी पंचायतीचे दप्तर पाहिले. त्यात सरकारी जमिनींचे बेकायदा धनदांडग्यांना वाटप झाल्याचे आढळून आले. वारल्यांना हाकलून लावल्याचेही कागदोपत्री दिसून आले. याच काळात स्थानिक राजकारणाला ऊत आला. सेनेला प्रतिसेना असा रंग चढला. एका गरीब कुंभाराने एक हॉटेल टाकले तो होता शिवसैनिक (खऱ्या शिवसेनेची त्याला काहीच माहिती नाही) लागलीच दुसऱ्या सेनेच्या सेनापतीने आणि सैनिकांनी उचल खाल्ली. हे हॉटेल मोडलेच पाहिजे. प्रतिज्ञा झाल्या. माजी सरपंचाने ग्रामसभेचा मोका साधून ठराव आणला. सर्व अतिक्रमणे काढून टाकण्यात यावीत असा ठराव पास झाला आता वारल्यांच्या जागा उपटणाऱ्यांना आनंद झाला. बोडकीने नववधूला आशिर्वाद द्यावा- मजसारखी हो ग- व तो आशीर्वाद फळाला यावा तसे त्यांना झाले.

वर्षामागून वर्षे लोटू लागली. अतिक्रमणे हटेनात. वारली आपल्या मूळ जागेवर येईनात. रहाट फिरतात, तसे कागद, कलेक्टर, प्रांत, मामलेदार पुन्हा मामलेदार, प्रांत, कलेक्टर असे वर्षानुवर्षे फिरत लागले. नियमाला अनुसरून आणि शासनाच्या रीतीप्रमाणे या रहाटगाडग्यात अनेक मामलेदार, प्रांत, कलेक्टर, आले गेले. १० वर्षाचा चेंदर आता २० वर्षांचा दोन मुलांचा बाप झाला; पण त्याला त्याची जागा मिळेना. कलेक्टर म्हणून ठाण्याला रंगनाथन् आले. जुन्या गजकर्णाला त्यांनी हात घातला. असख्य पेंडिंग कामे निकाली लावली. त्यात चेंदर आणि त्याचे सहदु:खी यांचे काम मार्गी लागले. मार्च ७३ मध्ये कलेक्टरसाहेबांचा अखेरचा आदेश घेऊन तहसीलदार घरत संबंधीत गावी हजर झाले 'तुम्ही १५ दिवसांत अतिक्रमणे मोडून जागा खाली करा. न पेक्षा शासन मोडून काढील आणि त्याचा खर्च वसूल करील.' अशी ताकीद झाली पुन्हा वग, वशिले, दंडपणे कुठे उपयोगी येतात काय याची शोधाशोध सुरू झाली. अल्पसंख्यांक, बहुसंख्यांक असल्या कसल्या तरी भपकेबाज पण पोकळ शब्दांची आतशबाजी सुरू झाली. किंचित धमक्यांनाही ऊत आला. पण मात्रा लागू पडेना. शेवटी कलेक्टरच्या हुकुमाविरुद्ध कमिशनर कोर्टात जाण्याचा निर्णय घेतला गेला. डोके चांगले लढविले गेले यात तिळमात्र शंका नाही. कलेक्टर कचेरीतील ६८ सालचे काम ७३ साली निर्णायक अवस्थेला पोहोचले. आता कमिशनर कचेरी म्हणजे ३-४ कलेक्टर कचेऱ्यांची वरिष्ठ कचेरी. तेव्हा साहजिकच चारनी गुणायला हरकत नाही. ६८ ते ७३ ६ वर्षे होतात. आता कमिशनरच्या कचेरीत चेंदरच्या झोपडीच्या जागेचे काम ६ चोक २४ वर्षे रखडत राहील असे गृहीत धरावयास हरकत नाही. १९९७ साली संबंधित गाव महामुंबईतील एक औद्योगिक केंद्र असणार. वारावर जागा जाणार. नियमानुसार वारल्यांना डोंगर कपारीत अगोदरच हाकललल असणार. त्यात चेंदर आणि त्याचे समदु:खी हाकललेले असणार. तेव्हा कमिशनरची कचेरी 'न्याय्य तत्वाला जागून अतिक्रमणे मोडा' म्हणूनही कदाचित आदेश देईल पण मूळ मालकांचे काय? त्यांचे त्यावेळी जवळपास अस्तित्वच नसणार. मग कमिशनरच्या आदेशास पुढची पुस्ती... मूळ मालक सापडत नसतील तर अतिक्रमणे मांडण्यात आली असे गृहीत धरून २४+६ तीस वर्षांची वहिवाट म्हणून अतिक्रमणे कायम करा असा आदेश निघण्याची शक्यता....

आणि हा दादू बीज. कै. अण्णासाहेब वर्तकांचा एकेकाळचा प्रामाणिक कूळ. अण्णासाहेबांनी पुढे ही जमीन ठाकूर नावाच्या माणसास विकली. कूळ म्हणून दादूच राहिला. दिवसामागून दिवस जात होते. ५७ साली निवडणुकीत भाऊसाहेब पडले. तत्पूर्वी अण्णासाहेब वारले होते. ६२ साली काहीही करून

भाऊसाहेबांना निवडून आणण्याचा चंग बड्या पाटलांनी आणि समाजकंटकांनी बांधला होता तालुक्यातील शासन त्यावेळी ज्या पद्धतीने वागले त्याला महाराष्ट्राच्या इतिहासात तोड नाही. ठिकठिकाणच्या बड्या पाटलांना गोरगरीब वारल्यांचे बळी देण्यात आले. यापैकी दादू बीज ह्या नागल्याचा एक वारली बळी होता. ह्या जमिनीची कूळ कायद्याप्रमाणे विक्री होण्यासाठी मामलेदारने दादूला समन्स काढले. पोलीसपाटलाने दादूला समन्सची दाद न लावण्याचा यशस्वी प्रयत्न केला आणि खोटा रिपोर्ट मामलेदारला हजर केला, की दादू मुद्दाम कुणाच्यातरी सांगण्यावरून हजर होत नाही. मालकाने अगोदरच पाटील मामलेदारला मॅनेज केले होते. मामलेदारने जमीन दादूकडून काढली. मालकाला दिली. 'दादू एवढ्या धक्क्याने वेडापिसा झाला आणि मरून गेला. दादूचा मुलगा विठ्ठल अनेक कोर्टे लढून थकला. मालकाच्या पैशापुढे विठ्ठल तोकडा पडला. विठ्ठलचे उभे पीक वसईच्या मामलेदारने मालकाला दिले. कलेक्टरने मामलेदारवर ठपका ठेवला. पब्लिक प्रॉसिक्युटरने विठ्ठलला पिकाचे पैसे द्यावेत असा सरकारला सल्ला दिला. ६ वर्षे लोटली पण विठ्ठलला पैसे मिळाले नाहीत. इकडे मालकाने कोर्टबाजीचा भडिमार विठ्ठलवर सुरूच ठेवला. विठ्ठल एक करुण वारली. आलटून पालटून गजाआड गजाबाहेर असे जीवन जगू लागला. त्याला बायको मुले आहेत. पण आज तो कोठे आहे? त्याची पोरे कुठे आहेत? बायको कुठे आहे? सारा संसार सुखाचा होता तो पाटील मालक कंपूने उध्वस्त करून टाकला. दादू वेडापिसा होऊन मेला तर त्याचा मुलगा विठ्ठल वेड्यासारखा कुठेतरी कसातरी जीव जगवीत आहे.

आणि ही जमनीबाई सोरा. नुकतीच विधवा झालेली. ५५-६० वर्षांची वारलीण. ७-८ एकर जमीन पदराला आहे. तिच्यावर टपलेले आहेत दलाल. या वारलीणीला हाकलून लावले, की जमीन घशात घालता येईल हे त्यांचे व्यावहारिक धोरण आहे. त्यांनी तिच्याच नातलगाला हाताशी धरून तिला सतावण्यास सुरुवात केली. तिच्यावरील अन्यायांना मुंबईच्या वृत्तपत्रातून वाचा फुटली आणि मिठाची गुळणी तोंडात ठेवून पोलिसांनी गुंडावर चॅप्टर भरली. पण पोलिसांचा आतून पाठिंबा गुंडांनाच आहे. नजिकच्या गावातील एक पाटील त्या जमिनीवर पापी नजर ठेवून आहे. तो पोलिसांना नेहमी मॅनेज करतो. गुंडांनी साक्षीदारांना कोर्टात न जाण्याएवढी दहशत निर्माण केली. मामलेदारजवळ केस सुरू असतानाच गुंडांनी जमनीबाईचा छळवाद काही थांबवला नाही. जमनी आपल्यावरील अत्याचाराच्या हकीगती मामलेदारला लेखी देतच होती, शेवटी त्या लेखी तक्रारींची चौकशी पूर्ण होण्यापूर्वीच आरोपींना मामलेदारने सोडून दिले आता विधवा जमनीबाईला घरदार, वतनवाडी, गुरेढोरे सोडून पळून

जाण्याशिवाय मार्ग राहिलेला नाही. सरकारनेच तिला तसे करणे भाग पाडले असे म्हणावयास हरकत नाही.

चॅप्टर केस हा या तालुक्यातील एक मोठा विनोद आहे शेट, सावकार, स्मगलर या खादीधारी देशभक्तांना त्यांच्या पापी मार्गात अडथळा आणणारा कुणी निघाला का पोलीस पहिला उपाय म्हणून अशा माणसावर सुरुवातीला चॅप्टर भरतात. सुरुवात चॅप्टरने होते. आणि शेवट I. P. C. ३०२ म्हणजे मर्डरचे कलम लावून खोटा खटला दाखल करून सतावण्यात होतो. ज्युडिशिअल कोर्टे पोलिसांची खोटचा खटल्याबद्दल निर्भत्सना करतात पण शासनाचे धोरण स्मगलर, जमिनदार यांना संरक्षण देणारे असल्यामुळे पोलिसांना हू म्हणण्याची ताकद शासनाजवळ नसते.

चॅप्टर ह्या मामलेदारजवळच्या केसेस असतात आणि प्राय: मामलेदार हा प्राणी आजकालच्या जमान्यात पुढाऱ्यांच्या तालावर नाचणारा असल्यामुळे त्याने काय करावे, कसे वागावे, काय लिहावे, काय लिहू नये, हे सर्व कायद्याच्या चौकटीत राहिलेले नसून तथाकथित पुढाऱ्यांच्या लहरीवरच अवलंबून राहते.

वसईच्या मामलेदार कचेरीतील ही एक विनोदी चॅप्टर केस पाहा—सरकार पक्षाचे 'प्रमुख साक्षीदार आरोपी विरुद्धच्या पोलिसाकडील अर्जात म्हणतात,' आरोपी नंबर एक हा नक्षलवादी आहे. तो वारल्यांच्या टोळचा तयार करून उभी पिके लुटतो, घातपाती प्रकार करतो. आरोपी नं. एकमुळे ह्या भागात नक्षलवाद सुरू झाला आहे, वगैरे वगैरे.'

पुढ लौकरच केस वसई मामलेदार पुढे सुरू झाली. तथाकथित नक्षलवादी आरोपी नं. एक स्वतःचा बचाव स्वत: करू लागला. साक्षीदार उलट तपासणीत सांगू लागला, आरोपी नं एकने आमची भाते कापली नाहीत, लुटली नाहीत, कुणाची लुटली ती पाहिली नाहीत.

येथपर्यंत ठीक आहे. पण साक्षीदाराचे घेतलेल्या उलट तपासणीतील पुढचे वाक्य वाचा——

'आरोपी नं. एकचे विरुद्ध माझी काहीही तक्रार नाही. भरलेल्या कोर्टात, देवाची शपथ घेऊन, सरतपासणीत अर्जातल्या मजकुराप्रमाणे आरोपी दरोडेखोर, नक्षलवादी, लुटारू आहे वगैरे बरळणारा सावकार—साक्षीदार तिथेच उलटतपासणीत शपथेवर सांगतो-आरोपी नं. एकबद्दल माझी काहीही तक्रार नाही. याला तुम्ही काय म्हणाल?

साक्षीदारांबद्दल काही म्हणू नका. त्यांच्या समाजद्रोही धंद्यांना संरक्षण देण्याची ठाणे पोलिसांची नीती जुनीच आहे.

पण मामलेदारांबद्दल काय म्हणाल ते सांगा. भरलेल्या कोर्टात देवाची शपथ घेवून साक्षीदार जेव्हा परस्पर विरोधी विधाने करतो किंवा खोटा

पुरावा देण्याचा प्रयत्न करतो अथवा खोटे बोलण्याचा प्रयत्न करतो तेव्हा ज्युडिशिअल कोर्ट अशा साक्षीदारावर न्यायालयीन कडक कारवाई करतात पण मामलेदार कोर्ट? मामलेदार कोर्टे साक्षीदार जर शेट-सावकार असेल आणि तो शपथेवर खोटे बोलतो आहे हे रेकॉर्डवर आले असले तरी अशा साक्षीदारांबद्दल निकाल पत्रात सहसा अवाक्षराने लिहित नाहीत.

दोन तीन वर्षांपूर्वी ठाणे येथील स्पेशियल मॅजिस्ट्रेट फॉर चॅप्टर केसेस, या मामलेदारांसमोर भिवंडी तालुक्यातील पाये या गावच्या ४–५ वारल्यांवरील चॅप्टर केसेस चालल्या होत्या. त्या वारल्यांनी अनेकदा अर्ज करून आपल्यावरील आरोपपत्र (चार्जशीट) मागितले. खरे म्हणजे आरोपींना कोर्टाने आरोपपत्रक मोफत द्यावयास पाहिजे. पण त्या मामलेदारांनी आरोपींना आरोपपत्र देण्याचे टाळले. पुढे आरोपींनी कलेक्टरकडे धाव घेतली. कलेक्टरनी ठाणे प्रांतांना चौकशी करण्यास सांगितले. ठाणे प्रांत श्री. पिंगुळकर यांना चौकशीत आरोपींचे म्हणणे खोटे नाही असे आढळून आले.

समाजकंटकांच्या काळ्या कृत्यांसाठी शासकीय अधिकाऱ्यांना वापरण्याचा वसई तालुक्यातील सराव आता अतिरेकाला पोहोचला आहे. नित्याच्या जीवनात लोकांचा संबंध कधी प्रांत, कलेक्टर, कमिशनर, डी. एस. पी यांच्याशी येत नसतो. तो संबंध मामलेदार, फौजदार यांचेशीच जास्त येतो. हे दोन अधिकारी कोण असावेत, त्यांनी कसे वागावे, कुठे जावे, कुठे जाऊ नये हे


एक वर्षाच्या यशस्वी वाटचालीनंतर
आता एक मे निमित्त

**कामगार–दिन विशेषांक**

पुण्यातील तापलेल्या वातावरणावर खास लेख
कामगारांच्या व त्यांच्या पुढाऱ्यांच्या मुलाखती

**मा गो वा**

राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक विषयांवरील
स्वतंत्र, पुरोगामी विचारांचे मासिक

संपादक : **सुधीर बेडेकर**
१२५९/२, जं. म. रस्ता, पुणे ४.
वार्षिक वर्गणी दहा रुपये फक्त

निदान या तालुक्यात तरी शासनावर फारसे अवलंबून नाही. तर स्वतःला वर्तकांचे कार्यकर्ते म्हणविणाऱ्या कार्यकर्त्यांवर ते अवलंबून आहे. त्यामुळे या कार्यकर्त्यांच्या दावणीतच लोकांना जीवन कंठावे लागते असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही.

खुद्द वसई तालुक्यात मामलेदार आणि फौजदार कचेऱ्यांवर त्या त्या जिल्हा यंत्रणेचा ताबा राहिलेला नाही. पोलीसखाते म्हणजे शिस्तीचे कडक आणि करडे व्रतधार; पण त्याही खात्याची शिस्त या तालुक्यापुरती वर्तक सेनेने पोखरून काढली आहे.

हा एक आहे पाटील. याच्या भावाचा धंदा राजरोस लोकांना टोप्या घालण्याचा आहे. समाजातील गोरगरीब लोकांनी आयुष्यभर हालअपेष्टा सहन करून किडूक-मिडूक जवळ केले असेल तर हा गंधाचे टिळे लावून, हरी! हरी!! करून त्यांचे किडूक-मिडूकही लुटतो खुद्द पाटील आणि त्याच्या पोरांनी दहशतीच्या वातावरणाने सामान्य लोकांचे जीवन विस्कळीत केले आहे. वसईच्या फौजदाराजवळ, डी. एस. पी. जवळ लोक तक्रारी करतात पण दाद लागत नाही.

मदन गोवारी या वारली पोराच्या जमिनीवर अतिक्रमण करण्यासाठी पाटील सशस्त्र घुसला. वारल्याने १०-१-७३ ला लेखी तक्रार नोंदविली. अनेकदा पोलिसांना विचारण्यात आले. एप्रिलच्या ३ तारखेला फौजदार चंद्रकांत साळवींनी बीट हवालदार चिपट्यांना निर्वाणीची नोटीस देवून २ दिवसात चौकशी करणेस सांगितले, न पेक्षा डी. एस. पी. ला बेशिस्तीचा रिपोर्ट करीन असे कळविले, हवालदार चिपट्याने फौजदारच्या नोटिसीवर जवळ जवळ लघुशंका केली. काय म्हणावे या पोलिसी बेशिस्तीला! या पाटलाकडे गरिबी हटाववाल्या कॉंग्रेस पुढाऱ्यांचे तळ पडलेले असतात. खाणे पिणे, रंगणे, धुंदणे येथे चालते, तालुका पंचायतीचे निर्णय अगोदरच पाटलाच्या बंगल्यात ठरतात. पाटलाला मामलेदार कचेरी, फौजदार कचेरी खाजगी मालमत्ता म्हणून वापरावयास मिळते. पाटलाच्या हुकूमावरून पाटलाच्या भक्ष्यासाठी २६ मैलांवर मध्यरात्री पोलीस धावतात; पण बाळू बरफच्या मढ्याला झटपट मूठमाती का दिली, अन्य वारल्यांना फासावर का जावे लागले, याची चौकशी करावयास पोलिसांना सवड नाही.

पाटलाच्या सांगण्यावरून मामलेदार वारल्यांच्या खोपट्यातून १०-१५ मण भात काढतो. पण नागल्याच्या पाटलांनी लॉन्चावरील माल राजरोस फरारी केला तर मामलेदार जांभई काढतो. वसई तालुक्यावर महाराष्ट्र शासनाचा ताबा नाही म्हणून तर म. टाईम्सवाले अग्रलेखातून मुख्यमंत्र्यांना हाक देतात—तुम्ही हस्तक्षेप करा. मुख्यमंत्री केव्हा जागे होतील?

• • •



नासिक जिल्ह्यातील आठ लाख आदिवासी

# एकात्म नियोजन हवे

रघुवीर मुळे

नासिक जिल्ह्यातील सह्याद्रीच्या रांगेत प्रामुख्याने आदिवासींची वस्ती आहे. या विभागात ठोकळमानाने इगतपुरी, पेठ, सुरगाणा हे संपूर्ण तालुके, दिंडोरी, कळवण, बागलाण तालुक्याचा पश्चिम भाग यांचा समावेश होतो. महाराष्ट्र शासनाने आदिवासींची लोकसंख्या जेथे साठ टक्क्याहून अधिक आहे, त्या विभागाच्या विकासासाठी आदिवासी विभाग विकास गट पाडलेले आहेत. वरील भाग या गटात मोडतो. सिन्नर व नांदगाव तालुक्यात मात्र आदिवासींची संख्या २० टक्क्याएवढी आहे.

साठ टक्क्यावर ज्या ठिकाणी आदिवासींची वस्ती आहे, त्यात कोकणी

आदिवासींचा भरणा असून त्याच्या खालोखाल भिल्ल, कोळी, आदींचा समावेश आहे तर नासिक व इगतपुरी तालुक्यात ठाकूर जमातींचा व त्या खालोखाल कोळी जमातीचा.

नासिक जिल्ह्यातील आदिवासींची संख्या १९६१ च्या शिरगणतीप्रमाणे ६ लक्ष एवढी आहे, तर १९७१ मध्ये हाच आकडा दोन लाखांनी जवळजवळ वाढलेला आहे. जिल्ह्याच्या २४ लक्ष लोकसंख्येच्या प्रमाणात तिसऱ्या हिश्या-एवढे असलेले आदिवासींना जिल्ह्याच्या विकासाचा फायदा तिनशेव्या हिश्या-प्रमाणे तरी मिळाला आहे की नाही ? तर याचे नकारात्मक उत्तर आल्या-शिवाय राहाणार नाही.

आदिवासी जनतेच्या विकासाबाबत मी अनेक आदिवासी जननेत्याशीच चर्चा केली. त्यांच्या अडीअडचणी,समस्या व त्यावर त्यांनीच सुचविलेले उपाय आणि आजवर त्यांच्यासाठी राबविण्यात आलेल्या योजनांची फलश्रुती या लेखा-तून सांगण्याचा हेतू आहे. आदिवासींच्या विकासाचा कार्यक्रम जर परिणाम-कारकरीतीने राबवायचा असेल तर तो शिक्षण (Education), दळणवळण (Communication) आणि पाणी पुरवठ्याच्या योजना (Irrigation) या तिन्ही क्षेत्रांना प्राधान्य देवून राबविण्यात यावा.

आदिवासी विभागातून आज प्राथ-मिक शाळा जिल्हा परिषद चालविते. बोटावर मोजण्याइतक्याच ठिकाणी माध्यमिक शाळांची सोय काही खाजगी शिक्षणसंस्थांनी केलेली आहे. पश्चिम विभागात प्रामुख्याने ज्या प्राथमिक शाळा आहेत त्यातून विद्यार्थ्यांची जी हजेरी दाखविली जाते ती कित्येकदा खोटी असते. या शाळा मारुतीच्या मंदिरात किंवा चावडीत भरविल्या जातात. आदिवासी विभागात अद्याप प्राथमिक शाळांच्या इमारतीही अनेक गावातून नाहीत, ही गोष्ट स्वातंत्र्य रौप्यमहोत्सवी वर्ष साजरे करणाऱ्या शासनाला खचितच भूषणावह नाही. आदिवासी विभागात आजही दैन्यावस्था इतकी भयानक आहे की मुलांना शाळेत पाठविण्याऐवजी मोलमजुरीच्या कामाला पाठवून एकवेळेची चूल पेट-विण्याची सोय करावी लागते. अनेक प्राथमिक शाळा एकशिक्षकी शाळा आहेत. एकाच शिक्षकाला तो कितीही उत्साही असला तरी चार वर्ग (अस-ण्याची शक्यता कमीच !) सांभाळणे, मुलांना शाळेत पाठवा म्हणून आदि-वासी पालकांची मने वळविणे हे अजि-बात शक्य होत नाही. आदिवासीत जर शिक्षणाची ओढ खरोखरच निर्माण करावयाची असेल तर तेथं आश्रमशाळां-चीच स्थापना होणे अगत्याचे आहे. इगतपुरीच्या पश्चिमेकडील आदिवासी भागातच पाहिले तर एक त्र्यंबकेश्वर गाव अपवादासाठी सोडले तर ७० गावात एकही माध्यमिक विद्यालय नाही पेठ तालुक्यात चिंचवड आणि पेठ ही दोन गावे सोडली तर १७५ गावात दुसरे हायस्कूल नाही. तीच

पृष्ठ ४१ वर



# प्रवाह

अशोक म. पटवर्धन

सकाळची वेळ.

दूरवर नक्कीच कोठेतरी पाऊस झाला असला पाहिजे.

मठातील पूर्वेकडच्या खांबास टेकून शास्त्रीबुवा बसले होते. वातावरणातला फरक तसा जाणवतच होता. नेहमी मठाच्या पूर्वेकडील मखरीतून डोंगरांच्या रांगा अगदी स्पष्ट दिसायच्या. आज तेथे धुरकटपणा वाटत होता. सहसा अंगरखा न घालताच शास्त्रीबुवा फिरत असत. पण आज पाठीला संगमरवरी खांबाचा गारगार स्पर्श शिरशिरी आणत होता.

मांडीखालची लादी गारगार लागत होती. म्हणून शास्त्रीबुवांनी एक पाय जवळ ओढून घेतला. संपूर्ण ओवरी बाकी शांत होती बुवांच्याच उजव्या हाताला जमिनीवर काळ्या पत्थरात कोरलेले कासव होते. त्याच्या पाठीवर भक्तांनी नवस बोलले. चांदीचे रुपये ठोकले होते. काही वर्तुळे रिकामीच होती. रिकाम्या वर्तुळात साचलेल्या साखरेच्या दाण्यातून मुंगळे, काळ्या मुंगळ्या इतस्तत: फिरत होत्या. एखाद-दुसरा मुंगळा शास्त्रीबुवांच्या मांडीवर हलकेच चढायचा "छ्या छ्या!" ओवरीतसुद्धा काय ही अस्वच्छता, विष्णू सफाई करतो की नाही" बुवा मांडी झटकत स्वत:शीच पुटपुटले. त्या खोलखोल मंडपात तोही आवाज घुमला. बुवा शांत होते. भक्तगण यायला अजून वेळ होता.

पूर्वेकडच्याच भव्य, गुळगुळीत भिंतीवरील दोन शिसवी खुंट्यामध्ये पालखी टांगून ठेवली होती. दर अष्टमीस पालखी निघायची. पालखी लाल जमखान्याने झाकली होती. जमखान्याचा एक सुटा पदर वाऱ्याने फडफडत होता. त्याच्यावरील जर चमकत होती.

बराच वेळ शास्त्रीबुवा पालखीकडे पहात विचार करीत होते. आज नव्वद वर्षे ही पालखी आपल्या पिढीने चालविली. पणजोबांनी, आजोबांकडे, आजोबांनी वडिलांकडे व वडिलांनी आपल्या सुपूर्द केली. एकाही अष्टमीला पालखी चुकली नाही. इतरही माणसे गेली, पिढ्या बदलल्या, भक्तगण वाढले, कमी झाले, बदलले, तरी पालखी चालूच राहिली आहे आणि अशीच चालणार आहे. आपण फक्त तिचे ओझे वहायचे, हुकमाचे ताबेदार.

मंडपाचे भव्य छत शांत होते. छताला रंगीबेरंगी झुंबरे टांगली होती. गोल अंडाकृती विविध हंड्या होत्या आणि लोलकातून सप्तरंगी किरणे लादीवर पसरत होती. एकच एक टिटवी शांततेचा भंग करीत होती. तिचा आवाज संपूर्ण शांतता चिरत होता. आणि छत इतके विशाल होते की टिटवीचा वेध घेणेसुद्धा कठीण होते. संपूर्ण गृहात तो आवाज घुमत होता.

बुवांची नजर शांतपणे फिरत होती. ओवरीच्या पायऱ्या ओलांडून गेले की एक नंदी होता. त्याच्याभोवती बेल, समिधा, फुले इत्यादी निर्माल्य साचले होते. नंदीची बैठक लाल मुंग्यांनी भरून गेली होती. नंदीच्या उजव्या अंगाला कमरेइतक्या उंचीचे संगमरवरी तुळशीवृंदावन उभे होते. त्यातल्या मातीच्या भेगा स्पष्ट दिसत होत्या. तुळशीच्या मंजिरा झडल्या होत्या. टिटवीच्या कोलाहलाने बुवा अस्वस्थ झाले. "विष्णू! विष्णू! विष्णुबाळा इकडे ये."

संपूर्ण ओवरीभर आवाज घुमला. प्रत्येक संगमरवरी खांबाखांबातून फिरून तो खोलखोल छतापर्यंत भिडला. सत्तावीस पायऱ्या चढून तो गजाननाच्या बैठकीपर्यंत, मग संपूर्ण गाभाऱ्यामध्ये घुमला. ष्णुऽविऽष्णुऽविऽ असे प्रतिध्वनी घुमत राहिले. उत्तर आले आहे

नाही. "विष्णू!" शास्त्रीबुवांनी दग्ध स्वरात आरोळी दिली. नंदीवरच्या लाल मुंग्या क्षणभर थबकल्याचा भास झाला. संगमरवरी खांब थरथरत राहिले.

दुसऱ्या हाकेस, पितांबर विस्काळीत झालेला विष्णू पंचा सावरीत गाभाऱ्याच्या पाठीच्या द्वाराने आला. सत्तावीस पायऱ्या उतरून दीर्घ सभागार ओलांडून तो आला. डोळे लाल दिसत होते. अजूनी जानव्याचा एक पदर कानावर लोंबकळत होता.

"छया! छया! अभद्र स्नानानंतर व संध्यच्या आधी हा विटाळ अभद्र!" त्याचे जानवे पाहून बुवा म्हणले, "देहधर्म! गुरूजी नाईलाज झाला मी पामर आहे!" विष्णू उत्तरला ह्यावर बुवा शांत झाले.

विष्णूला ठाऊक होते. पापपुण्य, 'अभद्र, विटाळ ह्यामुळे बुवा अस्वस्थ व्हायचे. पण देहधर्म म्हटले की निःशब्द होत. कारण तो वेदांतच दिला आहे.' "बरे ठीक आहे, त्या टिटवीस हाकलून लाव. नंदीपाशी कापराच्या वड्या विखरून ठेव. हिंगूळ नको, विषारी द्रव्य ते! पाप नको घडायला. त्या वृंदावनास पाणी घाल. शिष्यांनो तुम्ही करता तरी काय दिवसभर? तुळस वाळत चाललीय."

पंचा सावरत विष्णू टिटवीस शोधत होता. विष्णू हा भिक्षुणीने टाकलेला पोर, स्वामींच्या सांगण्यावरून बुवांनी त्यास पोसला. स्वामींची पुण्याई किती थोर! पण हा अभद्रच निपजला. चोरून मद्य सेवन करतो म्हणे. पारोसा गाभाऱ्यात जातो. कुणब्याच्या घरी मच्छीही खातो म्हणे. तीर्थ देताना अभद्र दृष्टीने बायकांकडे पाहतो. छे! छ! हाहाकार! अभद्र पण ह्याचे डोळे कसे फुटत नाहीत! की ह्याच्या दैवास गजानन काहीच कसे करू शकत नाही. भर जत्रेत एका गावगुंडाने श्रीच्या मूर्तीची विटंबना केली. हातपाय उध्वस्त केले. आणि दुसऱ्या दिवशी त्याचे पाय गेले. मग ह्यालाच कसे काही होत नाही.

टिटवीच्या मागे विष्णू धावत होता. पंचा झटकून तिला भिववत होता. एका मखरेतून दुसऱ्यात, एका झुंबरावरून दुसरीकडे टिटवी उडत होती. मध्येच एखाद्या हंडीस धडकत होती. लोलकाचा खळ्खळ् आवाज होत होता. विष्णू धामाधुम झाला होता. टिटवी चोच उघडी ठेवून धपापत होती. विष्णू पुन्हा पुन्हा पंचा उडवून तिला हाकलत होता.

टिटवी जी थेट उडाली ते, सर्व हंड्या पार करून, संगमरवरी खांब मागे टाकून गजाननाच्या बैठकीवर गेली. पायऱ्या ओलांडून विष्णूही मागे गेला. टिटवी थेट गाभाऱ्यातून उडत गेली. गजाचे दार असलेला गाभारा उघडाच होता. टिटवी फिरून गजाननाच्या सोंडेवरच जाऊन बसली.

"अभद्र विटाळ पाप! बुवा अस्वस्थ झाले. हे असे का व्हावे. टिटवीच्या कपाळी पाप, विटाळ नाही काय? का हे सर्व खोटे आहे? बुवा फारच अस्वस्थ झाले. बरे हे आजचे नाही. आज अनेक वर्षे त्यांना हे प्रश्न छळत होते. विष्णूने

टिटवीस हाकलली होती. शास्त्रीबुवा बसले होते तेथून गाभाऱ्याचा दर्शनी भाग स्पष्ट दिसत होता. गज असलेले गाभाऱ्याचे दार दिसत होते. चित्र-विचित्र आकृती निर्माण करीत बाहेर पडणारा उदबत्त्यांचा धूर दिसत होता. तेवणाऱ्या समयांच्यामुळे मंद मंद प्रकाश मूर्तीभोवती पसरत होता. त्या मंद पार्श्वभमीवर मूर्तीच्या अंगावरील दागिने खुलून दिसत होते. चमकत होते. उजळत होते. डोक्यातील हिऱ्यामुळे अनेक किरण परावर्तीत होत होते. वेगवेगळ्या अंशातून फिरत होते.

शास्त्रीबुवा मूर्तीकडे एकटक पहात होते. ह्याच गजाननाने आपल्या सौभाग्यवतीचा सडलेला पाय बरा केला. याच्या फक्त तीर्थाने सर्पदंश उतरवला, महाराच्या पोराचा. त्याला बोललेला नवस कधीच चुकत नाही.

बुवांची नजर अलंकारावर स्थिरावली. ह्याची किमत किती सहस्र होईल. छे! छे! नको तो पापी विचार. किरीस्तावांच्या अंमलापासून आपल्या मनातसुद्धा पाप वाढलंय.

"नाहीतरी सध्या, श्रीमंत प्रतिष्ठित असलेला हरीदास आधी देवळातील पुजारीच होता की! देवालयातील सर्व संपत्ती घेऊन तो दक्षिणेकडून पळून आलेला चोरच आहे."

पूर्वेकडच्या मखरीतून आता डोंगर अस्पष्ट दिसत होते. पावसाची भुरभूर सुरू झाली होती. हवेतला सर्दपणा वाढला होता. वातावरण कुंद वाटत होते. गारवा नाकाला सुरसुरी आणत होता. पण मधून मधून उन्हाचे कवडसे येत होते.

बुवांचे लक्ष दीपमाळेकडे गेले. मघाशी दीपमाळेच्या उच टोकाला असलेला कवडसा आता खाली उतरला होता. 'चला वेळ झाली, उठले पाहिजे' स्वत:शीच पुटपुटत बुवा उठले.

पायाला मुंग्या आल्या होत्या. बैठकीच्या पायऱ्या चढून ते वर आले आणि गाभाऱ्याच्या उजव्या अंगाच्या दाराने आत जाणार इतक्यात थबकले. श्री च्या उजव्या पायावर काळीशार इगळी बसली होती. 'विटाळ, छे! छे' बुवा पुटपुटले. मुसळ घेऊन पुढे सरसावले, पुन्हा थबकले. 'हत्या पाप। बरे ह्या न मारले तरी ती दर्शनास येणाऱ्यांना चावणार, बघून दुर्लक्ष ते तर महापाप...' बुवा परत फिरले 'कुजून काळे पडलेले निर्माल्य असेल ते इंगळीसारखे भासणारे, नरो वा कुजरो वा' स्वत:चो समजूत घातली.

दालन ओलांडून बुवा आत गेले. पळ्यापंचपात्रांचा खणखणाट ऐकू येत होता. मृगाजिनावर ओळीने शिष्यगण बसले होते. संध्या चालू होती. पितांबरावर उन्हाचे कवडसे पडून तो चमकत होता. आचमने चालू होती. कुणाची संध्या संपत आली होती तर कोणी नुकताच बसलेला शिष्यगण 'केशवाय नम:' आचमने करीत होता. विष्णूही संध्या करीत होता. तो नुकताच बसला होता. बुवांचे त्याच्याकडे लक्ष होते. 'केशवाय नम:' विष्णुने आचमन केले. आणि लगेच 'ऋषिकेशाय नम:

प्रद्युमनाय नमः 'ची आचमने करू लागला. मधली आचमने टाळली होती. येरझाऱ्या घालीत काही क्षण बुवा उभे होते. दालनाच्या अंग प्रत्यंगावर वेद-वाक्ये लिहिली होती. आज अनेक वर्षे बुवा ती वाक्ये वाचत आले होते. दक्षिणेकडच्या खिडकीतून बुवांनी डोकावले, प्रचंड भव्य सभामंडप दिसत होता महायज्ञाचा आज आठवा दिवस, सात दिवस पार पडले. एक मोठा सोहळा आज संपणार होता. दर सहा वर्षांनी एकदा ह्याप्रमाणे आज छत्तीस वर्षे हा यज्ञ होत आला होता. स्वामींनी आपल्या गुरूच्या प्रेरणेने हा यज्ञ सुरू केला. शांतीसाठी, जगातील पाप नष्ट करण्यासाठी, शेकडो मैलांवरून, सहस्र कोसावरुन लोक येत आहेत. खडकाळ डोंगराची, उन्हा-पावसाची पर्वा न करता येत आहेत, पैसा धान्य देत आहेत. सहस्रावधी लोक लाभ घेत आहेत. अठ्ठावन्न वर्षांचे वृद्ध स्वामी स्वतः मंत्र-घोष करतात हवनाच्या वेळेस. आज एक वर्ष ते अत्यावस्थ आहेत. आजचा दिवस पार पडला म्हणजे झाले. स्वामींची पुण्याई थोर, गाढ तपश्चर्या, स्वामींच्या आठवणीने बुवा भारले गेले. त्यांनी डोळे मिटून हात जोडले. 'मी पामर आहे.'

'स्वामींच्या दर्शनाची वेळ संपली असेल. दुग्धाहार व्हायला हवा आणि यज्ञाची गडबडही सुरू होईल. वेळ क्षण-मात्र दवडता कामा नये.' बुवांनी विचार केला. स्वामी बुवांच्या खेरीज इतर कुणाकडूनही सेवा घेत नसत.

दालन पार करून बुवा बाहेर पडले. ते पटांगणात आले. हिरवळीवर काही भगवी वस्त्रे धारण केलेले कमंडलू-धारी भिक्षुक एकमेकाशी मस्करी करीत होते. बुवांना पहाताच ते गप्प झाले. सर्वत्र दाट झाडी होती. ओलसर हिरवळ झुलत होती हरिणीचे पिलू झुलत होते. संगमरवरी हौदात निर्माल्य साचले होते. भोवती तुळशीची दाट झाडे होती. मोगरा-गुलबक्षीची झाडे होती. शेजारच्या तळयात बदके डुलत होती. कमरेइतक्या पाण्यात एक शिष्य अस्पष्ट सूर्यावर नजर स्थिर करून उभा होता.

बुवा वडाच्या झाडाच्याही पुढे गेले. दोनशे वर्षांचा जुना वृक्ष, कितीक पिढया बदलल्या, पण तो स्थिर आहे. स्वामींच्या कुटीपाशी ते पोहोचले. भाविकांची गर्दी ओसरली होती. दर्शनाची वेळ संपत आली होती. काही शिष्य भाविकांची गर्दी सावरत होते. बुवांना पाहताच ते स्तब्ध झाले, लोक बाजूला झाले. बुवा आत गेले.

पर्णकुटीच्या मध्यभागी शिसवीच्या मंचकावर व्याघ्रचर्म अथरले होते. त्यावर महाराज पहुडले होते. मुद्रा खंगलेली होती, शरीर जीर्ण झाले होते. पण त्वचेवर सोनेरी तेज होते. मधेच डोळे खोल होते. मिटलेले होते. स्वामी डोळे उघडत होते. डोळयात सप्तसूर्याचे तेज होते. चेहऱ्यावर हास्य होते. समाधान विलसत होते. स्वामींना बघितले की भाविक भारावून जात होते. डोळे मिटून हात जोडत होते.

कोणी त्यांच्या पादुकांवर डोके ठेवीत होते. कोणी भारावून जाऊन त्यांच्या मुद्रेकडे स्तिमित होऊन कित्येक क्षण पहात होते. कोणी अगतिकपणे उभे होते. स्वामींच्या शुभ्र जटात चेहरा झाकला गेला होता. अत्यंत हळुवारपणे स्वामी श्वासोच्छवास करीत होते. ते करीत असताना होणारे कष्ट त्यांच्या चर्येवर क्षीणपणे उमटत होते. पण महाराज शांत होते. त्यांच्या तेजाने सारा आसमंत भारावून गेला होता. स्वामींचे वय अठ्ठ्याणव वर्षे. अठ्ठ्याण्णव वर्षांची सेवा. सर्व आयुष्य ईश्वरी सेवेत गेले. साक्षातत्कारी पुरुष. गेले वर्षभर स्वामींची प्रकृती ठीक नव्हती. ते अत्यवस्थ होते. कष्ट सोसवत नव्हते. उठताबसताही येत नव्हते. मंचकावर पहुडललेल्या अवस्थेत स्वामी दीक्षा देत, दर्शन देत. भक्तांशी क्षीण संवाद करीत. स्वामींनीच यज्ञ सुरू केला. आज छत्तीस वर्षे यज्ञ अव्याहत चालू होता. अत्यवस्थ असून सुद्धा स्वामी मधून मधून मंत्रघोष देत. गेले आठ दिवस स्वामी न चुकता क्षीण आवाजात मधून मधून मंत्रघोष देत होते.

स्वामींच्या उजव्या अगास बुवा बसून होते. भाविकांची गर्दी शिष्यगण बाहेरच थोपवीत होते. कारण दर्शनाची वेळ संपली होती. थोड्याच वेळात यज्ञ सुरू होणार होता.

भाविक हळूहळू सरकत होते. कोणी स्वामींच्या पायाशी केळी, नारळ, गुळ-खोबरे, फुले, तांदूळ, पैसा अर्पण करीत होते. धान्याचा ढीग वाढत होता. पैशाचे एक तबक संपूर्ण भरले होते. बुवांचे त्यावर लक्ष होते. समया तेवत होत्या. उदबत्तीचा सुगंध वातावरण भरून टाकत होता. फुलांचा सुगंध दरवळत होता. एक गहरी शांतता पसरली होती.

गर्दीतून एक धनगर पुढे आला. महाराजांच्या पायाशी त्याने नारळ ठेवला. महाराजांच्या पादुकांवर डोके ठेवून तो बसून राहिला. त्याचा चेहरा अत्यंत दुःखी होता. गहिवरला होता.

'महाराज, स्वामी महाराज!' भारलेल्या क्षीण आवाजात तो पुटपुटला. महाराज काही वेळ स्तब्ध होते. थोड्या वेळाने त्यांनी क्षीण हालचालींनी डोळे उघडले. डोळ्यांतून हिऱ्याहूनही तेजस्वी किरण अंशात्मक फिरत होते

'बोल वत्सा, काय इच्छा आहे.' अत्यंत दुर्बल पण तेजस्वी आवाजात त्यांनी विचारले.

'महाराज, जंगलच्या फुफाट्यात काल माझी मुलगी जळून मेली. काही कल्पनासुद्धा नव्हती. एकुलती एक पोर. शेवटचे दर्शनसुद्धा झाले नाही. महाराज एकदाच! फक्त एकदाच दर्शन करवा महाराज! पोर कायमची गेली. दुरावली.' कुणबी घसा फोडून रडत होता. त्याला माहीत होते, कित्येक मृत माणसांचे दृष्टांत महाराजांनी दिले होते. मृत व्यक्तीच्या नातेवाईकांबरोबर संभाषण करविले होते.

महाराज काही क्षण स्तब्ध होते. 'नैनं छिन्दन्ति शस्त्राणि, नैनं दहति पावका' धनगर बघत राहिला.

आता बुवा पुढे झाले. 'तुझी मुलगी

नष्ट झाली नाही आणि होऊ शकणार नाही ' सोप्या भाषेत त्यांनी अर्थ सांगितला.

धनगर पुटपुटला, 'पण तिची केव्हाच माती झाली की! आता ती पुन्हा कशी भेटणार.' धनगर तसाच बसून राहिला. बुवांनी खूण केली, तरी उठला नाही. शेवटी एका शिष्याने त्यास बाहेर काढले.

आता दुसरा एक शेतकरी पुढे आला. शेताच्या लगत असलेल्या दुसऱ्या शेतकऱ्याशी कायदेकानूनची त्याची भांडणे होती. त्यासंबधी त्याने विचारले.

खरे तर असल्या लोकांबद्दल आणि असले प्रश्न विचारणाऱ्याबद्दल बुवांना तिरस्कार होता. पण नाईलाज.

पुन्हा काही क्षण महाराज स्तब्ध राहिले. मग उद्गारले, 'पाप वाढले आहे. प्रार्थना कर. तमसो मा ज्योतिर्गमय!' बुवांनी पुन्हा त्या शेतकऱ्यास सोपा अर्थ सांगितला.

शेतकरी बाजूला झाला, पण 'पाप आधी किती होते आणि आता कुठे वाढले आहे, अधार मला का दिसत नाही' असे त्याच्या चेहऱ्यावर भाव होते.

हरदास सरसावला. बुवांना त्याच्याबद्दल द्वेष वाटत होता. 'दक्षिणेकडचा हा चोर, भामटा, पक्का पापी आहे.' महाराजांना अंतर्ज्ञान आहे. ह्याला स्पर्शसुद्धा करू देऊ नये. महाराजांनी दर्शनसुद्धा देऊ नये.' बुवांना खात्री होती, ह्या पापी माणसावर स्वामी क्रुद्ध होतील, शापवाणी उच्चारतील,

महाराजांच्या पायांशी हरीदासने हिऱ्याची आंगठी अर्पण केली. 'महाराज ह्या सेवेचा स्वीकार व्हावा, हीच विनंती आहे.'

महाराजांनी क्षीण हालचालीनंतर डोळे उघडले. हात उंचावून ते म्हणाले, 'तथास्तु'

बुवांना आश्चर्याचा धक्का बसला. हे काय झाले. बुवा गोंधळून गेले. 'पाप-पुण्य ह्याला काही अर्थ आहे की नाही?'

दर्शनाची वेळ संपली होती. शिष्यगण भाविकांना हटवत होते. हळूहळू गर्दी कमी झाली. आता कुटीत कोणीच नव्हते. शिष्यही यज्ञाच्या तयारीसाठी गेले. काही क्षण बुवा तसेच बसून राहिले. त्यांचे तबकाकडे लक्ष गेले. तीन तबके नाण्यांनी भरून गेली होती.

थोड्या वेळाने बुवा पुढे झाले. केशरी दुधाचा पेला त्यांनी हाती घेतला. 'महाराज, दुग्ध प्राशन करता ना?'

महाराजांनी क्षीण होकार दिला. पळीच्या सहाय्याने बुवा थेंब थेंब दूध महाराजांच्या मुखी घालत होते. तीन-चार थेंब घातल्यावर महाराजांनी हातानेच 'बस्स्' म्हणून खूण केली.

हात जोडून बुवा महाराजांच्याकडे भारलेल्या नजरेने एकटक पाहू लागले. समस्त हिमालय पालथा घातलेला हा बालयोगी, वयाच्या पाचव्या वर्षी गीता मुखोद्गत केलेली. जवळजवळ पंचाण्णव वर्षांची ईश सेवा, केवढी पुण्याई, महान तपश्चर्या, ह्या देहाचे सार्थक केले. छत्तीस वर्षे अखंड महायज्ञ केला, किती पापक्षालन केले. असेच सत्पुरुष जन्माला यावेत.

इतकी श्रेष्ठ तपश्चर्या, मग हा सत्पुरुष आपले आयुष्य आणखी वाढवत का नाही. इहलोकीचा अंधःकार तरी कमी होईल ह्या असामान्य युगपुरुषाचे आयुष्य असामान्यच असावयास हवे.

महारोग्यास केवळ स्पर्श करून बरे करणारा हा योगी, मग ह्याचे स्वतःचे अवयव इतके क्षीण का झालेत. गात्रे शिथिल पडलेली आणि दृष्टी अधू झालेली, असे का?

ह्या अंतर्ज्ञानी महायोग्याने पापी हरदासाला प्रायश्चित्त का घडवले नाही. उलट तथास्तु म्हटले.

आज छत्तीस वर्षे हा यज्ञ चाललेला. प्रत्येक वेळी स्वामींनी आहुती स्वहस्ते दिली. गेले वर्षभर यमाचे पाश गळ्याभोवती आहेत. आज तर ते फारच अत्यवस्थ आहेत. यज्ञाचा आजचा शेवटचा दिवस, शेवटची आहुती स्वामींच्याच हस्ते पडावयास हवी. यज्ञाची समाप्ती यांच्याच हस्ते व्हावयास हवी. आजचा दिवस पार पडेल काय की ही इहलोकीची यात्रा स्वामी अचानक संपवणार आहेत.

पण बुवांना खात्री होती, विश्वास होता. हा अंतर्ज्ञानी पुरुष, त्याला ह्याची कल्पना नक्कीच असेल. आपला अंत तो एक दिवसच काय पण एक सहस्र वर्षेही पुढे ढकलू शकेल. नाहीतर एवढ्या तपश्चर्येचा, पुण्याईचा अर्थ काय. इहलोकीच्या पातकांचा नाश करण्यासाठी हा यज्ञ आरंभलेला; निश्चितच तडीस जाईल. सत्याचा, पावित्र्याचा, पुण्याईचा नेहमीच विजय असतो.

बुवा तंद्रीतून भानावर आले. त्यांनी स्वामींकडे पाहिले. 'महाराज' बुवा म्हणाले. हाताच्या खुणेनच स्वामींनी बोल म्हणाले. 'महाराज, आज छत्तीस वर्षे आपण हा यज्ञ केला. आज यज्ञाचा शेवटचा दिवस. शेवटची आहुती आपल्या कृपाप्रसादाने पडावी, आपल्या साक्षीने यज्ञाची समाप्ती व्हावी अशी इच्छा आहे. आपली कृपा असावी महाराज, आजचा दिवस आपल्या सामर्थ्याने पार पडावा. कोणत्याही प्रकारचे विघ्न येऊ नये अशी अपेक्षा आहे. महाराज, इच्छा पूर्ण होईल काय?

महाराज काही वेळ स्तब्ध राहीले. नंतर ते क्षीण हसले. 'वत्सा! हा प्रवाह आहे प्रवाह!:

'कर्मण्येवाधिकारास्ते :'

नंतर महाराज स्तब्ध राहिले. बुवांना काहीच बोध होईना, काय करावे ते समजेना.

'यज्ञाची पूर्ण तयारी झाली असेल-पहावयास हवे.' महाराज यज्ञाची व्यवस्था पहावयाची आहे. आज्ञा असावी.'

स्वामींनी हातानीच खूण केली.

कुटीतून बुवा बाहेर आले. वडाच्या झाडाच्या गर्द छायेतून पुढे निघाले. तळ्यामध्ये बदके पोहतच होती. शिष्यांची गडबड चाललेली दिसत होती. कोणी समिधा घेऊन चालले होते. कोणी फुले वेचत होते, कोणी दर्भ साफ करीत होते, कोणी यज्ञासाठी आहुती घेऊन चालले होते. सर्वजण गडबडीत होते. बुवांना पाहताच ते स्तब्ध झाले. सर्व

तयारी झाली काय. बुवांनी विचारले. 'होय गुरुजी, सभामंडपात सर्व तयारी होत आली आहे. ब्राह्मण, पंडित, वेद-पाठक, उपाध्याय जमलेले आहेत, लोकांचा पूर लोटलेला आहे.' एक शिष्य उत्तरला.

पटांगण पार करून बुवा सभा-मंडपाकडे वळले. दुरूनच लोकांचा कोलाहल ऐकू येत होता. बुवांनी सभा-मंडपात प्रवेश केला.

सभामंडप प्रचंड, भव्य व विस्तीर्ण उभारला होता. छताला आधार देण्या-साठी शेकडो खांब जागोजागी उभे केले होते. मंडपात गर्दी उसळली होती. कित्येक लोक सकाळीच येऊन बसले होते. सहस्रावधी लोकांची क्षणाक्षणाला भर पडत होती. लोकांचा प्रचंड सागरच जणू लोटला होता. स्त्रिया होत्या, पुरुष, तरुण, वृद्ध, गरीब, श्रीमंत, व्यापारी सर्व तऱ्हेचे लोक जमले होते. आस-पासच्या परीसरातील शेकडो मैलांवरून लोक आले होते. शिष्यगण गर्दीमधून फिरत होते. गर्दीला योग्य वळण देत होते. बसण्याची व्यवस्था करीत होते. मंडप इतका प्रचंड होता. की एका टोकाला उभे राहून पाहिले तर चवडे ऊंचावून, मान ताठल्याशिवाय दुसरे टोक दिसत नव्हते.

सभामडपात ठिकठिकाणी झुंबरे लावली होती. ठिकठिकाणी मुद्दाम लोकांच्यासाठी पाणपोया उभारल्या होत्या. गर्दीतून काही लोक रुद्राक्षाच्या माळा, मृगाजिन घेऊन फिरत होते. ठिकठिकाणी वेदवाक्ये लिहिली होती. अंतरा अंतरावर यज्ञासाठी धान्य, कड-धान्ये, पैसे व विविध वस्तु मदत म्हणून स्वीकारले जात होत्या. लोक मुक्तहस्ते मदत देत होते. तांदूळ, मूग, नारळ, सुपाऱ्या ह्यांचा खच पडला होता. खारकांच्या राशी लागल्या होत्या शिष्य ह्या वस्तू गोणीने भरभरून कोठारात नेत होते. गर्दीतून तबके फिरत होती. काही क्षणात ती नाण्यांनी भरून परतत होती. प्रत्येक विभागाची व्यवस्था एकेकावर सोपवली होती.

सभामंडपाच्या मधोमध उंच प्रशस्त बैठक तयार केली होती. बैठकीच्या प्रशस्त परिघाभोवती शिष्यगणांनी कडे केले होते. पावित्र्य राखण्यासाठी लोकांना तेथे प्रवेश नव्हता. बैठकीच्या मधोमध एक होमकुंड होते. आज आठ दिवस ते अखंड धगधगत होते. एक पंडित शुचिर्भूत होऊन त्यास अखंड स्निग्ध अर्पण करीत होता.

कित्येक पंडित शुचिर्भूत होऊन बसले होते. प्रथम सर्वात पुढच्या ओळीत काशीचे वेदमहर्षी, बनारसचे वेदपाठक बसले होते. त्यांच्याही उजव्या बाजूस एक मंचक ठेवला होता. तो स्वामींच्या-साठी होता. होमकुंडाच्या बाकीच्या तीन बाजूस शेकडो पंडित बसले होते. वेदमूर्ती, इंदूरचे त्रिवेदी, वाराणसीचे चट्टोपाध्याय, भवानीशंकर, मदुरेचे वेद-महर्षी वगैरे कित्येक पंडित शुचिर्भूत होते. त्यांची पीतांबरे चमकत होती. चेहऱ्यावर विद्येचे तेज होते, चमक होती.

आजूबाजूला यज्ञाला लागणारे

साहित्य व्यवस्थित रचून ठेवले होते. चांदीची पंचपात्रं, घमेली, समिधा, फुले, दूर्वा, केळी, सफरचंदे, ह्यांचे वेगवेगळे ढीग होते. सर्वत्र गोमूत्र शिंपडण्यात आले होते. शेजारी सहा रांजण भरून गाईचे तूप होते. बाजूलाच सोन्याचा छोटासा दीपवृक्ष होता. शेकडो चांदीच्या समया तेवत होत्या. शिष्यगणांची धावपळ होत होती. यज्ञाची तयारी झाली होती. शिष्यांना बुवांनी खूण केली. शिष्यगणांसह सभामंडप ओलांडून बुवा कुटीकडे जाण्यास निघाले.

बुवा कुटीमध्ये पोहोचले 'महाराज' यज्ञास सुरुवात होत आहे. आपण चलावे.

महाराजांनी खुणेनेच 'होय' म्हटले.

तीन शिष्यांनी मिळून महाराजांना उचलून सभामंडपात आणले. मंचकावरच्या त्यांच्या स्थानावर बसते केले. सर्वत्र चंदनी उदबत्त्यांचा सुगंध उसळला होता. यज्ञाची तयारी बघून महाराज संतुष्ट झाले.

बुवांनी महाराजांच्याकडे पाहिले. त्यांच्या छातीत धस्स् झाले. महाराजांची मुद्रा अतिशय क्षीण झाली होती. श्वासोच्छवास उथळ होत होता पण त्यांच्या चेहऱ्यावर समाधान होते.

बुवांना माहीत झाल होते. ह्यापूर्वी असे बरेच वेळा झाले होते आणि त्यातून महाराज अंतर्ज्ञानी योगीराज, ते नक्कीच हे कार्य निभावून नेतील. किती थोर पुण्याई, बुवा भारावून गेले.

यज्ञ सुरू झाला होता. लोक आता स्तब्ध होते. शांतपणे पाहात होते. वेदमंत्रानी सारा यज्ञमंडप दुमदुमत होता. काशीचे पंडित मुख्यत्वेकरून मंत्र म्हणत होते. शेकडो पंडित मंत्र देत होते. होमकुंडाची पूजा झाली होती. यज्ञात आहुती पडत होत्या. तुपाचे रांजण हळूहळू रिकामे होत होते. समिधा धडधडत होत्या. त्या यज्ञाच्या ज्वालात सर्व मंडप उजळून निघाला होता. पंडित


# पांढऱ्या डागांवर मोफत इलाज

पांढऱ्या डागांवरील औषधाचा महत्त्वपूर्ण शोध. अनेक वर्षांच्या कठोर प्रयत्नानंतर आम्ही अनेक आडाखे बांधून पांढऱ्या डागांवरील औषधे तयार करण्यात यशस्वी झालो आहोत. एकदा औषध घेतल्यावर आपणांस त्याच्या गुणांची खात्री पटेल. ह्यापासून हजारो लोकांनी लाभ घेतलेला आहे. आजही बरेचजण याचा लाभ घेत आहेत. प्रचारार्थ औषधाची एक बाटली नमुना म्हणून दिली जाते. पांढऱ्या डागांपासून मुक्त झाल्यावर आपल्यासारख्याच या रोगाने पछाडलेल्या रोग्यांना औषध घेऊन रोगापासून मुक्त होण्यासाठी अवश्य सांगा.

प्रेम ट्रेडिंग कंपनी (S. N.) M. पो. कतरी सराय (गया)

आणखीनच तेजस्वी दिसत होते. मध्येच धूर होत होता. धूर चंदन आणि स्निग्ध ह्यांच्या स्वादाने सर्व मंडपाची हवा भारली होती.

स्वामी आपले क्षीण डोळे मधूनमधून उघडत होते. पहात होते. काही हळुवार सूचना करीत होते मधूनमधून तोंडातल्या तोंडात मंत्रोच्चार करीत होते.

बुवासुद्धा शुचिर्भूत होते. पण प्रत्यक्ष यज्ञात त्यांचा भाग नव्हता. मधूनमधून ते स्वामींच्या मंचकाकडे जाऊन त्यांच्या प्रकृतीकडे लक्ष देत होते. परत बैठकीच्या पूर्वेच्या टोकास येऊन बसत होते.

यज्ञास सुरू होऊन तास झाला होता. ह्या तासात पाचसहा वेळा बुवा स्वामींच्या मंचकाकडे जाऊन आले होते.

स्वामींची मुद्रा विलक्षण फिक्कट दिसत होती. बुवा जवळ गेले. स्वामींच्या मुद्रेवरचे तेज मावळले होते. ते थोडेसे निळसर, काळे झाले होते. हातपाय थंड पडत होते. नाडीही लागत नव्हती. बुवांनी स्वामींच्या पापण्या उघडून पाहिल्या, त्या तशाच उघड्या राहिल्या. बुवांनी पुन्हा त्या मिटवल्या

बुवांनी ही गोष्ट जाहीर केली नाही. बुवांना माहीत होते, मंडपात प्रचंड गोंधळ माजेल हाहा:कार होईल

बुवांनी शुचिर्भूत झालेल्या शिष्यगणास खूण केली. बुवांनी व शिष्यांनी मिळून स्वामींना परत कुटीत आणले.

स्वामी थकले असतील, थोड्या वेळानी पुन्हा येतील. असे लोकांना वाटले.

बुवांनी गावच्या निवडक लोकांना व यज्ञातील काही प्रतिष्ठित लोकांना बोलावून ही गोष्ट सांगितली. ह्या गोष्टीचा गाजावाजा नको, यज्ञाची समाप्ति झाल्याशिवाय ही गोष्ट सांगू नये असे निक्षून बजावले.

निवडक लोक अंत्यविधिच्या तयारीस लागले अंत्यविधी लवकरात लवकर आटोपावयास हवा. बुवा स्वामींच्या पायाशी बसून त्यांच्या शरीरावर कीटक वगैरे बसू नयेत ह्याची दक्षता घेत होते.

कुटीच्या बाहेर रथ आणला गेला. बारा अश्व असलेला रथ फुलांनी मढवला होता. विविध प्रकारची सुगंधी द्रव्ये शिंपडण्यात आली होती. त्या शुभ्र अश्वांच्या रथात स्वामींचा देह ठेवण्यात आला.

बुवा स्वामींच्या पायाशी बसले होते.

गावाच्याही अगदी बाहेरच्या रस्त्याने अंत्ययात्रा चालू लागली. महानिर्वाणाच्या यात्रेस फारच थोडे लोक होते. रस्त्यावर चिटपाखरूसुद्धा नव्हते. प्रत्येक जण यज्ञात मग्न होता.

नदीकाठच्या बाजूस रथ आला. इतके होईस्तोवर संध्याकाळ झाली होती. एका अत्यंत पवित्र जागी चंदनाची चिता उभारण्यात आली होती. पार्थिव देह त्यावर ठेवण्यात आला.

सर्व लोक बाजूला स्तब्ध उभे होते.

स्वामींचे सर्वांत जवळचे म्हणजे बुवाच होते. बुवांच्या मनात एक विचार आला. अठ्ठ्याण्णव वर्षे तपश्चर्या असलेला हा पुण्यवान युगपुरुष ह्याची काया जळणार नाही. ती सुवर्णमय

होऊन जाईल. इतर पामर प्राण्यापेक्षा ह्याचे भवितव्य वेगळेच असेल.

चंदनाचा सुवास दरवळत होता. स्वामींचा संपूर्ण देह झाकला गेला होता. बुवांनी चितेच्याभोवती तीन प्रदक्षिणा केल्या. उत्तरेकडच्े सहा पंडित मंत्र म्हणत होते. बुवांच्या प्रदक्षिणा संपल्या. स्वामींची मुद्रा शांत होती. सद्‌गदित अंतःकरणाने बुवांनी चिता प्रज्वलित केली.

बुवा दूर जाऊन उभे राहिले. लोक नतमस्तक होते. पुन्हा पुन्हा डोळे पुसत होते.

चिता धडधडत होती. सुगंध पसरत होता. पश्चिमेकडे क्षितीजावर तांबडा लाल सूर्य दिसत होता. बुवांनी नजर वर करून दूरवर पाहिले. त्यांच्यापासून बऱ्याच अंतरावर दूरवर आणखी एक चिता धडधडत होती. तिच्या आसपास कोणी नव्हते. फक्त एक कुणबी नत-मस्तक उभा होता.

बुवांनी पाहिले. दोन्ही चिता धड-धडत पेटत होत्या. दोन्ही चिता वर ज्वाला जिभल्या चाटीत होत्या, त्यांच्या-पासून भेसूर धूर चित्रविचित्र वळणे घेत आकाशात संपादत होता. जमिनी-पासून कित्येक कोस उंच आभाळात दोन्ही चितांचा धूर मिसळत होता. एकजीव होत होता. धूर अनंत अवका-शात विलीन होत होता. आभाळात फक्त एकच प्रकारचा अंधुक धूर दिसत होता. धूर वरवर जात होता.

सर्व मंडळी व बुवा खालच्या मानेने परतले. बुवा मठांत येऊन दोन गुडघ्यात मान घालून बसले. मस्तक सुंद झाले होते. मेंदू बधिर होता. बाकीचे लोक पुन्हा स्नान करून यज्ञाची व्यवस्था पहावयास गेले.

बुवा बसून होते. मनात कुठलेच विचार येत नव्हते. क्षितिजावर आता काळोख होता. मठात भीषण शांतता होती. वाऱ्याने कसला तरी फडफड आवाज येत होता. बुवांनी पाहिले. पालखीचे आवरण फडफडत होते.

बुवांच्या लक्षात आले, उद्या अष्टमी, पालखी निघणार आहे.

पालखी निघणारच आहे बुवा पुट-पुटले.

● ●

पुस्तके

दहा कलात्मक कथाबंध

# काना आणि मात्रा

निशिकांत मिरजकर

वसंत नरहर फेणे यांच्या 'काना आणि मात्रा या कथासंग्रहाला महाराष्ट्र शासनाचे पारितोषक जाहीर झाले, तेव्हा चांगल्या कलाकृतीचा यथोचित सन्मान झाल्याचा आनंदोद्गार अनेक जाणत्यांनी काढला असेल. या संग्रहातील दहा कथा म्हणजे मानवी जीवनातील तऱ्हतऱ्हेच्या नाट्याचे, फेणे यांनी मोठ्या ताकदीने उभे केलेले कलात्मक आकृतीबंध आहेत. प्रत्येक कथेचा आवाका वेगवेगळ्या पातळीला तोलणारा असून फणे यांच्या लेखणीने तो सामर्थ्याने घडविलेला आहे. विषय, आशय आणि अभिव्यक्ती या तिन्ही दृष्टींनी या दहा कथा वैचित्र्य, नाट्य आणि सफाई यांनी नटलेल्या आहेत.

त्यातून फेणे यांच्या लेखणीचे अनेक नजाकतदार विभ्रम सहजपणे व्यक्त झालेले आहेत. कथेची सुरुवात करतानाच फेणे तिला असा काही 'टच्' देतात की त्यातून त्या कथेचा 'मूड' आपोआपच उलगडत जातो. दिवाळीच्या दारूतली रंगीत काडी ओढल्याबरोबर जसा विशिष्ट रंगाचा प्रकाश आसमंताला उजळून टाकतो तसा. आणि मग त्यातून अपेक्षित नाट्याच्या उभारणीस अनुकूल असा पाया तयार होतो. आपोआप. सहजपणे. 'देवालयाच्या भक्कम नि विशाल प्रवेशद्वारापाशी फिकुटले फिकुटले प्रकाशकण जमत चाललेत, तरी त्या प्रवेशद्वाराला धरून धरून बाजूला असलेल्या धर्मशाळेत मात्र अंधारच आहे. देवालयाच्या बरोबर मागे असलेल्या भागात तर मिच्च काळोख.' अशा फिकट काळोख्या पार्श्वभूमीवर गांजाच्या नशेतून जागा झालेल्या रामसरणचे वर्णन 'आत्मा आणि कात' या कथेच्या प्रारंभी येते, आणि प्रभाच्या आयुष्याची काळोखीची विकृती व त्यातून अखेरी रामसरणने

केलेली तिची कायमची सुटका या भीषणतेचा स्वीकार करायला मन संमुख होते. 'एक कदाचित पैगंबर' या कथेच्या सुरुवातीलाच, आपल्या म्हशीकडे–त्या काळ्या कुळकुळीत वैभवाकडे–हरवल्यागत पाहत राहिलेला भाबडा मजीद मनावर सहानुभूतीचा ठसा उमटवतो आणि पुढे कथेतील त्याच्या मनाच्या सगळ्या आंदोलनांना आपोआपच प्रतिसादांची सहज लय प्राप्त होते. 'उणे संभाजी उणे नानावटी' या कथेच्या सुरुवातीची निवेदकाची बेहोष बडबड आणि 'अंधारवड' या कथेच्या सुरुवातीचीच 'दारावरची घंटी किरकिरते. आवाज बसलेल्या म्हाताऱ्याच्या गाऱ्हाण्यांसारखी.' ही अर्थपूर्ण उपमा यातूनही त्या त्या कथेच्या भावस्थितीचे सूचक वातावरण चटकन उभे राहते. एकदम दार उघडून वाचकाला गर्भागारात प्रवेश देते.

### उत्कृष्ट उपमा

वसंत फेणे यांची भाषा मधून मधून उपमांची वळणे रेखत जाते. पण या उपमा म्हणजे केवळ सजावटीच्या महिरपी नसतात. त्यातून कथेच्या कलात्मकतेची उंची वळणदारपणे वाढत जाते. 'त्यांच्या तिरप्या डोळ्यातील बुबुळाची वेगाने हालचाल होते. जमिनीवर आपटलेल्या चेंडूसारखी.' अशा सहज दृश्यांकनातून जिवंत हालचालींचे सहज चित्रण घडते, तर 'त्यांच्या कानात घंटीचो किरकीर भुंग्याच्या पायांनी आवाज कोरते. गढूळ पाण्यात तुरटी फिरवावी तसं त्यांना वाटतं.' या उपमेतून एका विशिष्ट मनःस्थितीचे पारदर्शक चित्र उभे राहते. 'घंटी वाजते तेव्हा अंधाराच्या ताशीव काळ्या शलकांचा फवारा उठतो असं तिला वाटते.'......'पिवळं-पोपटी, तजेलदार ऊन काळ्या ढगांनी झाकाळून जावं तसा तो होतो.'...अशी कितीतरी उदाहरणे इतस्ततः विखुरलेली दिसतील. या उपमात नावीन्य आहे, दृक्प्रत्यय आहे, चपलखपणा आहे, आणि शिवाय भावगर्भात प्रवेश करण्याचे सामर्थ्य आहे.

कथेतल्या व्यक्तींच्या मनात शिरून फेणे त्यांच्या भावनांचे व प्रतिक्रियांचे पदर हळुवारपणे, पण सुस्पष्टतेने उलगडून दाखवातात. मनोविश्लेषणाचा आव न आणता सहजसुरेख विश्लेषण करतात. त्यासाठी कधी भोवतालच्या माणसांच्या वर्तणुकीने व्यक्तीच्या मनात उभी राहिलेली गडद प्रश्नचिन्हे ते रेखाटतात, तर कधी अंतर्मनात रुपलेल्या जुन्या टोकदार आठवणींची सल दाखवतात. कधी सरपटणाऱ्या माणसांच्या भावनांचे उन्नावलेले क्षण वर्णन करतात, तर सामान्यांच्या सामान्यपणाचा कडवट प्रत्यय देऊन पहातात. कधी फेणे यांच्या निवेदनाला निरागस नर्म विनोद लपेटलेला असतो. हा विनोद उपहास करीत नाही, तर सहृदयतेने व्यक्तिचित्राला जाऊन बिलगतो. मर्चंटच्या बापाचे अवेशपूर्ण गीत ऐकून जवाहरलाल व गांधीजी जोडीने 'तू तुऽऽतूऽऽ' करून बिगूल वाजवताहेत अन् पाटलूण सांभाळत गंटवे-

वरून चर्चिलसाब भागतो आहे असे दृश्य डोळ्यांसमोर तरळल्याचे लेखक गमतीने सांगतो; आणि मर्चंटच्या बापाचे भावडे, पण भावनिष्ठ सरळ व्यक्तिमत्त्व दिलखुलास प्रसन्नतेने उजळून निघते. 'उणे समाजी उणं नानाचटी' कथेच्या निवेदकाच्या बेहोष बडबडीत अनेक विसंगतींतून आपोआप विनोद पाझरतो; पण निवेदकाची टवाळी न करता त्याच्या अस्थिर दोलायमान अवस्थेवर तो विनोद सहानुभूतीचे प्रकाशझोतच जणू टाकत राहतो. एखाद्या प्रसंगातील नाट्य अगदी मोजक्या शब्दात विलक्षण प्रभावीपणे रेखण्याचे कसब फेणे यांच्या लेखणीत आहे. तिथे ते भाषेचे विभ्रम सादर करीत नाहीत, तर केवळ काही मार्मिक शब्दांच्या साहाय्याने नाट्य विनाभाष्य उजळून टाकतात.

माणसांच्या मनांचे दर्शन घडविताना फेणे यांनी या सर्व कथांतून दुपेडी गोफ गुंफलेला दिसतो. एक पदर व्यक्तींच्या हालचाली, प्रतिक्रिया, संभाषण यातून वस्तुनिष्ठपणे सरसरत जातो, तर दुसरा अंतर्मनाच्या पापुद्र्यांतून वळणावळणाने उलगडत जातो. ओलावत राहतो. आपल्याला कचेरीतच काम करायला सांगून आपल्या बायकोबरोबर व्यभिचार करायला गेलेल्या बॉसबद्दल संतापाने सूडाची भाषा बोलत राहणाऱ्या नायकाच्या मनात खरी काळजी असते आपल्या छोट्या बेबीची. 'काल बोलला असता तर बेबीला बोलावून घेतलं नसतं? तिला एखादा सिनेमा दाखवला असता.' अशा एखाद्या वाक्यातून ती नकळत व्यक्त होते, तेव्हा त्या दुबळ्या अगतिक सेल्समनच्या वांझोट्या व्यथेचे कारुण्य एकदम गहिरे बनते. जयंता आणि वीणा यांची पहिली भेट होते, आणि साध्या साध्या वाक्यांमागोमाग मनामध्ये केवढेतरी हिंदोळे दोघांना जाणवत राहतात. ज्योत्स्नाबाईंच्यामुळे आपल्याला कलंक लागला असे वाटून त्यांच्यापासून दूर झाल्यावर भाऊसाहेब दीक्षित आपल्या मनाचा धिक्कार करतात; पण मन तो मानीतच नाही कुठेतरी बरे वाटत राहते. दादासाहेबांचे रुद्ध आवाजातले बोलणे ऐकून जीजोला गहिवरल्यासारखे होते. 'भावजी' म्हणून उमाळ्याने हाक मारावीशी वाटते. पण आढ्यतेखोर जाऊबाईसमोर ती वरकरणी हसत ती खोचून बोलत राहते. अशा अनेक प्रसंगातून अंतर्मनातील पडद्याआडचे साद-पडसाद फेणे यांनी बोलकेपणाने दाखवले आहेत. भावनांनी डहुळलेली व्यक्तिचित्रे त्यातून, अतिरेकी भडकपणाचा स्पर्श होऊ न देता उभी केली आहेत.

यातल्या काही कथात अनेक घटना घडत राहतात, तर काही कथा एकाच बिंदूभोवती विस्तारतात. काहीत वादळी नाट्य घुसळत राहते, तर काहीत हलकेसे भावनाट्य उमळून येते. पण निवेदनाची गती मात्र सर्वच कथांना लाभलेली आहे, हे फेणे यांचे यश आहे. निवेदन कुठेच पसरट होत नाही. कंटाळवाणे ठरत नाही.

### आत्मा आणि कात

'आत्मा आणि कात' ही कथा 'किर्लोस्कर' मधून प्रसिद्ध झाली. त्यावेळी उलट सुलट चर्चांनी बरीच गाजली होती. ही एक खरीखुरी विकृतीची कथा आहे. एका आवेगाने शरीराला झपाटून टाकलेल्या विकृतीची. पण यातल्या प्रभाला झालेल्या रोगजन्य विकृतीच्या अनुषंगाने सभ्य आवरणात गुरफटलेल्या कितीतरी हिडीस विकृती दाखविल्या आहेत, त्या जास्त अंतर्मुख करणाऱ्या आणि भीषण आहेत. 'पतझड' या कथेत अगदीच वेगळ्या क्षेत्रातला तीव्र संघर्ष आहे. नोकरीच्या शोधात असलेल्या वसंताला सेवादलातला जुना मित्र अचानक महारोग्यांच्या आश्रमात भेटतो; आणि एका महारोगी स्त्रीची अपत्यप्राप्ताची इच्छा पुरी करण्याच्या मोहाने तोही महारोगी बनल्याचे कळते. मुळमुळीत तकलादू ध्येयवाद आणि अस्सल बेगुमान जीवनक्षण यांची विरोधचित्रे या कथेत फेणे यांनी उभी केली आहेत. त्यातही कितीतरी पदर एकत्र आलेले आहेत. त्यातून गुंतागुंतीचे नाटय उभे राहिले आहे. 'दिवेलागण' ही कथा म्हणजे एक हुरहुरते हळवे काव्य आहे. थबकत थबकत उंच चढणारे. तर 'एक कदाचित पैगंबर' या कथेत विशिष्ट कल्लोळमय परिस्थितीत देशभर उसळलेल्या भीषण नाटयावर एका वेगळ्या बाजूने कवडसा टाकलेला आहे. व्यक्तिनिष्ठ, भावपूर्ण, विशिष्ट. 'उणे संभाजी उणे नानावटी' या कथेत एका कठोर व्यक्तिमर्यादेला तिरकस छेदणारे उलटसुलट भावतरंग क्षणात मनाच्या पृष्ठभागावर तरंगताना तर क्षणात तळाशी बुडी घेताना दिसतात. आणि एका विलक्षण अगतिक व्यक्तित्वाला अनेक वेळा अधोरेखित करतात. तर 'एक तप' या कथेत कम्युनिस्ट पती आणि समाजवादी पत्नी यांच्या कहाणीतून एक भावकेंद्रित जीवन आणि एक वादळी व्यक्तिमत्त्व यांचे परस्परांना ठसठशीत छेद गेलेले दिसून येतात. विलक्षण वेगळ्या पातळीवरचे नाटय तिथे सर्वगामी अनुभूतीसंवेदनांच्या पातळीवर अलगद येऊन उतरते. 'अंधारवड' ही कथा स्वभावचित्रणाचे कडवट गडद रंग दाखवते, तर 'मर्चंटचा बाप' या कथेत सामान्य जीवनातले असामान्य व्यक्तिचित्र दिसून येते. विविध धाग्यादोऱ्यांच्या गुंफणाला एकरंगो दर्शित करण्याचा अट्टाहास बाळगणारी अपेशी व्यक्ती भाऊंच्या रूपाने 'स्वप्नाचा स्पर्श' या कथेत दिसते. 'वात जळे—वात' या कथेतून भावनांच्या नागमोडी वळणातून परिणामकारकतेने उत्तुंग झेपावणारी जीजीची व्यथा सुन्न करते.

या दहा कथा म्हणजे वसंत नरहर फेणे यांच्या समर्थ लेखणीने निर्मिलेले दहा सुरेख कलात्मक कथाबंध ठरतात. □

'काना आणि मात्रा'
वसंत नरहर फेणे
मॅजेस्टिक बुक स्टॉल
किंमत : दहा रुपये

## एकात्म नियोजन हवे

पृष्ठ २४ वरून

गोष्ट सुरगाणा तालुक्यातली. याही तालुक्यात सुरगाणा व बोरगाव येथेच फक्त दोन माध्यमिक विद्यालये आहेत. दिंडोरी तालुक्याच्या ८० खेड्यापैकी दोन गावात (एका गावी महाविद्यालयही आहे!) तर कळवण तालुक्यातील १२५ गावापैकी फक्त एकाच गावात अमोणा व कळवण येथे माध्यमिक विद्यालय आहे. सटाण्याच्या आदिवासी विभागात मुल्हेर आणि डांग सौंदाणे ही गावे वगळता अन्यत्र माध्यमिक विद्यालयाची सोय नाही. ही स्थिती अर्थातच आदिवासी क्षेत्रातील आहे. आदिवासी विभागाच्या शैक्षणिक विकासाचे हे लक्षण आहे की शासनाच्या घोषणाबाजीचा बुरखा फाडणारी वस्तुस्थिती? वस्तुत: आदिवासींच्या उत्कर्षासाठी हायस्कूले काढण्याऐवजी प्राथमिक शिक्षणानंतर त्यांना स्वतःच्या पायावर मानाने उभे राहता येईल असे तंत्रज्ञान देण्याची गरज आहे. आठ लक्ष हातांना डिग्र्यांची गरज आहे काय? आदिवासी पदवीधर होऊ नयेत, त्यांना जगाचे ज्ञान लाभू नये हा हेतू या विधानाचा नाही. पण एकवेळचीही भ्रांत पडलेल्या आदिवासी तरुणाला जर तंत्रज्ञानाने उत्पादक कामाकडे वळून मानाने जगता आले तर ते पदव्यांपेक्षा श्रेयस्कर ठरेल. पण लक्षात कोण घेतो? शासनाने एकही तांत्रिक व शेतीविषयक ज्ञान देणारी संस्था या आठ लाख आदिवासी लोकसंख्या असलेल्या विभागात उघडलेली नाही हे दुर्दैव कोणाचे? कल्याणकारी म्हणविणाऱ्या शासनाचे की या राज्यात राहणाऱ्या आदिवासींचे?

आदिवासी विभागात अशाप्रकारे शिक्षणाची जी सोय गेल्या सव्वीस वर्षांत शासनाला करून देता आली नाही, याचे दळणवळणाच्या मार्गाचा अभाव हे एक महत्त्वाचे कारण आहे. दळणवळणासाठी चांगले रस्ते असले तर प्राथमिक शिक्षक हा त्या डोंगरी खेड्यात राहाण्यास राजी असतो. अन्यथा आठवड्यातले सातही दिवस तो तालुक्याच्या ठिकाणी किंवा मोठ्या खेड्यात राहून विद्यार्थ्यांच्या हजेऱ्या लावू शकतो. वरिष्ठ अधिकाऱ्यांना जरी तपासणी करण्याची इच्छा झाली तरी त्याला दुर्गम रस्त्यावरून पायी जाणे शक्य नसते. सर्वच ठिकाणी असे प्रकार घडतात असे नाही पण त्याचे प्रमाण भीतीदायक आहे एवढे मात्र निश्चित!

महाराष्ट्र शासनाच्या नव्या नियमाप्रमाणे आदिवासी विभागाच्या विकासावर एकूण सेसच्या १५ टक्के रक्कम खर्च करावी असे स्पष्ट आदेश आहेत. वरवर पाहता हा आदेश म्हणजे किती पोटतिडीकेने शासन आदिवासींच्या प्रश्नाकडे पहात आहे याचा नमुना; पण तसे नाही याचे उदाहरण म्हणून आपण नासिक जिल्हा परिषद घेऊ. परिषदेचा सेस दोन लाखाचा आहे. त्याच्या पंधरा

टक्के रक्कम म्हणणे अवघी ३० हजार रुपये झाली. जिल्ह्याच्या आदिवासी विभागातील फक्त गिरणारे ते हरसूल हा वीस मैलांचा रस्ता डांबरी करावयाचे ठरले तर त्यालाच चार लाख रुपयांचा खर्च येईल. म्हणजेच ही घोषणा किती फसवी आहे ते पटेल.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर १९६२ पर्यंत स्थानिक स्वराज्य संस्था म्हणून जिल्ह्याच्या विकासाचे काम लोकल बोर्ड पहात होते, त्यानंतर जिल्हा परिषदा आल्या. या दोन्हीही स्वायत्त संस्थांच्या काळात विकासगंगेचा प्रवाह जिल्ह्याच्या पूर्व व मध्यम भागापर्यंतच आणि आणि प्रवाहाचे चार दोन थेंब आले ते पश्चिम विभागाच्या वाटयाला. ज्या पश्चिम विभागातील आठ लक्ष आदिवासींचे वास्तव्य असलेला पट्टा विकासापासून अलिप्त राहिला त्याच्यावर आजवर पूर्व व मध्यम भागांतील खर्ची पडलेल्या रकमांचा 'बॅकलॉग' खर्च केल्याशिवाय विकास तिथवर पोचणे शक्य नाही. हा सर्व बॅकलॉग दळणवळणाच्या सोयी उपलब्ध करून देण्यासाठी जरी खर्च झाला तरी बाकीची विकासाची अंगे आपोआप जोडली जातील. केवळ जिल्हा परिषदेकडे बोट दाखवून शासनाचे आदिवासींच्या विकासाचे काम पूर्ण होणार नाही, तर केंद्र सरकार व राज्य सरकार यांनी त्यात आपला सक्रिय वाटा उचलला पाहिजे. वीस ते पंचवीस लाखाचे रस्ते जिल्हा परिषद कशी पूर्ण करू शकेल? काही ठिकाणी रस्त्यांसाठी घाट फोडावा लागेल तर काही ठिकाणी नद्यांवर पूल, कॉजवे बांधावे लागतील. दळणवळणाच्या मार्गांच्या अभावी आठ महिने पश्चिम भागातील फार मोठ्या विभागांचा जिल्ह्याशी अजिबात संपर्क तुटतो, ही वस्तुस्थिती नाकारून चालणार नाही. हरसूल ते पेठ फक्त १८ मैलांचे अंतर आहे. परंतु पक्का रस्ता नसल्याने हरसूलच्या इसमाला जर पेठला यावयाचे असेल तर पावसाळ्यात व हिवाळ्यात त्याला आधी नासिक गाठावे लागते आणि मग पेठ! म्हणजेच १८ मैलांच्या प्रवासासाठी १०० मैलांची प्रदक्षिणा (तीही आदिवासीला) करावी लागते. बार्‍हे ते सुरगाणा हे अंतरही साधारणपणे २० मैलांचे आहे. पण रस्ता नसल्याने याच व्यापाने १२५ मैलाचा फटका त्याला बसतो. कळवण, सुरगाणा–जंग हे अंतर अवघे २५ मैलाचे आहे; पण रस्त्यांच्या अभावी वणी, नासिक, सुरगाणा हा १२५ मैलांचा फेरा, आर्थिक, मानसिक ताप नाईलाजाने सहन करून मारावा लागतो, हे किती काळ अजून चालणार हे कळत नाही.

लघुपाटबधारे योजनांच्या राबवणुकीसाठी महाराष्ट्र सरकार जिल्हा परिषदेला दरवर्षी अंदाजे वीस लक्ष रुपये अनुदानाच्या स्वरूपात देते. याचा अर्थ गेल्या १० वर्षांत सुमारे दोन कोटी रुपयांचे अनुदान परिषदेला प्राप्त होऊन ते खर्ची देखील पडलेले आहेत. परंतु आदिवासी विभागातील पाझर तलाव, लहान लहान बधारे आदी योजनांतून

एक हजार रुपये तरी खर्च झालेत काय ? जो काही खर्च झाला असेल तो पेठ व सुरगाणा विभागात. पश्चिम विभागात बारमाही वाहणारे शेकडो नाले आहेत. लागोपाठच्या तीन वर्षांच्या दुष्काळी परिस्थितीत हे बारमाही नाले अडविण्याचे जरी काम हाती घेण्यात आले असते तरी ४ लाख एकरात भात, नागली, वरईचे जे मोठे क्षेत्र आहे त्यातून हीच पिके दुबार घेता आली असती एवढेच नव्हे तर हरबरा, गहू, ज्वारी ही पिके देखील घेता येतील. केवळ पावसाळ्यात प्रचंड पाणी आणि बाकी काळ टिपूसही नसलेल्या आदिवासी क्षेत्रात हे नाले म्हणजे भगिरथाची गंगाच होय. पण अद्यापही ह्यासाठी ठोस कार्यक्रम आखला जात नाही. आणि कृषि-क्रांति,हरित-क्रांतीच्या युगात अजूनही आदिवासी शेतकरी मध्ययुगीन काळातच वावरतो आहे त्याच्या सामाजिक, आर्थिक स्थितीत काहीही बदल झालेला नाही. या विभागातील नद्यांनाही जागोजाग अडविण्यात आले तर उपसा, जलसिंचन योजनेद्वारे त्या पाण्याचा फायदा फार मोठ्या क्षेत्राला होईल. हे काम जिकिरीचे असले तरी अंतिम फायद्याचे असल्याने या कामाचा मास्टर प्लॅन तयार करावा. त्यासाठी सर्वेक्षण यंत्रणाच उभी करावी, तरच इथली शेती सुधारली जाईल. शेती सुधारली तर आदिवासी विभागातील जनतेची आर्थिक दुःस्थिती नाहीशी होईल. आर्थिक दुःस्थितीच्या परिणामी 'सावकार' हा अजूनही आदिवासींच्या जीवनातून सुटलेला नाही. या उलट अनिश्चित व लहरी नैसर्गिक परिस्थितीने आदिवासी माणूस सावकाराच्या पाशात अधिकाधिक गुरफटत चालला आहे. १५ टक्क्यापासून २०० टक्के व्याजाने पैसे देणारे सावकार आजही एक-एक लाख रुपये एका एका तालुक्यात वाटून दिमाखाने व वैभवाने फक्त व्याजावर मजा मारीत आहेत. अनेकांनी पैशाच्या परतफेडीअभावी जमिनी लिहून दिल्या आहेत. सावकारांनी दिलेले कर्ज, आदिवासींनी कर्जापायी गमावलेल्या जमिनी याची स्वतंत्रपणे पाहाणी करावी. या जमिनींचे उत्पन्न वर्षांनुवर्षे सावकाराने घेतले आहे. तेव्हा शासनानेच त्या जमिनी पुन्हा आदिवासींना मिळवून

---


**संध्याकाळ**

वेधक आत्मकथन

गजानन जागीरदार

मूल्य : दहा रुपये

राजहंस प्रकाशन

पुणे ३०.

प्रवेश फी नाही : **युनिक पॉप्युलॅरिटी स्पर्धा** : बक्षीस मिळवा

| | | | |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |

पहिले बक्षीस : एक वेस्पा स्कूटर किंवा ऑलविन रेफ्रिजरेटर. दुसरे बक्षीस : एक टेपरेकॉर्डर किंवा ॲटोमॅटिक कॅमेरा किंवा रेडिओग्रॅम. तिसरे बक्षीस : (१००) जपानप्रमाणे तयार केलेले ३ बँडचे टोयो ट्रॅन्झिस्टर्स किंमत २७५/-. चौथे बक्षीस : (१०) जपानप्रमाणे तयार केलेले ३ बँडचे टोयो ज्यूनिअर ट्रॅन्झिस्टर्स किंमत २५०/-

Entrance Fee : NO ENTRY FEE. This is only a Popularity contest
LAST Closing Date : 8-5-73, RESULT Date : 10-5-73.
Specimen for help total 86
Using Figures 14 to 29

| | | | |
|---|---|---|---|
| 18 | 21 | 24 | 23 |
| 25 | 22 | 19 | 20 |
| 27 | 28 | 17 | 14 |
| 16 | 15 | 26 | 29 |

स्पर्धेकरिता नियम : (१) साध्या कागदाचा वापर करा. (२) दुरुस्त केलेल्या, खाडाखोड केलेल्या प्रवेशपत्रिका स्वीकारल्या जाणार नाहीत. (३) प्रमोटर्सचा निर्णय अंतिम आणि कायद्याने बंधनकारक राहील. ही या स्पर्धेची महत्त्वाची अट आहे. (४) बिनचूकता अधिकृत सीलबंद उत्तराशी ताडून पाहून ठरवली जाईल. कोणतीही बक्षिसे रोख पैशात दिली जाणार नाहीत. (५) पहिले बक्षीस (एकच) : अधिकृत उत्तराशी तंतोतंत जुळणाऱ्या प्रवेशपत्रिकेला दिले जाईल. (६) दुसरे बक्षीस (पाच) : आडव्या वरच्या तीन रांगांशी तंतोतंत जुळणाऱ्या प्रवेशपत्रिकांना मिळेल. (७) तिसरे बक्षीस (शंभर) : अशा प्रवेशपत्रिकांना मिळेल की ज्यांची कोणतीही रांग किंवा कोणतीही संख्या कुठेही अधिकृत उत्तराशी जुळेल. (८) चौथे बक्षीस अशा दहा जणांना दिले जाईल की ज्यांची प्रवेशपत्रिका प्रमोटर्सना समाधानकारक वाटेल. (९) बक्षीसपात्र ठरणारांना त्यांनी मिळवलेल्या बक्षिसाबाबत पोस्टेज, पॅकिंग आणि लायसेन्स फी द्यावी लागेल. (१०) तिसरे आणि चौथे बक्षीस मिळवणारांना वरखर्चाशिवाय ट्रॅन्झिस्टरची निम्मी किंमत द्यावी लागेल आणि ते आमच्या नियमाप्रमाणे आणि अटींप्रमाणे बांधील राहतील. (११) निकाल जाहीर केल्यानंतर लवकरच विजेत्याला लायसेन्स फी. वगैरे भरण्यासाठी पत्र पाठविण्यात येईल. (१२) उत्तरासाठी ४५ पैशांचे तिकीट पाठवा. (१३) एक कुटुंब फक्त एकच प्रवेशपत्रिका पाठवू शकते. (१४) तुमचा पत्ता हिंदीत किंवा इंग्रजीत लिहा. (१५) हे कात्रण किंवा नियमावली तुमच्या मार्गदर्शनासाठी किंवा संदर्भासाठी पुढे उपयोगी पडावी म्हणून ठेवा.

DIRECTOR, CONTEST DEPARTMENT

**PARKER AGENCIES (MWP–90)**

P. O. BOX NO. 1279, DELHI-6

द्याव्यात व आदिवासींना मानाने जगण्याची सधी मिळवून द्यावी. आणखी एक गंमत अशी, की कूळकायद्यामध्ये ज्या आदिवासींना जमि ी मिळाल्या त्यातील फळझाडे व अन्य उत्पन्न देणाऱ्या झाडांवर मालकी मात्र मूळ मालकाची आहे.


आदिवासी विभागातील जंगलसंपत्ती आता जवळ जवळ नाहिशी होण्याच्या मार्गावर आहे. सरकारी व खाजगी वनकुरणांच्या मालकांनी जंगलात गेली २५-३० वर्षे जी तोड चालू ठेवली आहे, त्या प्रमाणात नवीन लागण अजिबात नाही जंगलसंपत्तीचा उपयोग सहकारी तत्त्वावर वेगवेगळचा रीतीने तयार करण्याचा मार्ग अद्यापीही अवलंबिण्यात आला नाही. रिठे, मोह, तेलंबीपासून साबण तयार करणे, बांबूपासून टोपल्या, करंड्या, रानगवताचा उपयोग फायबर अथवा कागदासाठी करणे शक्य होते. तसेच हिरडा, आवळी, जायफळ यापासून औषधांची निर्मिती शक्य आहे; परंतु उत्पादक सहकारी संस्था काढण्यास कोणीही पुढाकार जसा घेतला नाही तसेच शासनानेही पद्धतशीर प्रयत्न केलेले नाहीत.

आदिवासी विभागात दवाखाने नाहीतच असे विधान केले तरी ती अतिशयोक्ती ठरू नये. ज्या ठिकाणी दवाखाने आहेत तेथे आयुर्वेदिक डॉक्टर्स आहेत, तेही दळणवळणाच्या अभावी रोग्यांच्यापर्यंत पोहोचू शकत नाहीत. परिणामी आदिवासी हा अजूनही जडीबुटी व मंत्रतंत्राच्या आधारेच आजार बरा करण्याच्या पद्धतीवर विश्वास ठेवून आहे. पाच हजार लोकवस्तीच्या विभागासाठी एक दवाखाना व तेथे एम्. बी. बी. एस्. डॉक्टर नेमावा. सध्या तर इतकी भीषण परिस्थिती आहे की ७०-८० खेड्यातून - एकच दवाखाना. पावसाळ्यात बैलगाडीतून पेशंट नेणे जिकिरीचे काम. वाटेतच तो सिरिअस झाला तर पुढचा भीषण प्रवास टाळून आजारी माणसाला नाइलाजाने पुराच्या पाण्यात फेकून दिले जाते. याशिवायही शेकडो समस्या या विभागाच्या आहेत. येथून निवडून गेलेले लोकप्रतिनिधी विभागाच्या उत्कर्षासाठी कितपत झटले आहेत, त्याची कल्पना आजची दुःस्थिती पाहून कोणासही यावी.

● ● ●

नाट्यशैलीचे नवे संशोधन

# Peter Handke Naftali Yavin




पुष्पा भावे

गेली अनेक वर्षे प्रायोगिक रंगमंचावर जे नवे प्रयोग चालू आहेत ते नाट्याला कारागिरीकडून गंभीर कलेकडे नेणारे आहेत. नाटककार व दिग्दर्शक स्वत: नाट्यात गुंतलेले आहेत आणि प्रेक्षकांनीही गुंतले जावे यासाठी खटाटोप करीत आहेत. प्रेक्षक सहभागाची कल्पना आपण गेली काही वर्षे मराठी प्रायोगिक रंगमंचावर पहात आहोत. परंतु मराठी रंगभूमीवर नटांनी प्रेक्षागृहातून प्रवेश करणे वा काही नटांनी एखाद्या प्रसंगी रंगमंचावरून प्रेक्षागृहात उतरणे यापलीकडे प्रेक्षक सहभागाची कल्पना गेलेली नाही कारण आपल्या प्रायोगिक संस्थाही नाट्यनिष्ठेला तीव्रपणे बांधलेल्या दिसत नाहीत. पाश्चात्य प्रायोगिक रंगमंचावर 'करमणूक' कल्पनेपासून नाट्याला दूर नेण्याचे जे प्रयत्न चालू आहेत त्याचा व प्रेक्षकसहभागाच्या नव्या प्रयोगांचा निकटचा संबंध आहे. आजच हे विचार सुचण्याचे कारण Peter Handke या ऑस्ट्रियन नाटककाराची Offending the Audience' आणि Self-Accusation' ही नाटके वाचनात आली. त्यांना 'नाटके' म्हणणे फार अवघड आहे. स्वत: नाटककार त्याला Sprechstuck (Speak-ins) असे म्हणतो त्या वेगळ्या संहितेचे प्रयोग कसे केले जात असतील ही कल्पना करीत असतानाच 'Plays and players' च्या अंकात The Other Company चे दिग्दर्शक Naftali yavin यांची मुलाखत वाचली. 'Toc' ही संस्था Handke यांची नाटके सादर करते; नव्हे 'environmental theatre' (नाट्यगृहाबाहेर अनुरूप वातावरणाकडे जाण्याचा यत्न) ही या संस्थेची निष्ठा आहे.

Handke या तरुण नाटककाराला कथा सांगणाऱ्या नाटकाविषयी मुळीच स्वारस्य वाटत नाही. विट्जेनस्टाईन (Wittenstein) चा भोक्ता असणारा हा तरुण भाषाशास्त्रज्ञ, भाषेच्या रचनांतून मानवी वागणुकीचे, मानवी नात्यांचे अन्वेषण करण्याचा यत्न करीत आहे. शब्दांतून जे व्यक्त होते आणि जे व्यक्त न करण्याचा यत्न होतो त्या दोन्हींचा

अन्वय शोधण्याचा यत्न या नाटककाराच्या नाटकात आहे. आणि या सगळयाच्या पाठीमागे शनिवारी संध्याकाळी सुंदर कपडे करून अलिप्तपणे नाटयगृहात येणाऱ्या प्रेक्षकाला हलविण्याची कांक्षा आहे.

Naftali Yavin सारखा अत्यंत निष्ठावान दिग्दर्शक या नाटककाराला लाभल्यामुळे या दोघांच्या सहकार्याने नवी नाटयशैली जन्माला येत आहे. मानसशास्त्रज्ञाच्या उपचारशय्येवरील माणसाइतके नटाने आपल्या भूमिकेला बांधील असले पाहिजे, असे या दिग्दर्शकाचे मत आहे. बरेचसे नट खांद्याच्या वर अभिनय करायला प्रारंभ करतात अशी त्याची तक्रार आहे. प्रत्येक नटाच्या भावनिक शक्तिप्रवाहातून भूमिका निर्माण झाली पाहिजे असाही त्याचा आग्रह आहे. प्रत्येक व्यवसायातल्या माणसाला चाकोरी असते, तर नटाला सृजनात्मक आवर्त निर्माण करावा लागतो. नटाने स्वतःची अभिनयशैली शोधावी असे धोरण बाळगल्यामुळे 'Toc' या संस्थेच्या प्रयोगात ग्रोत्तची पद्धती, मुक्त निर्मिती (Improvisation), न-अभिनय या सर्वांचा वापर केला जातो. अवकाशाची त्रिमितिपूर्ण योजना हे नेपथ्याचे प्रमुख सूत्र ते मानतात आणि त्यामुळे सजावटीचा तपशील त्यांना अमान्य आहे. प्रेक्षकसहभागाविषयी बोलताना यवोन म्हणतात 'केवळ प्रेक्षागृहाशी संपर्क राखणे म्हणजे प्रेक्षक सहभागी नाही, प्रेक्षक सहभागाचेही नाटक करणे म्हणजे तर प्रेक्षकांचा अपमान होय, प्रेक्षकांना संपूर्ण नाट्यानुभवात सहभागी करून घेणे, नव्हे नटांप्रमाणे त्यांच्या प्रतिक्रिया मुक्त वाटू देणे याला मी प्रेक्षकसहभाग म्हणतो.'

यवीनने सादर केलेल्या एका प्रयोगात पुठ्ठयाच्या मोठया बॉक्समध्ये नाटक चालू असते; पुठ्ठयाला असलेल्या चौकोनी खिडक्यातून पाहिले जाते; नाटकातील तीव्र क्षणी त्या बॉक्सच्या भिंती कोसळतात आणि प्रेक्षकांशी प्रश्नोत्तरे चालू होतात. सार्त्रच्या 'No Exit' मधील नरक म्हणजे इतर माणसात बंदिवान होणे ही कल्पनाही त्या संस्थेने नाटयांकित केली. Handke ची 'Self Accusation' ही व्यक्ती आणि समाज यांच्या नात्यावर रचलेली नाटिकाही एखादे धर्मकृत्य करावे त्या पद्धतीने सादर केली गेली. व्यक्तित्वदर्शन व कथाकथन बाजूला टाकून भाषेची संवादशक्ती आणि नाटयाचा मूलभूत स्वभाव यांचे संशोधन म्हणजेच 'Toc' ची नाटयशैली आहे.

नट निष्ठावंत असले पाहिजेत; त्यांनी संन्याशासारखे अलिप्त राहून बांधील असावे या कल्पनेमुळे 'Toc' मधील नट एकत्र राहतात; स्वयंपाक साफसफाई स्वतः करतात आणि प्रेक्षकांना संवेदनाक्षम करण्याच्या आकांक्षेने नाटके सादर करतात. यवीनने एका मुलाखतीत म्हटले आहे—'I'd like to think of Toc as an attempt to create a truly involved theatre. I'd like to think

of it as a professional experimental theatre, that is to say, a group of highly skilled people exploring the possiblities of the theatre. The moment, I start repeating myself I think I'will quit.'

मागे लिहिलेल्या 'लंचटाईम थिएटर' या स्फुटावरून व वरील माहितीवरून ध्यानीं येईल की पाश्चात्य प्रायोगिक रंगमंच. 'नाटक हे एक सांगणे आहे, जोपर्यंत सांगण्यासारखे आहे तोपर्यंत ते कुठेही केले तरी हरकत नाही; परंतु करीत राहिले पाहिजे-लोकांशी बोलत राहिले पाहिजे. आपल्या सांगण्याला अनुरूप नाट्यशैली संशोधिली पाहिजे' या निष्ठेवर उभा आहे. नाट्यगृह मिळत नाही, तालमीला जागा नाही, पैसे नाही या सबबीवर स्पर्धेपुरती जागी असणारी आमची हौशी मंडळी याची दखल घेतील काय ?

● ● ●

---


# पुरंदऱ्यांचा सरकारवाडा

ब. मो. पुरंदरे
यांचा
नवा
कथा संग्रह

किंमत : सात रुपये

राजहंस प्रकाशन

# विद्यार्थिनींचा वासंतिक वर्ग : मे १९७३

विद्यार्थी सहाय्यक समिती व इनव्हेस्टमेंट इन मॅन या संस्थांमार्फत मे व ऑक्टोबर १९७२ या कालात महाविद्यालयीन विद्यार्थिनींसाठी दोन वर्ग घेण्यात आले. या वर्गांचे सूत्र व्यक्तिमत्व विकास हे होते. महाविद्यालयीन अभ्यासक्रमास पूरक असा अभ्यासक्रम या वर्गांमध्ये ठेवण्यात आला होता. व्याख्यानं, प्रात्यक्षिकं, छंदवर्ग, करमणूक, व्यायाम, सामाजिक संस्थांचा परिचय, सहली असा संपूर्ण वेळाचा कार्यक्रम होता.

दोन्ही वर्ग विद्यार्थिनींच्या दृष्टीनं यशस्वीपणे पार पडले. विद्यार्थिनींना वैयक्तिक व सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण व्हावी यासाठी अशा उपक्रमांची अत्यंत आवश्यकता असल्याचे निदर्शनास आले.

गेल्या वर्षीच्या या वर्गांचा अनुभव जमेस धरून येत्या उन्हाळयाच्या सुटीत, १५ ते ३० मे १९७३ असा १५ दिवसांचा एक वर्ग घेण्यात येणार आहे. या वर्गात भाग घेणाऱ्या विद्यार्थिनींची वयोमर्यादा १७ ते २२ अशी असावी. त्यांची रहाण्या-जेवण्याची व्यवस्था विद्यार्थी सहाय्यक समितीच्या लजपतराय वसतिगृहात होईल. विद्यार्थिनींनी पूर्ण वेळ वसतिगृहात राहणे आवश्यक आहे.

या वर्गाचे सूत्र व्यक्तिमत्व विकास व समाजजीवनाच्या प्रेरणा हे असेल. समाजपरिस्थितीचा अभ्यास, छंद, व्यायाम, विविध क्षेत्रातील प्रमुख व्यक्तींशी चर्चा यावर वर्गातील कार्यक्रम आखलेला असेल.

पंधरा दिवसांच्या या वर्गासाठी भोजन व निवास शुल्क रु. ५० आहे. छंदवर्ग व सहल यांप्रीत्यर्थ सुमारे रु. १० अधिक लागण्याचा संभव आहे.

आर्थिक स्थिती सामान्य असणाऱ्या विद्यार्थिनींना विशेष सवलत दिली जाईल. त्यासाठी पालक व मुख्याध्यापक यांचेकडून आवश्यक ती प्रमाणपत्रं आणावीत.

ज्या विद्यार्थिनींना या वर्गाचा लाभ घ्यावयाचा आहे त्यांनी खालील पत्त्यावर पत्र पाठवून प्रवेश अर्ज मागवावा. पत्रासोबत ५० पैशांची तिकीटे पाठवावीत. अर्ज भरून पाठवण्याची शेवटची तारीख ५ मे १९७३ आहे.

पत्रव्यवहाराचा पत्ता :
निर्मला पुरंदरे
विद्यार्थी सहाय्यक समितीचे कार्यालय,
११८२।१, फर्ग्युसन कॉलेज रस्ता,
पोलीसग्राउंडजवळ, पुणे ५.

कार्यालयाची वेळ : सायंकाळी ५-३० ते ७ (रविवार सोडून)



खरा
**बलराज**
फार
थोड्या
दिग्दर्शकांनाच
उमगला

सुरवातीलाच सांगून टाकतो, मी तसा कोणी वार्ताहर नव्हे. त्यामुळे त्याला भेटण्याचा किंवा मुलाखत घेण्याचा प्रसंगही माझ्यावर कधी आला नाही. त्याला मी पाहिले ते फक्त पडद्यावर ! आणि अनुभविले ते त्याच्या सीमा, अनुराधा, काबुलीवाला, दो बीघा जमीन आणि गरम कोटमधल्या विशिष्ट पद्धतीच्या भूमिकांमुळे. अशा कलाकाराचे जे पैलू मला गवसले त्याचे अवलोकन करण्याचा प्रयत्न केलाय झालं !

...बाकी काही म्हणा, १९३५ ते १९७२ पर्यंतची हिंदी चित्रपटसृष्टीची कारकीर्द विचारात घेतली म्हणजे त्यात काही काही विशिष्ट सिनेमे अशा टप्प्याटप्प्याने विखुरलेले दिसतील की, त्यामुळे काही काही कलाकारांना 'स्टेक' मिळाला. १९५० मधला बाजी त्यापैकीच एक ! त्यामुळे गुरुदत्तची फिल्मी करीअर खऱ्या अर्थाने चालू झाली. तोपर्यंतच्या शामळू देवआनंदमध्ये चैतन्य आले. (लाथसुद्धा कशी स्टाईलिशपणे मारायची हे देवआनंदला बाजीमुळे उमगले–इति भाऊ पाध्ये) गायिका म्हणून गीतादत्त श्रोत्यांपर्यंत पोहोचली बाजीमुळेच. साहिरच्या काव्यमय गीतांची सुरुवात ह्याच सिनेमामुळे झाली आणि विशेष म्हणजे ह्या बाजीचा सांगाडा तयार केला होता बलराज सहानीने–कथा, पटकथा आणि संवादलेखक म्हणून.

तसं पाहायला गेले तर बलराज सहानीच्या जीवनातल्या पाच–सहा अवस्था आपल्याला पाहायला मिळतील. सुरवातीला विक्रेता म्हणून, १९४० पर्यंत शांतिनिकेतनमधला शिक्षक म्हणून, पुढे बी. बी. सी. वरचा निवेदक म्हणून आणि १९४४ च्या पुढे रंगमंचावरचा आणि पडद्यावरचा कलाकार म्हणून ! अर्थातच मधूनमधून सिद्धहस्त लेखक ह्या नात्याने कथा आणि प्रवासवर्णने लिहिण्याचा त्याचा प्रघात होताच. राजकारणातला एक मुरब्बी कार्यकर्ता हे अजून एक त्याचे स्वरूप. बलराज सहानीच्या ह्या 'भूमिका', जरी विविध प्रकारच्या असल्या तरी त्या सर्वांमधील काही समाईक गुण लगेच प्रकर्षाने जाणवतात–त्याची बुद्धिमत्तेची झलक, समज आणि समरसता !

मीनाकुमारीबद्दल एकाच वाक्यात बोलताना 'डिलीनिएटर ऑफ इमोशन्स' हे विशेषण जसे तिला शोभून दिसते त्याचप्रमाणे कलाकार म्हणून बलराज सहानीकडे बघताना त्याच्या अभिनयात 'कल्चर्ड' होते असे म्हटल्यास वावगे होणार नाही. अगदी अनिल विश्वासच्या संगीतामध्ये, तलतच्या आवाजामध्ये किंवा बिमलदाच्या दिग्दर्शनात जे 'कल्चर्ड' आपल्याला दिसते तसेच त्याच्या अभिनयात दिसते.

१९४८ मध्ये नलिनी जयवंत बरो-

---

दिलीप कुलकर्णी

---

थरच्या ‘ गुंजन ’मध्ये आणि के. असिफच्या ‘हलचल’मधील जेलरच्या भूमिकांमुळे जरी बलराजला सिनेसृष्टीत प्रवेश मिळाला तरी ‘ हम लोग ’च्या विक्षिप्त भावाच्या भूमिकेतला बलराज लोकांना अधिक आवडू लागला तर १९५२च्या ‘ दो बिघा जमीन ’मधील ‘ पीझन्ट ’च्या बलराजने प्रेक्षकांना मोहून टाकले. ‘ दो बिघा जमीन ’ बलराजच्या आणि बिमलदाच्या आयुष्यामधे मधील ‘ टर्निंग पॉईन्ट ’ ठरला ! ‘दो बिघा जमीन ’ची भूमिका अश्रद्ध (covicted) विचारसरणीच्या बलराजला खरी मानवणारी होती. त्यामुळे तो अक्षरशः त्यात रमून गेला. परंतु त्याच बलराजला १९५२ ते १९७२ पर्यंत त्याच्या विचारसरणीशी जुळणाऱ्या सीमा, गरम कोट, अनुराधा, हिरा मोती, राहीसारख्या हाताच्या बोटांवर मोजण्याइतपतच भूमिका वाट्याला याव्यात याचे आश्चर्य वाटते!

तरी पण मला बलराज सहानीचे कौतुक वाटते. कारण ज्या ज्या भूमिकांना त्याने हात घातला त्यात त्याने स्वतःला अक्षरशः वाहून घेतले आहे. मग तो के. ए. अब्बासचा राही, परदेसी असू दे, बिमलदाचा काबुलीवाला असू दे, किंवा अमिया चक्रवर्तीचा सीमा आणि कठपुतली असू दे ! अगदी गेल्या १०–१२ वर्षांतील भाभीकी चुडिया, सोनेकी चिडिया, हकीगत, वक्त, संघर्ष, दो रास्तेसारखे सिनेमेसुद्धा घ्या ! प्रत्येक सिनेमात स्वतःची वेगवेगळी झलक नेहमीच्या लकबीप्रमाणे तो दाखवून जाईल.

मी बलराज सहानीची तुलना नेहमी अशोककुमार आणि मोतीलाल यांच्याशी करतो. तिघांनीही आपल्या करीअरमध्ये सुरुवातीच्या काळात नायकाच्या भूमिका जितक्या सरसतेने केल्या तितक्याच सरसतेने आणि सहजतेने पुढच्या काळात सहाय्यक भूमिकांना त्यांनी न्याय दिला आहे. तरीसुद्धा अशोककुमार आणि मोतीलाल यांच्याशी त्याची तुलना मी वेगळ्या दृष्टिकोनातून करतो.

ज्या वेळेस १९५० मध्ये बलराज सहानीने नायकाच्या भूमिकांना आरंभ केला, त्यावेळी अशोककुमारने बॉम्बे टॉकीज आणि फिल्मिस्तानच्या चित्रपटांद्वारे स्वतःचे बस्तान बसविले होते आणि यथायोग्य लोकप्रियता त्याला लाभली होती. पुढे विविध पद्धतीच्या भूमिका त्याच्या वाट्याला येत गेल्या आणि त्याची लोकप्रियता सतत वृद्धिंगत होत गेली. म्हणजे ३०–३५ वर्षांच्या काळातील अशोककुमारचा चतुरस्रपणा आणि बलराज सहानीचा १५–२० वर्षांमधील चतुरस्रपणा आजमावला म्हणजे एक गोष्ट लगेच नजरेला येते की, अशोककुमार हा अनुभवाने कसबी अभिनेता आहे तर बलराज सहानी हा बुद्धिमत्तेने कसबी अभिनेता आहे. शिवाय दोघांमध्ये सहजता आणि सुंदरता असल्यामुळे दोघेही उच्च प्रतीचे कलाकार आहेत ह्यात वाद नाही. दोघेही अभिनयातले सिंह आहेत. तरी पण एक गोष्ट खटकते की, अशोककुमारला वाजवीपेक्षा जास्त लोकप्रियता मिळाली. उलट बलराज सहानीला पाहिजे तेवढी

लोकप्रियता त्या मानाने मिळाली नाही. अशोककुमार 'ओव्हर एस्टीमेट' झाला; बलराज, कदाचित लोकांना तितकासा समजला नसेल म्हणा, थोडासा अंडर एस्टीमेट झ.ला असे वाटते.

आता फक्त पडद्यावर दिसणारा बलराज सहानी बघा! तलाशमधील धनाढ्य बलराज किंवा कठपुतलीमधला नाटक कंपनीचा मालक आठवा. किंवा इतर सिनेमातील सुटाबुटातला, पांढर-पेशा, पोषाखातला बलराज आठवून बघितला तरी चालेल. तुम्हाला तो 'ॲरिस्टोक्रॅट' पद्धतीचा मनुष्य वाटेल. मोतीलालशी तुलना मी त्याची ह्या साठीच करतो. बलराज आणि मोतीलाल दोघेही पडद्यावर कित्येक वेळा 'ॲरिस्टोक्रॅट' नात्याने वावरलेले दिसतात. कदाचित मोतीलाल त्याच्या नेहमीच्या जीवनातही त्याच पद्धतीचा मनुष्य

## मुंबईतला पहिला धक्का

काय गंमत आहे बघा, शांताराम-बापूंनी कालिदासाच्या शाकुंतलाशी पूर्णत: अप्रामाणिक राहून तयार केलेला 'शकुंतला' सिनेमा १९४३ मध्ये प्रेक्षकांनी अक्षरश: डोक्यावर घेतला–सतत १०४ आठवडे! आणि कालिदासाच्या त्याच 'शाकुंतल'शी पूर्णपणे प्रामाणिक राहून निर्माण केलेला १९६० मधला 'स्त्री'......तो चित्रपट तसा चांगला चालला; परंतु 'शकुंतला'शी तुलना करता मात्र काहीच नाही. शकुंतलाची गंमत 'स्त्री' मध्ये नाही बुवा. असा अभिप्राय अनेकांनी व्यक्त केला.

तो 'शकुंतला' अगदी आधाशीपणे लंडनहून मुंबईला आल्यावर पाहिल्यावर बलराज सहानीला काय वाटले... सगळ्या आशा–आकांक्षा मातीमोल झाल्या. एका उंच पहाडावरून खाली ढकलल्यासारखे झाले. संस्कृतमधील 'अभिज्ञान शाकुंतलम्' कोमल अनुभूतिचा खजिना मानला जात असून शांतारामसारख्या माणसाने त्याच्यात सुरी खुपसावी? त्याच्यासारखा एवढा महान् दिग्दर्शक इतका रद्दीपणाने कलेचा 'खून' करू शकतो? छे, छे, हा दुसराच कोणी नवीन शांताराम उपटलेला दिसतोय!

४–५ वर्षांनंतर मुंबईला नवीनच आलेल्या बलराजला काय ठाऊक की, सिनेसृष्टीत कलेपेक्षा आता धंद्यालाच जास्त महत्त्व येऊ लागले आहे. न्यू-थिएटर्स आणि प्रभातच्या शांत, गंभीर सिनेमांचा जमाना संपला याची त्याला काय कल्पना? प्रभातमधून बाहेर पडल्यावर मुंबईत पाय घट्ट रोवन उभे राहायचे असल्यास लोकाभिरुचीला महत्त्व देऊन 'क्लासिक' विषयातही खच्चून मालमसाला 'शकुंतला'मध्ये भरणारा शांताराम त्याला नवीन होता. परंतु पुढे पुढे सिनेसृष्टीत रुळू लागल्यावर बलराजला ह्या गोष्टीची सवय झाली. ◻

असेल ! आणि बलराज सहानी जर अश्रद्ध बुद्धीमान मानला तर पडद्यावरच्या त्याच्या काही भूमिकांमध्ये तो विसंगत वाटतो. कदाचित् प्रत्येकवेळी प्रत्येकाच्या आवडीची किंवा स्वभावाची भूमिका त्याला मिळत जाते असे थोडेच आहे ? अगदी सोप्या आणि साध्या भाषेत सांगायचे झाल्यास काही काही वेळा केवळ 'पाटया टाकायच्या' म्हणून प्राप्त भूमिका निभावून न्याव्या लागतात ! त्यामुळे दो बिघा जमीन, हीरा मोती, अनुराधा, गरम कोट, राही, सीमासारख्या मोजक्याच भूमिका सोडल्या तर इतर कित्येक सिनेमात आपल्याला 'नेहमीचा' बलराज दिसणे थोडे कठीणच !

एवढं असून सुद्धा गंमत वाटते की बलराज त्या सर्व भूमिकांमध्ये अगदी पूर्णपणे समरस होऊन गेलेला आहे. हा त्याचा नेहमीचा स्वभाव.

वरील ह्याच मुद्द्यातून एक गोष्ट प्रतीत होते की बलराज पडद्यावर इन-डिफरन्ट (अलिप्त) भासतो. त्याने आपला राजकारणी स्वभाव पडद्यावर मुळीच येऊ दिला नाही. के. ए. अब्बास, मेहबूब खान, बिमलदा किंवा गुरुदत्त

## व्ही शांतारामशी पहिली भेट

एप्रिल १९४४ चा एक दिवस ! लंडनहून बी. बी. सी. चा निवेदक म्हणून चार वर्षे काम केल्यावर राजीनामा देऊन बलराज परत आला. अर्थात स्वदेशी आल्याचा आनंद होताच. मुंबईला आल्यावर त्याने पहिली गोष्ट केली—सुटबूटाला रजा देऊन शांतिनिकेतनमध्ये असतानाचा धोतर आणि कुडता चढविला. असाच एकदा मुंबईतल्या गल्लीबोळातून चालला असताना तोंडातल्या पानाची पिचकारी कडेच्या विजेच्या खांबावर थुंकताना समोर व्ही. शांतारामच्या नवीन सिनेमाचे शकुंतलाचे पोस्टर पाहून बलराज सहानी अवाक् झाला आणि एक आनंदाची लकेर एकदम चमकून गेली. त्याला एकदम आठवू लागले......

'पुण्यात १९३७ साली एकदा आलो असताना 'प्रभात'चा 'आदमी' पाहिला होता. तुम्हाला कसं सांगू की त्या सिनेमाचा माझ्या मनावर किती परिणाम झाला होता इतकं वास्तववादी चित्रण मला न्यू थिएटर्सच्या सिनामातसुद्धा पाहायला मिळाले नव्हते.' इति बलराज

व्ही. शांतारामची प्रतिभा बघून बलराजला राहवले नाही. त्याच रात्री लगेच त्याने एक भले मोठे प्रशंसा पत्र व्ही. शांतारामला लिहिले. अर्थात उत्तराची अपेक्षा नव्हतीच. परंतु आश्चर्य म्हणजे नुसते उत्तरच नाही तर बलराजला भेटण्याचे निमंत्रण शांतारामने पाठविले

ठरलेल्या दिवशी ठरलेल्या वेळेला प्रभात स्टुडिओमध्ये शांतारामची भेट झाल्यावर, इतका साधा-सुध्या पोशाखा-

सारखे निर्माते दिग्दर्शक यांना आपापल्या सिनेमातून स्वतःची विचारसरणी मांडायला पूर्णपणे मुभा मिळत गेली. परंतु केवळ अभिनेता असल्यामुळे म्हणा बलराजला ही संधी फारच थोड्या वेळा मिळाली. त्यामुळे ह्या दृष्टिकोणातून बलराज स्वतःच्या भूमिकांबद्दल संतुष्ट असेल का अशी शंका येते.

अजून एका कलाकाराशी मी बलराजची हटकून तुलना करतो. तो म्हणजे गुरुदत्त! दोघेही बुद्धीमान आणि दोघेही 'डेडिकेटेड!' तरी पण गुरुदत्त हा भावनाप्रधान बुद्धीमान (इमोशनली अॅटॅच्ड इन्टलेक्चुअल) होता तर बलराज सहानी सायकॉलॉजिकल मायन्डेड इन्टलेक्चुअल होता. गुरुदत्तचा 'कागज के फूल' पाहिला की हमखासपणे मला बलराजच्या 'सीमा' आणि अनुराधा'ची आठवण होते. सीमा मध्ये त्याची भूमिका होती अनाथाश्रमाच्या मालकाची. आश्रमात आलेल्या सगळ्यांचे प्रश्न प्रायोगिक पद्धतीने हाताळताना त्याने प्रत्येकाला मानसशास्त्रीय दृष्टिकोणातून अनुभविलेले दिसते. आढ्यताबाज नूतनला वठणीवर आणताना त्याच्यातली मानस-

---

तला मनुष्य सिनेमाचा दिग्दर्शक असू शकतो...छे, छे, बलराजचा विश्वासच बसला नाही. तसं पाहिलं तर पी. सी. बरुआचे साधेपण त्याने अनुभविले होते. परंतु बलराज म्हणतो, 'इतका साधा मनुष्य की, फारतर प्राथमिक शाळेचा शिक्षक शोभेल'.

गंमत तर पुढे आहे.

आपल्या 'आदमी 'ने खूप प्रभावित झालो आहे म्हणून बलराजने शांतारामला सांगितले. 'मला पण आपले नावच केवळ परिचित नाही, तर आपल्या कित्येक कथा माझ्या नजरेखालून मी घातल्या आहेत; एखादी कथा सिनेमासाठी योग्य वाटल्यास आपण जरूर मला द्यावी. चांगल्या कथावर आपण सिनेमा काढू.' असे शांताराम म्हणाल्यावर दुसरा आश्चर्याचा धक्का बलराज सहानीला बसला.

पुण्यामधला एक मनुष्य पंजाबमध्ये 'हंस' आणि 'विशाल भारत'मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या आपल्या कथा वाचतो हे समजल्यावर बलराज सहानीला व्ही. शांतारामचे कौतुक वाटल्यावाचून राहिले नाही.

...पण! ज्याप्रमाणे सत्यजित रे आणि बलराज सहानी यांना मनात इच्छा असूनसुद्धा कधी एकत्र काम करण्याची संधी मिळाली नाही, त्याचप्रमाणे त्याच बलराज सहानीला आणि शांतारामला गेल्या २०–२५ वर्षांत कधी एकत्र येता आले नाही याचे आश्चर्य वाटते...रुखरुख लागते.

□

शास्त्रीय घडण आपल्याला दिसते.

दोघेही जण भूमिकेच्या गाभ्यात शिरले तरी दोघांची पद्धत वेगवेगळी आहे चक्रीवादळाचा आलेख डोळ्यापुढे आणा गुरुदत्त वरपासून अगदी आत खालवर जात राहतो. तर बलराज खालपासूनच्या गाभ्यापासून वरवर यत जातो.

बलराजची ही विशिष्ट पद्धतीची 'स्टाईल' आहे. त्यामुळे कित्येक वेळा तो पडद्यावर थोडचा वेळ असला तरी प्रेक्षकाना मोहून टाकेल तर काही काही वेळा संपूर्ण सिनेमा सुद्धा 'खाऊन' टाकेल. 'वक्त'मध्ये सुनील दत्त, राज कुमार शशीकपूर वगैरे वगैरे मान्यवर अभिनेत्यांचा खच असला तरी पडद्यावर सुरुवातीलाच बलराजने प्रेक्षकांना थोडयाच काळात मोहिनी घातलेली दिसेल. शेवटी शेवटी पुन: पडद्यावर आल्यावर पुन्हा एकदा जुनी 'पकड' घेतो, घट्ट करतो. अगदी नुकतेच येऊन गेलेले दो रास्ते, जवानी दिवानी एक फूल दो माली, नीलकमलसारखे सिनेमे पाहिले म्हणजे मी म्हणतो त्याची सत्यता पटेल. आता बलराज सहानी-सारखा अश्रद्ध, बुद्धीमान असा दुर्मिळ कलाकार पाहिला म्हणजे एक प्रश्न लगेच उपस्थित होतो की, हिन्दी

## चेतन, नीचानगर आणि बलराज

हिंदुस्थानात परत आल्यावर पुन्हा साहित्यात पडावे की पुन्हा शांति-निकेतनात जावे ह्या द्विधा मन:स्थितीत बलराज सहानी होता. वडील तर म्हणत होते, 'शांतिनिकेतनऐवजी बी. बी. सी. अनुभवावर कुठल्याशा आकाशवाणीवर नोकरी कर.' एवढ्यात त्याचा कॉलेजचा जुना साथीदार चेतन आनंद त्याला भेटला होता आणि त्याने आपल्या 'नीचानगर'साठी बलराजला आणि त्याच्या पत्नीला—दमयंतीला विचारणा केली होती. मोबदला वीस हजार रुपये! चेतनने त्याला त्याची कथा पण सविस्तरपणे ऐकविली होती. आपला मुलगा सिनेमात जातो आहे हे कानावर आल्यावर वडिलांनी आकांडतांडव केलाच; परंतु अखेर २० हजार रुपये मिळतायत हे लक्षात घेऊन ते मूग गिळून गप्प बसले.

आणि बलराज पुण्याला नवयुग स्टुडिओचे डब्ल्यू. झेड. अहमद यांना भेटायला आला. मेकअप करून वेगवेगळे फोटो काढून झाल्यावर दोन वाजता अहमदसाहेबांची भेट घ्यायची म्हणून तो वाट बघत बसला. परंतु ६ वाजले तरी भेटण्याचा पत्ता नाही. लंडनच्या वक्तशीरपणाचा परिणाम मनावर झालेला बलराज अस्वस्थ झाला. अखेर ६ वाजता अहमदसाहेबांनी आत बोलाविले. त्याच्या फोटोंच्या प्रतीची स्तुती केल्यावर अहमद म्हणाले, 'हे बघा. चेतन आनंदची कथा आता घेण्याचा माझा विचार नाही. आधी मी 'महाभारत' बनविण्याचे योजिले आहे. त्यात कृष्ण

निर्माते दिग्दर्शकांनी त्याचा पुरेपुर उपयोग केला का? अगदीच काटेकोरपणे एकाच वाक्यात सांगायचे झाल्यास 'नाही' असेच म्हणावे लागेल. कारण त्या आधी आपल्या निर्माते दिग्दर्शकांना बलराज समजला, किती हे पडताळून पाहावे लागेल आणि ज्यांना तो समजला त्यांनी त्याचा कितपत उपयोग केला.

विमलदा (दो बीघा जमीन, काबुलीवाला), अमिया चक्रवर्ती (सीमा, कठपुतली), के. ए. अब्बास (राही परदेशी) आणि फार तर ऋषिकेश मुखर्जी (अनुराधा) सारख्या चौघापाच जणांनाच 'खरा' बलराज 'उमगला' आणि तोच बलराज पडद्यावर आणण्याचा त्यांनी प्रयत्न केला.

ऋषिकेश मुखर्जी हा एक 'दृष्टीवान' दिग्दर्शक! सिनेसृष्टीत जे जे महान त्याला दिसले ते ते डोळ्यापुढे ठेवून त्यांच्यासाठी त्याने कथा लिहिल्या आणि आपल्या सिनेमात त्यांना चमकविले. दिलीपकुमारसाठी त्याने 'मुसाफिर' काढला, अशोककुमारसाठी त्याने 'आशीर्वाद' काढला, भोळा भाबडा राजकपूर बघून त्याने त्याला 'अनाडी' बनविले, शर्मिला टागोरला आणि जया भादुरीला अनुक्रमे

---

चेतन होतील आणि आपण अर्जुन व्हायचे. त्यांना दीड हजार महिना पगार आणि तुम्हाला एक हजार रुपये! मंजूर असल्यास कॉन्ट्रॅक्टवर सही करा...'

पगार कमी होता का जास्ती होता ह्याची पर्वा बलराजला नव्हती. विलायतेहून त्याच्या तिप्पट पगाराच्या नोकरीचा राजीनामा देऊन तो मोठ्या आशेने मायदेशी परतला होता.

'फक्त चेतनच्या सिनेमात काम करण्याच्या इराद्याने मी इथे आलेलो आहे. अर्जुन-बिर्जुन बनण्यासाठी नव्हे.'

'विचार करा सहानीसाहेब, आमचा 'महाभारत' फक्त धार्मिक नाही, त्यात अनेक पैलू आहेत जे आपल्याला निश्चित पसंत पडतील.'

परंतु स्वाभिमानी बलराज त्यांच्या हजार रुपयालाही भुलला नाही की त्यांच्या गोड बोलण्यालाही! चार तास वाट पाहूनही क्षमा वगैरे न मागता हा पठ्ठ्या नुसताच गोड बोलतोय? चक्क कॉन्ट्रॅक्ट मोडून बलराज तडक केबिनबाहेर पडला. तिथे चेतन उभा होताच. 'मी सही केली कॉन्ट्रॅक्टवर' चेतन. बलराज सहानी चकित झाला. चेतनच्यासाठी त्याने कॉन्ट्रॅक्टवर सही केली नव्हती आणि चेतन तर चक्क सही करून बसलेला!

परंतु चेतन काही कच्च्या दिलाचा माणूस नव्हता त्याने पुण बलराजसाठी अखेर कॉन्ट्रॅक्ट मोडले. ◻

'अनुपमा' आणि 'गुड्डी' केले. गुरुदत्त साठी 'सांझ और सवेरा' आणि बलराज सहानी (आणि लीला नायडू) साठी 'अनुराधा' निर्माण केले तर खन्ना साहेबांसाठी 'आनंद' पेश केला.

त्याच ऋषिकेशच्या 'अनुराधा'-मधील ध्येयवादी डॉक्टरच्या भूमिकेतील बलराज बघा. पडद्यावरच्या त्याच्या हालचाली अक्षरशः वाखाणण्यासारख्या आहेत. इतका एकाग्र, मग्न आणि ध्येयवादी डॉक्टर त्याने उभा केला आहे की बलराज म्हणजे अक्षरशः एक सायंटिस्ट वाटतो. रात्रीच्यावेळी मस्त वातावरण आणि पौर्णिमेचा चंद्र! साजशृंगार केलेली अनुराधा आपल्या पतीची वाट बघत बसलेली! आणि हा आपला सूक्ष्मदर्शक यंत्रातून गलिच्छ पाण्याच्या थेंबातील जंतू पहात बसलेला! हाच स्वतःच्या नादात नेहमी असलेला बलराज आपल्या कलाप्रिय आणि एकाकी अनुराधेवर अन्याय झाला म्हणून पुढे पस्तावतो आणि तिला योग्य (?) न्याय देण्याचा प्रयत्न करतो. माझ्या मते बलराजच्या जीवनातील ही भूमिका म्हणजे एक माईलस्टोन!

......तर हा झाला पडद्यावरचा कलाकार बलराज सहानी! प्रत्यक्ष जीवनातील काही तत्त्वांचाच आकार घेऊ शकलेला बलराज! अशा कलाकाराला एकदा दिल्लीतील एका विद्यापीठाच्या पदवीदान समारंभाच्या 'ॲड्रेस'ला बोलाविले होते. सिनेसृष्टीतील व्यक्ती म्हणून कित्येकजणांनी नाकं मुरडली. परंतु त्याचे विचारप्रधान भाषण ऐकून सगळे अवाक् झाले. कारण शेवटी बलराजला युवकांच्याबद्दल खरीखुरी आस्था होती. सामाजिक प्रश्नांबद्दल मनापासूनची तळमळ होती आणि ह्या सगळ्या गोष्टींसाठी धडपडायाची जिद्द होती. अगदी जवळचेच उदाहरण बघा ना! नुकत्याच उठलेल्या 'वंदे मातरम्'च्या ज्वलंत प्रश्नाबद्दल अगदी परखड शब्दांतून त्याने 'टाईम्स ऑफ इंडिया'त पत्राद्वारे फाडलेली वाचा त्याच्या मनाचे प्रतिबिंब दर्शविते.

अशा बलराज सहानीच्या निधनाने त्यांच्या निकटवर्तीयांना त्याची उणीव भासेल, त्याची सतत आठवण येईल हे एकदम कबूल! परंतु ह्या सिनेसृष्टीतल्या कित्येक निर्माते व दिग्दर्शकांना त्याच्यामुळे 'पोकळी' निर्माण झाली असे वाटते, हे कसे काय? जोपर्यंत चालले आहे तसं चालू द्या अशा


पुरंदरच्या बुरुजावरून

ब. मो. पुरंदरे

मूल्य : चार रुपये

राजहंस प्रकाशन

न्यायाची १९६५ नंतरची ही सिनेसृष्टी आहे, तिला 'पोकळी' म्हणजे काय ह्याची कल्पना तरी आहे काय? बलराजचा उपयोग ज्यांनी चांगला केला किंवा ज्यांना अजून चांगला करायची इच्छा होती असे बिमलदा, अमिया, गुरुदत्त, मेहबूब खानसारखे दिग्दर्शक जग सोडून गेले, तर काही ह्या मायावी सिनेसृष्टीपासून दूर राहिले. आता शिल्लक काय राहिले? 'त्याच्या निधनाने हिंदी चित्रपटसृष्टीचा फार मोठा 'तोटा' होईल'सारखी कित्येक निर्मात्यांनी व दिग्दर्शकांनी केलेली प्रतिक्रिया एक वल्गना आहे. आपण फार मोठ्या माणसाबद्दल मोठ्या निष्ठेने बोललो अशी ती केलेली स्वतःच्या शुद्ध मनाची फसवणूक आहे.

मला फक्त सत्यजित रे ची प्रतिक्रिया आवडली. बलराज सहानी हा दुर्मिळ अभिनेता आहे हे मान्य केल्यावर आम्हा दोघांना एकत्र काम करण्याची संधी मिळू शकली नाही ह्याची खरीखुरी खरखर ते व्यक्त करतात आणि तसं पाहिलं तर बलराज सहानी आणि सत्यजित रे यांची मतं पुष्कळ मिळतीजुळती होती.

बलराजच्या चाहत्यांना मात्र त्याच्या मोठेपणाची नेहमीच आठवण येत राहील. त्याची 'यादे' ही आत्मकथा त्यांना जुन्या आठवणींचा उजाळा देण्यास उपयोगी पडेल तर त्याचे कित्येक सिनेमेच त्यांना ह्यापुढे साथ देतील.

● ● ●

## सप्रेम नमस्कार....

पृष्ठ ३ वरून

''लेखामध्ये मराठी नाटक थिटे का?' या लेखमालेचा उल्लेख खूप वेळा आला आहे. पण प्रत्यक्षात या लेखमालेतून श्री. मनोहरांनी कोणती भूमिका मांडली आहे याबद्दल श्रीमती भावे काहीच सांगत नाहीत. मनोहरांबद्दल लिहिताना मनोहरांना काय मांडायचे आहे किंवा त्यांची वैशिष्ट्ये कोणती याला प्राधान्य हवे. लेखिकेचे (किंवा अन्य टीकाकारांचे) त्यांच्याशी मतभेदाचे स्वरूप काय आहे याची जंत्री कशाला?

असो. असे असले तरी पुष्पा भावे यांनी माधव मनोहर यांच्याबद्दल दुसऱ्या व शेवटून दुसऱ्या परिच्छेदामध्ये लेखाच्या हेतुंशी प्रामाणिक राहून लिहिले आहे, हे खरेच.

टिकेविना : याच लेखातील शेवटच्या परिच्छेदामध्ये लेखिकेची मल्लिनाथी :

'आता सदरातून (पंचम) मुक्त झाल्यावर ते (माधव मनोहर) नाट्यविषयक तात्त्विक लेखन करतील अशी आशा आहे.' अश्विनीकुमार फडके,
१९ एप्रिल, ७३ पुणे

□ अरुणा अंतरकर यांनी लिहिलेले 'मीनाकुमारी' हे दोन जबरदस्त व्यासंगपूर्ण लेख वाचलेत. प्रमेय जसे पक्के घोकून शेवटी सा. सि. म्हणा-

चयाचे तसलेच हे लेख ! अर्थात् पुण्यतिथी म्हटली की हे होणारच. भारतीय चित्रपटांना लागलेल्या (किंबहुना मनालाच) कमालीच्या स्थिरतेच्या छापामुळे तिच्यातील अभिनयगुण एकाच साच्यातून आले हे खरे, पण म्हणून त्यातच विविधता होती व श्रेष्ठत्व होते असे म्हणण्याचा अट्टाहास का ?

२-४ जडजंबाल संदर्भ दिले म्हणजे वाचणारा गार होतो (अगदी जहागीरदारदेखील) एरवी खुशवंतसिगांनी दिलेला किस्सा हा त्यांच्या हिंदी चित्रपटाच्या अज्ञानाचा होता, मीनाच्या साधेपणाचा नव्हे. हेच नव्हे तर 'पाकीजा' या महान(?) चित्रपटाची नायिका लता होती व मीनाने त्यात ठोकळेबाज चेहऱ्याने काम केले.' हा सरदारजींचा शेरा वाचणाऱ्यांनी वाचलाच नसेल ?

भारतीय स्त्री (म्हणजे द्रौपदी नव्हे, जाबाली नव्हे तर फक्त सीता) या वीट आणणाऱ्या रूपात आम्ही लोकांनी प्रथम (जन्म ५० चा सुमार) तिला बघितले. पण तरीही बैजू-बावरा, आजाद, साहिब बीबी, बघताना वाटले एवढं जबरदस्त गुण असणाऱ्या मीनाला योग्य भूमिका मिळाल्या नाहीत, ही महान शोकांतिका व वास्तवता. एरव्ही शब्दाचे डोलारे रचून तो एकसुरीपणा मनाला भिडू शकणारा नाही.

लेखिकेचा दोष नाही. एखादी गोष्ट का कोण जाणे आवडते व आपण तिचे मोठेपण सिद्ध करण्याचा प्रयत्न करतो. बस्स् एवढेच.

१८ एप्रिल, ७३ अभिनव गुप्ता, पारस

## युक्रांद कार्यकर्त्यांची भूमिका

◻ श्री. मा. भावे यांनी समस्त युक्रांदियांना उद्देशून लिहिलेले अनावृत्त पत्र वाचले. (माणूस ३१ मार्च)

श्री. भावे यांनी आपल्या पत्रात चातुर्वर्ण्याचा भारतीय मनावर प्रभाव का आहे याची मिमांसा करण्याचा खोटा आव आणला आहे. गांधी, राजवाडे यांनी देखील चातुर्वर्ण्याचा पुरस्कार केला असे सांगून त्यांना काय साधायचे आहे ते कळत नाही. गांधीजींच्या धोरणाबाबत चर्चा हा एक वेगळा विषय होऊ शकेल. कारण गांधीजींनी सुरुवातीला चातुर्वर्ण्याचा पुरस्कार केला असला तरी ते शेवटी अस्पृश्यतेविरुद्ध बोलत होते हे भावे सोयीस्कररीत्या विसरलेले दिसतात. म्हणून अनेकांची नावे देवून चातुर्वर्ण्याचे श्रेष्ठत्व पटविण्याचा त्यांचा प्रयत्न त्यांच्या दृष्टीने कावेबाज असला तरी एकूण मूर्खपणाचाच आहे. कारण आम्ही देखील एकनाथ, तुकाराम आदि संतापासून तो फुले, आंबेडकर, सावरकरांपर्यंत अनेक व्यक्तींचे दाखले देवू शकतो.

भावे म्हणतात की, 'आमच्यापेक्षा सुसंघटित संघटनांनी व प्रतिभावंत नेत्यांनी याच्याबाबत प्रयत्न केला आहे'. आम्ही कधी नाकबूल करतो ? उलट आम्ही देखील फुले, आंबेडकरांपासून स्फूर्ती घेतली आहे. आंबेडकरांनंतर ही चळवळ थोडी खंडीत झाली होती. इतकेच. त्याचा अर्थ आम्ही प्रयत्न न

करता गप्प बसावे असा आहे की-काय ? सावरकरांनी जो विचार (चातुर्वर्ण्या-बाबत) मांडला तो आम्ही नाकारीतच नाही. पण सावरकरांची शोकांतिका अशी की,त्यांच्या अनुयायांनीच त्यांचा हा विचार अडगळीत फेकून दिला आहे. म्हणून तर शंकराचार्य सावरकरांची स्तुस्तीस्तोत्रे गात आहेत. विचारांना बगल देऊन, त्या नेत्याविषयीच्या वैयक्तिक भावनेला आवाहन करणे व जनतेचा बुद्धीभेद करणे ही भारतातील धर्ममार्तंडांची जुनी चाल आहे. तीच श्रीमान शंकराचार्यांनी पुन्हा वापरली.

चातुर्वर्ण्याच्या तत्त्वज्ञानाची भारतीय जनतेला भुरळ का पडली याची चिकित्सा करताना भावे म्हणतात, 'सर्व जीवनाच्या अंगोपांगांना स्पर्शून जाईल अशी ही रचना आहे व त्यासाठी येथील सर्व घटकांनी त्याग केला आहे.' हजारो वर्षांपासून अस्पृश्यांच्या कित्येक पिढ्या अर्ध्या-चतकोर शिळ्या भाकरो-वर राबराब राबताहेत, तो त्यांचा त्याग असेल तर स्पृश्यांचा त्याग कोणता ? खरे असे आहे की, हे तत्त्वज्ञान एक ढोंग आहे. चातुर्वर्ण्य हे शोषणाचे एक तत्त्वज्ञान आहे. बहुसंख्यांच्या श्रमावर काहींना जगता यावे म्हणून तयार केलेले हे तत्त्वज्ञान आहे. खालच्या जातींनी मरेमरेतो काम करायचे, काहीही अपेक्षा न ठेवता, धर्माने सांगितलेले कर्तव्य म्हणून ! आणि मूठभर उच्च (तथा-कथित) जातींनी यांच्या श्रमावर जगायचे ! त्यावेळी औद्योगीकरण नव्हते म्हणन शोषण करायचा हा धार्मिक मार्ग शोधून काढलेला आहे.

पूर्वजन्म व पापपुण्याचे तत्त्वज्ञान सांगून हिंदू जनतेला विचार करायला वा प्रयत्न करायला या धर्ममार्तंडांनी कधीच वाव दिला नाही. मी गरीब का ? कारण मागच्या जन्मीचे पाप ! मी अस्पृश्य का ? मागच्या जन्मीचे पाप ! मी प्रयत्न करून वर येण्याचा प्रयत्न केला तर ? नाही. मी प्रयत्न करता कामा नये ! कारण माझे या जन्मीचे सर्व व्यवहार पूर्वसंचितानुसार ठरलेले आहेत ! अशा प्रकारचा प्रचार करून भारतीय जनतेला विचार कर-ण्याची संधीच यांनी कधी दिली नाही. आणि विचार कसा करणार ? कारण अभ्यास करण्याचा मक्ता एका विशिष्ट वर्गाकडे, बाकीचे फक्त दिवसभर श्रम करून कसे जगायचे या विवंचनेत. मग विचार करायचा कधी व कसा आणि वर पापपुण्य पुनर्जन्माच्या प्रचा-राचा दणका चालूच. आमच्या धावेला यांनीच कुंपण घातले नि वर आमची धाव कुंपणापर्यंतच अशी शेखी मिर-वायला हे तयार ! ज्यांना विचार करण्याचे स्वातंत्र्य होते ते हा विचार कशाला करतील ? कारण आपल्या हातात असलेली धार्मिक सत्ता टिकवण्या-साठी काय करायचे या पलीकडे ते जातच नाहीत. सांगायला एक कारण आहेच–पूर्वसंचित !

पोकळ गोष्टी सांगताना त्याला तत्त्वाचा मुलामा चढविण्याची खुबी हिंदूधर्म मार्तंडांनी आतापर्यंत वापरली आहे. त्याचाच वापर भाव्यांनी आपल्या

पत्रात केला आहे. 'कोणतीही दोन मनुष्ये समान नसतात' हे चातुर्वर्ण्याचे तत्त्वज्ञान सांगताना त्याचे स्पष्टीकरण मात्र करीत नाहीत. मनुष्याच्या शरीराच्या ठवणीतील थोडी विविधता अथवा स्वभावधर्मातील वैचित्र्य यालाच भावे व शंकराचार्य विषमता म्हणतात. पण वैचित्र्य म्हणजे विषमता नव्हे. जर प्रत्येक मनुष्य वेगळा असता तर प्रत्येक माणसाकरिता वेगळा धर्म झाला असता. हिंदू म्हणून प्रत्येक माणूस राहू शकतो पण समाजात मात्र भेदाभेद! असला प्रकार फक्त चातुर्वर्ण्याचा पुरस्कार करणारेच करू शकतात!

भाव्यांनी चातुर्वर्ण्याचा पुरस्कार करताना रसेल उगीचच मधे आणला आहे. (मोठ्यांची नावे घ्यायची, असते एकेकाची सवय!). रसेल हा गणित शास्त्रात परास्परविरुद्ध सिद्धांत मांडणारांशी चर्चा करायचा. अशा चर्चा करण्यानेच विचार पक्का होतो हे मत त्याने मांडले आहे. पण येथे तर उलटाच प्रकार आहे! चर्चेसाठी ओठ फुरफुरायचे सोडून तुमचे बाहु का फुरफुरतात? वाद घालायचे सोडून शंकराचार्य पळून जातात. (मुंबईलाही हेच घडले.) कारण त्यांना आपल्या तत्त्वातील फोलपणा जाणवतो आहे.

शेवटी भाव्यांनी म्हटले आहे की, 'चातुर्वर्ण्यापासून अलग असे आनंदी परिवार आम्ही निर्माण करावेत'. आम्ही असे मानतो नि लोकशाहीत हे गृहीत आहे की, माणूस हा माणूस म्हणून जगावा. समाजात वावरताना माणूस परस्परावलंबी असतो. आपापल्या गरजांच्या पूर्ततेसाठी माणसाला एकमेकावर अवलंबून रहावे लागते. असे सामाजिक संबंध प्रस्थापित करून प्रत्येक व्यक्तीचा विकास व्हावा हे लोकशाहीचे मलतत्त्व आहे. त्यामुळे असे वेगवेगळे गट करून रहाणे हा प्रकार मूर्खपणाचा आहे.

श्री. भावे यांनी गोलमाल भूमिका न घेता स्पष्टपणे शंकराचार्यांची बाजू घेऊन लिहिले असते तर तो त्यांचा प्रामाणिक प्रयत्न झाला असता. त्यांनी नि:पक्षपाती भूमिका वठवतो आहोत असा आव आणला आहे. परंतु प्रत्यक्षात ते आपल्या एकारांती आडनावाशीच (mighty एकारांत भावे, भिडे, थत्ते वगैरे प्रकारची आडनावे सर्वश्रेष्ठ मानली जातात.) अधिक प्रामाणिक असल्याचे जाणवते.

आ. भ. खंदारे, द्वारा प्रा. विजय दिवाण, एस. बी. कॉलेज औरंगाबाद, प्रकाश परांजपे, १४३६ आग्रारोड, धुळे. युक्रांद कार्यकर्ते. ●

## विश्व हिंदू परिषद संमेलन

पृष्ठ ७ वरून

सारखा. लाल, प्रचंड कुडता. चेहऱ्यावर खूप खाऊन पिऊन चढलेले ऐश्वर्याचे तेज, बरोबर एक सेक्रटरी, शरीर संरक्षक, भंपकगिरीत काही कमी नाही. तमाशातली कृष्णाची टिंगल थांबवण्यासाठी मनगटाचा उपयोग करण्याचे आवाहन त्यांनी केले. 'देवदेवतांची विटंबना थांबवा, चुटकीसारखे सर्व प्रश्न सुटतील.' जादूची कांडीच आहे त्यांच्याजवळ. कृष्णाचा अवतारच.

सबंध परिषदेत दुष्काळावर एक अक्षरही नाही. अत्यंत कठीण अवस्थेत देश सापडला आहे. आर्थिक प्रश्न बिकट होत आहेत. कोणालाच ह्याची चिंता दिसली नाही.

ही सर्व मंडळी कोणत्या काळात वावरत आहेत? समाजाचे प्रश्न कोणते आहेत? ते सोडवण्याचे आज कोणते मार्ग आहेत ह्याची ह्या विद्वानांना जाणीव आहे की नाही?

गरिबांचा प्रश्न. असंख्य हिंदूबांधव गरीब आहेत ह्यावर जोर देण्यात आला, मग गरिबी दूर करण्याचे मार्ग कोणते?

तळासरीला जे काम परिषद करते आहे ते चांगले मानता येईल. कोणत्याही मार्गाने का होईना पण गरीब आदिवासींचा विकास साधला जात असेल तर अमूक एका धर्मानेच का विकास केला हा मुद्दा गैरलागू ठरेल. मागासलेल्या माणसांना उत्थापन मिळते हेच महत्त्वाचे. परंतु तळासरीचा प्रयोग अपवादात्मक तर नाही ना? असे प्रयोग आणखी का होत नाहीत? परिषदेच्या ह्या संमेलनाच्या भंपक पद्धतीने गरिबांचा प्रश्न सुटेल काय?

राजमाताजींचा मार्ग भलताच सोयीस्कर. त्या म्हणतात की, 'आपसात चांगले संबंध तयार करा, श्रद्धा व निष्ठा बाळगा, परस्परांची सुखदुःखे समजून घ्या. बस्स गरिबी हटेल.' एकीने सांगितले की, 'मनात जर अशांतता असेल तर वेद वाच, गीता पठन कर, सुखी होशील.'

मनाच्या अशांततेची कारणे काय? भौतिक अशान्तता, असरक्षिततेची भावना, वैफल्य ह्या घटकांचा मोठा प्रभाव असतो ना? मग गीता वाचून ती अशांतता दूर कशी होणार!

तुम्ही कितीही मूल्यांचा, सनातन धर्माचा, वेदांचा, देवादिकांचा उदोउदो करा, आंतरराष्ट्रीय बाजारात जर तांदळाची किंमत घटली तर हिंदुस्तानच्या तांदळाच्या किंमती घसरणारच. जगातल्या इतर राष्ट्रातल्या आर्थिक घडामोडींचे परिणाम तुमची इच्छा असो नसो हिंदुस्थानवर होणारच. त्यावर उपाय काय?

ह्या देशात प्रगती साधायची असेल तर जे काही आर्थिक सिद्धांत – मग ते म्लेंच्छांचे किंवा टोपीकरांचे असोत – आज मान्य आहेत त्यानुसारच आखणी–नियोजन करावे लागणार.

व्याप मोठा असेलही. पण जर जगायचे असेल तर मार्क्स-कीन्सच्या मतांचा विचार करावाच लागणार.

महाराष्ट्रात दुष्काळ आहे. कशामुळे? काय आहेत कारणे? शोधून काढण्यासाठी वेदांचा अभ्यास कितपत उपयोगी पडणार? पण राम-रावणाच्या जगात रमणारी ही मंडळी विचार करूच शकत नाहीत असे दिसते.

ब्रह्मचारी विश्वनाथ आपल्या भाषणात म्हणाले की, महाराष्ट्रात मुसलमान ५०% व ख्रिश्चन ३०%ने वाढले आहेत, किती धर्मांतर होत आहे पहा! म्हणजे ख्रिश्चन व मुसलमानांना गेल्या काही वर्षांत पोरे झालीच नाहीत. वाढ झाली ती केवळ धर्मांतरानेच असा अर्थ ते काढतात. आकडेशास्त्र अर्थशास्त्राचे आधार घेतानाही किती अशास्त्रीय निष्कर्ष काढले जातात त्याचा हा नमूना. पण समस्त श्रोतृवर्ग मात्र मोठ्या कौतुकाने ब्रह्मचारीबुवांचे भाषण ऐकत होता.

देशाला किंवा समाजाला संस्थात्मक बदल हवे आहेत हेही या लोकांच्या गावी नाही. विचारांना पद्धत लावणे (Systamatization) ह्या मंडळींना नको, पण त्याशिवाय गत्यंतर नाही हे त्यांना समजत नाहीसे दिसते.

दुसऱ्या महायुद्धात काही जपानी सैनिक जंगलात गुप्त झाले. युद्ध संपून वीस वर्षे होऊन गेली तोपर्यंत त्यांच्यापैकी बरेचजण जंगलातच होते. एक पठ्ठा तर गेल्या आठवड्यातच बाहेर आला. युद्ध संपले आहे, जग बदलले आहे ह्याची त्याला जाणीवच नाही.

विश्व हिंदू परिषदेतले अनेक लोक तसेच आहेतसे वाटते.

बुवाबाजी खूप. गप्पा खूप. जाडजूड शब्द. सामान्य माणसाला आकलन न होणाऱ्या मोठमोठ्या अंधूक अध्यात्मिक कल्पना, सापेक्षतावादाचा सुळसुळाट, जगात आपल्यालाच सत्य समजले आहे अशा थाटातली प्रवचने!

एक भेळपुरीही. ह्या विश्व हिंदू भेळपुरीत आंबट-गोड, मऊ-कठीण, खारट-तिखट सर्व काही आहे.

सनातन धर्म म्हणजे केवळ वैदिक धर्म असे कोण म्हणते, तर दुसरे स्वामी सनातन म्हणजे सतत बदलणारा म्हणजे आजचाही धर्म असे सांगतात. प्रत्येक धर्म हा एक ईश्वराकडे पोचण्याचा मार्ग असतो असेही ह्या व्यासपीठावर सांगितले गेले आणि त्याच ठिकाणाहून ख्रिश्चन-मुस्लिमांचे रूपांतर पुन्हा हिंदू धर्मात करून घेण्याचे आवाहन केले गेले. चिन्मयानंद-सत्यमित्रानंद सतत राजकारणावर, राजकीय पक्षांवर झोड उठवत होते; त्याच ठिकाणाहून राजकारणापासून धर्म वेगळा राहूच शकत नाही, वेगळेपणाचा विचार चूक आहे, हा दुसऱ्या टोकाचा आग्रह राजमाता शिंदे धरत होत्या. पदोपदी अशी एकमेकाला शह देणारी विधाने होत होती. पुन्हा सर्व मंडळी विद्वान किंवा विदूषी, सर्वांच्या तोंडून अमृतवर्षा! तोंड कोणालाच नव्हते. सर्वांचीच मुखारविंदे! भयंकर दमछाक व्हायची!

दत्ता बाळांचा, कृष्णलीला न करणारा, जलक्रीडा न करणारा, गोपींशी न खेळणारा, त्यांची वस्त्रे न पळवणारा, अगदी 'मोरु' आणि बावळट श्रीकृष्णच ह्या सर्वांना सद्बुद्धी देवो! ● ● ●

MANOOS (Weekly) : 50 Paise : Regd. No. MH-649

# परकीयांच्या दृष्टिकोनातून आपला दुष्काळ

□ माणूसचा एक फार पूर्वीपासूनचा वाचक एवढीच तुमची व माझी ओळख आहे. गेले दोन महिने उच्चशिक्षणासाठी स्कॉटलंडला आल्यापासून मराठीच काय पण इतर भारतीय वृत्तपत्रांचा संबंध तुटला आहे. इथल्या वृत्तपत्रात येणाऱ्या विदेशवार्ता सदरातील त्रोटक बातम्यांवर समाधान मानावे लागते. नुकताच 'The scotsman' या एडिंबरा येथून निघणाऱ्या एका पत्रातील महाराष्ट्राच्या दुष्काळासंबंधी लेख वाचला व आपण इतक्या दूर असल्याने फारच असहाय्यता जाणवली. दुष्काळात काम करणाऱ्या एका परकीय माणसाच्या दृष्टीकोणातून हा दुष्काळ किती भयानक आहे त्याची क्षणचित्रे देत आहे.

■ दुष्काळी काम म्हणजे प्रामुख्याने मोठ्या दगडाचे हातोड्याने छोट्या दगडात रूपांतर करणे. ज्यांना ही कष्टाची कामे करता येणे शक्य नाही त्यांना पण काही मदत मिळावी अशी 'अपेक्षा' आहे, फारच थोड्या लोकांना ती खरोखरीच मिळाली आहे. ऑक्टोबर पासून धान्याचे भाव दुप्पट झाले आहेत. सरकारी दुकानात माणशी महिन्याला सहा किलो धान्य मिळते. माणूस दररोज जगण्यासाठी ४०० ते ५०० ग्रॅम अन्न खातो! मैलोन मैल प्यायचे पाणी नसते व दिवसभराच्या कामानंतर मिळणाऱ्या तुटपुंज्या रोजगारावर पाणी कसे विकत घेणार? मग रात्री कोठ पाणी चोरता येईल की काय यासाठी रानोमाळ भटकावे लागते.

□ अशाच एका 'दुष्काळग्रस्त' (हा शब्द इतका सवयीतला झाला आहे की त्यातील भयानकता केव्हाच निघून गेली आहे) भागातील आई पहाटे ५ वाजता खडीचे काम शोधायला बाहेर पडते. तिच्याजवळ भाकरीचा एक तुकडा असतो पाच मुलात वाटायला! घराबाहेरच्या कोनाड्यात दगडाखाली भाकर ठेवून ती निघून जाते. मुले त्यासाठी भांडतात आणि जास्ती भांडखोर मुले खाण्यात यशस्वी होतात तर लहान व अशक्त मुले जणू काही डार्विनच्या सिद्धांताप्रमाणे—

पुढच्या जूनमध्ये पाऊस पडेल तेव्हा जमीन नांगरायला गुरे कोठे आहेत? आताच पैसे व धान्य जमा केले तर पहिला पाऊस व सुगीचे दिवस यात शेतकरी जगू शकेल. कारण एकदा का पाऊस आला की दुष्काळी कामे त्याबरोबरच वाहून जातील!

अशी एखादी बातमी किंवा एखादा चित्रपट परदेशात दाखवला की आपल्यातले प्रगत शहरवासी ओरडतात आमचा देश इतर गोष्टीत खूपच पुढे गेला आहे त्याचे चित्रण करा. एकच उदाहरण सांगतो. गेले तीन दिवस येथे एका खाणीत अडकलेल्या सात-आठ लोकांना वाचविण्यासाठी की 'जे जिवंत असण्याची सुतराम शक्यता नाही' सारे राष्ट्र धडपडत आहे. त्यांच्यापर्यंत पोचण्यासाठी ७५० फूट खोल भुयार खणण्याचे प्रयत्न चालू आहेत.

जास्ती लिहीत नाही. आपणही अकार्यक्षम शहरवासी बनलो की काय असे माझे मलाच वाटत आहे.

सुरेश गोरे,

२४ मार्च, ७३ सेंट अँन्ड्र्यूज, स्कॉटलंड

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५